भाग ८

प्रथम मंडलम्
सूक्त ११६ ते १४५



ऋग्वेद

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥ भाग ८

प्रथम मंडलम्

सूक्त ११६ ते १४५

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – श्री. श्रीपाद काळे

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥भाग ८

प्रथम मंडलम्

सूक्त ११६ ते १४५

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : १४ नोव्हेंबर २०२५

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय



प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व "शांखायन" अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला "शाकल संहिता" असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी

भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळामध्ये १९१ सूक्त असून १९७६ ऋचा आहेत ऋग्वेदातील हे सर्वात मोठे मंडळ आहे.

“मधुच्छन्दा वैश्वामित्र” विश्वामित्र ऋषींच्या शंभर पुत्रांपैकी एक्कावनावे पुत्र होते

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,
सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे
संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

प्रारंभिक भाग (वाचण्यासाठी लिंकवर क्लिक करा)

https://www.esahity.com/230923432381235123662340 23812350.html

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. पू. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. : २५४१४५४/२५४०३६२. E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

आषाढ शुद्ध १२ सोमवार
दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विजय हेमंत लक्ष्मण
मुंबई.
मो. 7678091629

वीरस्थ देवतेचे उत्तम आशिर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात ही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय सुरुवाही आहे.

खरे तर आपण ॲप्लीकेशनचे सर्जन. अनेकांची ऑपरेशन करून आपण त्या त्या लोकांनी आरोग्य प्राप्ती करून दिली. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृध्दांचे आशीर्वाद ही घेतले. परिणाम असा झाला की व्यावहारिक, निवृत्तीनंतर ही आपण आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध सार्थकपणी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लावला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व सर्वांच्या शुभेच्छांचे आशीर्वाद सुख आपणास प्राप्त होईल.

याचपूर्वी सुध्दा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुलकर्णी यांनी यशस्वी केला. व ऋग्वेद, साम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या ग्रंथरूप आले. आमची देखील इच्छा होती (वय ९८ वर्षे) ते अथर्ववेदाचे भाषांतर करत होते. असो. कदाचित ही कोणी गरजेपेक्षा असेल पण आम्हाही माही कमी नाही.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच वीरस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा वीरस्थ देवतेचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण सर्वांस विदीत करावे.

महानुभावतम् वरीवर्ति
श्री. जगद्गुरु शंकराचार्य
करवीर पीठ
कोल्हापूर

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- ११६

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- अश्विनीकुमार , **छंद**- त्रिष्टुप्

नासत्याभ्यां बर्हिरिव प्र वृञ्जे स्तोमाँ इयर्म्यभ्रियेव वातः ।
यावर्भगाय विमदाय जायां सेनाजुवा न्यूहतू रथेन ॥ ॥१॥
ज्या प्रमाणे यज्ञकर्ते दर्भासन पसरवतात किंवा वायुने प्रेरित झालेले मेघ, वृष्टी करताना गर्जना करतात त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते अश्विनीकुमारांच्या स्तुतीयुक्त स्तोत्रांचे पठण करत आहोत. आपल्या वेगवान रथाने अश्विनीकुमारांनी विमद राजाच्या पत्नीला स्वयंवर होण्याआधी त्यांच्या घरी पोहोचवली होती ॥१॥

वीळुपत्मभिराशुहेमभिर्वा देवानां वा जूतिभिः शाशदाना ।
तद्रासभो नासत्या सहस्रमाजा यमस्य प्रधने जिगाय ॥२ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपला रथ आकाशात उड्डाण करणाऱ्या आणि जमिनीवर, देवांच्या रथाप्रमाणे द्रुतगतीने धावणाऱ्या अश्वांनी जोडला आहे. हे अश्विनीकुमारांनो ! आपण आपले वाहन असणाऱ्या रासभाच्या (गाढव) मदतीने यमदेवाला आनंदित करणाऱ्या हजारोच्या संख्येने सैन्य असलेल्या शत्रूंवर विजय मिळवलात ॥२ ॥

तुग्रो ह भुज्युमश्विनोदमेघे रयिं न कश्चिन्ममृवाँ अवाहाः ।
तमूहथुर्नौभिरात्मन्वतीभिरन्तरिक्षप्रुद्भिरपोदकाभिः ॥३ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे मरणोन्मुख माणूस कसलाही विचार न करता संपत्तीचा त्याग करतो, त्याचप्रमाणे शत्रूंनी पीडलेला राजा तुग्राने आपल्या भुज्यु नावाच्या पुत्राला शत्रूवर विजय मिळवण्यासाठी नौकेतून समुद्रात लोटून दिले असताना अंतराळात फिरणाऱ्या आणि जलामध्ये तरंगणाऱ्या नौकेच्या सहाय्याने आपण दोघांनी त्याची मुक्तता केली॥३ ॥

तिस्रः क्षपस्त्रिरहातिव्रजद्भिर्नासत्या भुज्युमूहथुः पतंगैः ।
समुद्रस्य धन्वन्नार्द्रस्य पारे त्रिभी रथैः शतपद्भिः षळश्वैः ॥४ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण तीन दिवस अहोरात्र सतत प्रवास करणाऱ्या, अति वेगवान शंभर चाके असलेल्या, सहा घोड्यांनी, तीन वेगवान रथांनी भुज्युची समुद्रातून मुक्तता करून सुखरूप आणले ॥४ ॥

अनारम्भणे तदवीरयेथामनास्थाने अग्रभणे समुद्रे ।
यदश्विना ऊहथुर्भुज्युमस्तं शतारित्रां नावमातस्थिवांसम् ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण विश्रांती न घेता, अजस्र,अथांग आणि काडीचाही आधार नसलेल्या समुद्रातून शंभर वल्ही असलेल्या नौकेच्या सहाय्याने बुडणाऱ्या भुज्यूची मुक्तता केली आणि त्याला सुखरूपपणे घरी आणून सोडले. या आपल्या पराक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत आहे ॥५॥

यमश्विना ददथुः श्वेतमश्वमघाश्वाय शश्वदित्स्वस्ति ।
तद्वां दात्रं महि कीर्तेन्यं भूत्पैद्वो वाजी सदमिद्धव्यो अर्यः ॥६ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी "अघाश्व (निष्पाप) पेदु" राजाला सदैव मंगलकारी श्वेत-अश्व प्रदान केलात. हे आपले कर्म अत्यंत प्रसंशनीय आहे. शत्रूंवर आक्रमण करून विजय मिळवून देणारा हा अश्व आम्हाला नेहमीच आदरणीय राहील ॥६॥

युवं नरा स्तुवते पज्रियाय कक्षीवते अरदतं पुरंधिम् ।
कारोतराच्छफादश्वस्य वृष्णः शतं कुम्भाँ असिञ्चतं सुरायाः ॥७ ॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! आपली स्तुतियुक्त स्तोत्रे पठण करणाऱ्या अंगिरस गोत्राच्या काक्षीवानऋषींना आपण ज्ञानी बनवलेत. मद्याने काठोकाठ भरलेल्या मद्यपात्राप्रमाणे द्रव्याने भरलेली शंभर पात्रे आपण त्यांना प्रदान केलीत ॥७ ॥

हिमेनाग्निं घ्रंसमवारयेथां पितुमतीमूर्जमस्मा अधत्तम् ।
ऋबीसे अत्रिमश्विनावनीतमुन्निन्यथुः सर्वगणं स्वस्ति ॥८ ॥
हे अश्विनीकुमारांनो !आपण दोघांनी, असुरांनी पीडा देण्यासाठी पेटवलेल्या प्रचंड अग्निदेवांना शीतल जलाने शांत केलेत. हे अश्विनीकुमारांनो !आपण दोघांनी, असुरांच्या कारागृहात, अंधारात खितपत पडलेल्या, उलटे टांगलेल्या अत्रीऋषींना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पौष्टिक अन्न देऊन सुटका केलीत ॥८ ॥

परावतं नासत्यानुदेथामुच्चाबुध्नं चक्रथुर्जिह्मबारम् ।
क्षरन्नापो न पायनाय राये सहस्राय तृष्यते गोतमस्य ॥९ ॥
हे सत्यप्रिय अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी दूर असलेल्या विहिरींना गौतमऋषींच्या आश्रमाजवळ आणून विहिरीचा परीघ मोठा करून आणि तळ वरती उचलून घेऊन गौतमऋषीं साठी आणि आश्रमवासीयांसाठी जल उपलब्ध करून दिलेत. आश्रमवासीयांनी सिंचन केलेल्या विहिरीतल्या पाण्यामुळे अनेक प्रकारच्या धान्यांचे उत्पादन झाले ॥९ ॥

जुजुरुषो नासत्योत वव्रिं प्रामुञ्चतं द्रापिमिव च्यवानात् ।

प्रातिरतं जहितस्यायुर्दस्रादित्पतिमकृणुतं कनीनाम् ॥१०॥
हे सत्यप्रिय अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी जर्जर झालेल्या "च्यवन" ऋषींचे वृद्धत्व कवचाप्रमाणे (आवराप्रमाणे) दूर केलेत, त्यांना तरुण केलेत. आपण दोघांनी च्यवन ऋषींना सुंदर पत्नी प्रदान केली ॥१०॥

तद्वां नरा शंस्यं राध्यं चाभिष्टिमन्नासत्या वरूथम् ।
यद्विद्वांसा निधिमिवापगूळ्हमुद्दर्शतादूपथुर्वन्दनाय ॥११॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! गुप्तधन शोधणाऱ्या विद्वानांप्रमाणे विहिरीत बंदिस्त झालेल्या "वंदन" ऋषींना ओळखून आपण त्यांना मुक्त केले. हे आपले नि:स्वार्थी कृत्य अत्यंत प्रशंसनीय आहे ॥११॥

तद्वां नरा सनये दंस उग्रमाविष्कृणोमि तन्यतुर्न वृष्टिम् ।
दध्यङ्ह यन्मध्वाथर्वणो वामश्वस्य शीर्ष्णा प्र यदीमुवाच ॥१२॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! अथर्वऋषींचे पुत्र दधीची ऋषींना अश्वमुख प्रदान करून आपण मधुविद्येचा अभ्यास केलात आणि प्रचंड सामर्थ्य मिळविले . ह्या आपल्या या महान कृत्याचे स्तोत्र आम्ही मेघगर्जनेच्या आवाजात पठण करतो ॥१२॥

अजोहवीन्नासत्या करा वां महे यामन्पुरुभुजा पुरंधिः ।
श्रुतं तच्छासुरिव वध्रिमत्या हिरण्यहस्तमश्विनावदत्तम् ॥१३॥
हे आजानुबाहु असलेल्या अश्विनीकुमारांनो ! अत्यंत बुद्धिमान "वध्रिमती " ह्या ऋषींच्या पत्नींने आपल्याला त्यांच्या पूजनीय स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न केले. त्यांच्यावर प्रसन्न होऊन आपण त्यांना हिरण्यहस्त नावाचा पुत्र प्रदान केला ॥१३॥

आस्नो वृकस्य वर्तिकामभीके युवं नरा नासत्यामुमुक्तम् ।
उतो कविं पुरुभुजा युवं ह कृपमाणमकृणुतं विचक्षे ॥१४॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी लांडग्यांच्या तोंडातून चिमणीला जीवन दान दिले. दृष्टि प्राप्तीसाठी दृढ निश्चयाने आपले स्तवन करणाऱ्या नेत्रहीन कवींना दृष्टि प्रदान केलीत॥१४॥

चरित्रं हि वेरिवाच्छेदि पर्णमाजा खेलस्य परितक्म्यायाम् ।
सद्यो जङ्घामायसीं विश्पलायै धने हिते सर्तवे प्रत्यधत्तम् ॥१५॥
हे अश्विनीकुमारांनो ! पंख तुटलेल्या पक्षिणीसारख्या "खेल" राजाच्या पत्नीचा, विश्पलाचा पाय युद्धामध्ये कापला गेला. त्या रात्रीच्या काळामध्ये विश्पलाला नवीन लोखंडी पाय बसवून तिला युद्धासाठी परत एकदा तयार केलेत॥१५॥

शतं मेषान्वृक्ये चक्षदानमृज्राश्वं तं पितान्धं चकार ।
तस्मा अक्षी नासत्या विचक्ष आधत्तं दस्रा भिषजावनर्वन् ॥१६॥
"ऋज्राश्वऋषींनी" अन्नासाठी आपल्या वडिलांच्या शंभर मेंढ्या कापल्या. त्या प्रसंगी ऋज्राश्वऋषींच्या वडिलांनी त्यांना अंधत्वाचा शाप दिला. हे अश्विनीकुमारांनो ! त्या नेत्रहीन ऋज्राश्वऋषींना आपण कधीही खराब न होणारे नेत्र प्रदान केले आणि ऋज्राश्वऋषींना पाहण्यास सक्षम बनवले॥१६॥

आ वां रथं दुहिता सूर्यस्य कार्ष्मेवातिष्ठदर्वता जयन्ती ।
विश्वे देवा अन्वमन्यन्त हृद्भिः समु श्रिया नासत्या सचेथे ॥१७॥
हे सत्यप्रिय अश्विनीकुमारो !सूर्यदेवांची कन्या सूर्या (उषादेवता) घोडेस्वारीच्या स्पर्धेमध्ये मध्ये विजयी होण्यासाठी आपल्या रथावर आरूढ झाली. त्यावेळी

सर्व देवतांनी सूर्यपुत्रीचे हार्दिक अभिनंदन केले आणि आपल्याला तेज प्राप्त झाले॥१७॥

यदयातं दिवोदासाय वर्तिर्भरद्वाजायाश्विना हयन्ता ।
रेवदुवाह सचनो रथो वां वृषभश्च शिंशुमारश्च युक्ता ॥१८॥
हे अश्विनीकुमारांनो ! "दिवोदासने" यज्ञ करताना स्तुती करत हविअन्नदान केले त्यावेळी बैल आणि मगरी जोडलेल्या रथातून विपुल अन्न घेऊन आपण यज्ञस्थळी गेलात ॥१८॥

रयिं सुक्षत्रं स्वपत्यमायुः सुवीर्यं नासत्या वहन्ता ।
आ जह्नावीं समनसोप वाजैस्त्रिरह्नो भागं दधतीमयातम् ॥१९॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी अभिमानाने, दिवसातून तीन वेळा यज्ञ आहुती देणाऱ्या "जह्नु " ऋषींच्या वंशजांना श्रेष्ठ क्षात्रबल, उत्तम संतती, उत्तम वैभव आणि श्रेष्ठ शौर्ययुक्त जीवन प्रदान केलेत ॥१ ९ ॥

परिविष्टं जाहुषं विश्वतः सीं सुगेभिर्नक्तमूहथू रजोभिः ।
विभिन्दुना नासत्या रथेन वि पर्वताँ अजरयू अयातम् ॥२०॥
हे कधीही वृद्धत्व न येणाऱ्या चिरतरुण अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी रात्रीच्या वेळी शत्रूंनी वेढलेल्या युद्धक्षेत्रातून राजा "जहूषला" आपल्या सर्व भेदक लोखंडी रथातून सोप्या मार्गाने बाहेर काढले आणि शत्रू पोहोचू न शकणाऱ्या सुरक्षित जागी घेऊन गेलात ॥२०॥

एकस्या वस्तोरावतं रणाय वशमश्विना सनये सहस्रा ।
निरहतं दुच्छुना इन्द्रवन्ता पृथुश्रवसो वृषणावरातीः ॥२१॥

हे सामर्थ्यवान अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी "वश" नांवाच्या राजाला सहस्र प्रकारच्या संपत्तीची प्राप्ती होण्यासाठी केवळ एका दिवसासाठी संरक्षण दिलेत. आपण दोघांनी इंद्रदेवा देवांच्या सहाय्याने "पृथुश्रवा" राजाच्या त्रास देणाऱ्या शत्रूंचा संहार केलात ॥२१॥

शरस्य चिदार्चत्कस्यावतादा नीचादुच्चा चक्रथुः पातवे वाः ।
शयवे चिन्नासत्या शचीभिर्जसुरये स्तर्यं पिप्यथुर्गाम् ॥२२॥
हे सामर्थ्यवान अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी तहानलेल्या "ऋचत्क ऋषींचा" पुत्र शरऋषींसाठी खोल विहिरीच्या तळातून पाणी वर आणले. आपण दोघांनी थकलेल्या शंयु ऋषींच्या वांझ गायींना दुभत्या केल्या ॥२२॥

अवस्यते स्तुवते कृष्णियाय ऋजूयते नासत्या शचीभिः ।
पशुं न नष्टमिव दर्शनाय विष्णाप्वं ददथुर्विश्वकाय ॥२३ ॥
हे सामर्थ्यवान अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी आपली प्रार्थना करणाऱ्या, सरळ साध्या आणि सद्गुणी "कृष्णपुत्र" विश्वक ऋषींच्या विष्णुयु नांवाच्या पुत्राला वाट चुकलेल्या जनावरांना शोधणाऱ्या गुराख्या प्रमाणे शोधून दिलेत ॥२३ ॥

दश रात्रीरशिवेना नव द्यूनवनद्धं श्रथितमप्स्वन्तः ।
विप्रुतं रेभमुदनि प्रवृक्तमुन्निन्यथुः सोममिव स्रुवेण ॥२४॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी ज्याप्रमाणे अध्वर्यु (यज्ञकर्ता) स्रुव पात्रामध्ये सोमरस सिद्ध करून ठेवतो, त्याप्रमाणे दुष्ट असुरांनी दोऱ्यांनी बांधून दहा रात्री आणि नऊ दिवस विहिरीतल्या पाण्यामध्ये फेकून दिलेल्या रेभ ऋषींची सुटका केलीत॥२४॥

प्र वां दंसांस्यश्विनाववोचमस्य पतिः स्यां सुगवः सुवीरः ।
उत पश्यन्नश्नुवन्दीर्घमायुरस्तमिवेज्जरिमाणं जगम्याम् ॥२५॥

हे अश्विनीकुमारांनो ! आम्ही आपल्या आपल्या दोघांच्या श्रेष्ठ कर्माचे वर्णन केले आहे. आपण आमच्यावर प्रसन्न होऊन आम्हाला उत्तम गोधनाचे, शूरवीर संतती असलेल्या संपन्न राष्ट्राचे शासक बनवावे ही विनंती. ज्याप्रकारे एखादा घर मालक आपल्या घरात कोणत्याही अडथळ्याशिवाय आपल्या घरात शिरतो त्याप्रमाणे नेत्रादि इंद्रिये सुखरूप ठेवून आम्ही वार्धक्यात प्रवेश करू असा आशीर्वाद आम्हाला द्यावा ही विनंती॥२५ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- ११७

ऋषि- कक्षीवान् औशिज देवता- अश्विनीकुमार , छंद- त्रिष्टुप्

मध्वः सोमस्याश्विना मदाय प्रत्नो होता विवासते वाम् ।
बर्हिष्मती रातिर्विश्रिता गीरिषा यातं नासत्योप वाजैः॥१॥
हे सत्यप्रिय अश्विनीकुमारांनो ! आपल्या आनंदासाठी प्राचीन काळापासून यज्ञकर्ते मधुर सोमरस अर्पण करून आपली उपासना करत आहेत. आमच्या प्रार्थना आपल्यापर्यंत पोहोचत आहेत. आपल्यासाठी अर्पण करण्या करता दर्भासनावर सिद्ध केलेला सोमरस आणि हविअन्न ठेवले आहे. आपण दोघेही सर्व शक्तीने आमच्या यज्ञ स्थानी यावे ही विनंती ॥१ ॥

यो वामश्विना मनसो जवीयान्रथः स्वश्वो विश आजिगाति । ये
न गच्छथः सुकृतो दुरोणं तेन नरा वर्तिरस्मभ्यं यातम् ॥२॥
मनाच्या वेगापेक्षा अधिक तीव्र गती असलेल्या आपल्या रथाला उत्तम अश्व जोडून सत्कर्म करणाऱ्या भक्तगणांच्या घरी जाणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या त्या रथातून आमच्या जवळ यावे ही विनंती ॥२॥

ऋषिं नरावंहसः पाञ्चजन्यमृबीसादत्रिं मुञ्चथो गणेन ।
मिनन्ता दस्योरशिवस्य माया अनुपूर्वं वृषणा चोदयन्ता ॥३॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी पांचजन्य लोकांसाठी आदरणीय असलेल्या अत्रीऋषींच्या वंशजांना आणि अनुयायांना दुष्ट शत्रूंची

कारस्थाने हाणून पाडून कष्टदायक आणि दुःखदायक कारावासातून मुक्त केले॥३॥
(वेदांमध्ये पांचजन्य हा उल्लेख ब्राह्मण क्षत्रिय वैश्य निषाद आणि शूद्र म्हणजे सर्व लोकांसाठी केलेला आढळतो)

अश्वं न गूळ्हमश्विना दुरेवैऋषिं नरा वृषणा रेभमप्सु ।
सं तं रिणीथो विप्रुतं दंसोभिर्न वां जूर्यन्ति पूर्व्या कृतानि ॥४॥
हे नेतृत्वसंपन्न आणि कामसू अश्विनीकुमारांनो ! रेभाऋषींच्या शरीरातील अवयव घोड्यासारखे छिन्नविच्छिन्न करून, त्यांच्या दुष्ट शत्रूंनी त्यांना किल्ल्यातील विहिरीमध्ये जलसमाधि दिली असता आपण त्यांची मुक्तता करून अपंग झालेले शरीर पूर्ववत करून दिलेत. हा आपला पराक्रम अविस्मरणीय आहे॥४॥

सुषुप्वांसं न निऋतेरुपस्थे सूर्यं न दस्रा तमसि क्षियन्तम् ।
शुभे रुक्मं न दर्शतं निखातमुदूपथुरश्विना वन्दनाय॥५॥
हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो ! अंध:कारात लपलेल्या सूर्यदेवांप्रमाणे, जमिनीवर निद्रिस्त झालेल्या माणसाप्रमाणे, अथवा जमिनीत गाडले गेलेल्या सोन्याप्रमाणे खोल विहिरीत गरर्ते पडलेल्या वंदनऋषींची आपण मुक्तता केलीत॥५॥

तद्वां नरा शंस्यं पज्रियेण कक्षीवता नासत्या परिज्मन् ।
शफादश्वस्य वाजिनो जनाय शतं कुम्भाँ असिञ्चतं मधूनाम्॥६॥
हे सत्यप्रिय,नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! अंगीरसऋषींच्या वंशातील कक्षीवान् ऋषींच्या साठी, वेगवान घोड्यांच्या सहाय्याने शंभर पात्रांमध्ये

आपण गरजूंसाठी मध भरून ठेवला. ह्या आपल्या पराक्रमाची स्तुतियुक्त स्तोत्रे आजही पठण केली जातात ॥६॥

युवं नरा स्तुवते कृष्णियाय विष्णाप्वं ददथुर्विश्वकाय ।
घोषायै चित्पितृषदे दुरोणे पतिं जूर्यन्त्या अश्विनावदत्तम्॥७॥
हे नेतृत्वसंपन्न अश्विनीकुमारांनो ! आपली स्तुती करणाऱ्या कृष्णऋषींचा पुत्र, विश्वकायाऋषींचा हरवलेला पुत्र, विष्णुयु परत आणला. कुष्ठरोग झाल्यामुळे वडिलांच्या घरी जीवन जगणाऱ्या घोषा नावाच्या स्त्रीला पती मिळवून दिलात ॥७॥

युवं श्यावाय रुशतीमदत्तं महः क्षोणस्याश्विना कण्वाय ।
प्रवाच्यं तद्वृषणा कृतं वां यन्नार्षदाय श्रवो अध्यधत्तम् ॥८ ॥
हे सामर्थ्यवान अश्विनीकुमारांनो ! श्याव ऋषींना उत्तम कांती असलेली पत्नी प्रदान केली. नेत्रहीन असल्यामुळे कण्वऋषींना तेज:पूर्ण नेत्र दिले, बहिरा असलेल्या नृषदराजाच्या पुत्राला ऐकण्यासाठी कान प्रदान केले. ही आपल्या दोघांची कार्ये अत्यंत वाखाणण्याजोगी आहेत ॥८ ॥

पुरू वर्पांस्यश्विना दधाना नि पेदव ऊहथुराशुमश्वम् ।
सहस्रसां वाजिनमप्रतीतमहिहनं श्रवस्यं तरुत्रम् ॥९॥
हे अनेक रूपे धारण करणाऱ्या अश्विनीकुमारांनो! द्रुतगतीने धावणारा, बलवान, अजेय, शत्रूंचा नाश करणारा स्तुतीस पात्र, रक्षण करणारा ,अनंत संपत्ती देणारा अश्व, पेदुऋषींना प्रदान केला ॥९॥

एतानि वां श्रवस्या सुदानू ब्रह्माङ्गूषं सदनं रोदस्योः ।
यद्वां पज्रासो अश्विना हवन्ते यातमिषा च विदुषे च वाजम्॥१०॥

हे आकाश आणि पृथ्वीमध्ये निवास करणाऱ्याअश्विनीकुमारांनो ! आपण केलेल्या पराक्रमाच्या स्तुति युक्त स्तोत्रांचे आम्ही पठण करत आहोत. हे अश्विनीकुमारांनो ! जेव्हा जेव्हा आवाहन करणाऱ्या अंगिराऋषींचे वंशज आपले आवाहन करतील तेव्हा तेव्हा त्यांच्यासाठी योग्य अन्न आणून त्यांना बल प्रदान करावे ही विनंती ॥१०॥

सूनोर्मानेनाश्विना गृणाना वाजं विप्राय भुरणा रदन्ता ।
अगस्त्ये ब्रह्मणा वावृधाना सं विश्पलां नासत्यारिणीतम् ॥११॥
हे पोषण करणाऱ्या आणि सत्यवादी अश्विनीकुमारांनो ! स्वरचित स्तोत्रांच्या सहाय्याने मानऋषींनी आपल्या दोघांची स्तुती केली असता आपण त्यांना पुत्र प्रदान केला. अगस्त्यऋषींनी प्रार्थना केल्यानंतर आपण दोघांनी विश्पलाचा मोडलेला पाय सुस्थितीत आणला॥११॥

कुह यान्ता सुष्टुतिं काव्यस्य दिवो नपाता वृषणा शयुत्रा ।
हिरण्यस्येव कलशं निखातमुदूपथुर्दशमे अश्विनाहन् ॥१२॥
हे वीर्यवान अश्विनीकुमारांनो ! ही सुंदर स्तोत्रे ऐकण्यासाठी आपण कुठे जाता ? जमिनीमध्ये गाडलेल्या सोन्याचा कलश जसा बाहेर काढला जातो त्याप्रमाणे विहिरीमध्ये पडलेल्या रेमाऋषींना आपण दोघांनी अलगद बाहेर काढले. ॥१२॥

युवं च्यवानमश्विना जरन्तं पुनर्युवानं चक्रथुः शचीभिः ।
युवो रथं दुहिता सूर्यस्य सह श्रिया नासत्यावृणीत॥१३॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या औषधोपचारामुळे तुम्ही जराजर्जर वृद्ध झालेल्या च्यवनऋषींना परत एकदा तारुण्य दिले. हे अश्विनीकुमारांनो ! सुवर्णालंकृत सूर्यकन्या सूर्या आपल्या रथावर स्वतःहून आरूढ झाली ॥१३॥

युवं तुग्राय पूर्व्येभिरेवैः पुनर्मन्यावभवतं युवाना ।
युवं भुज्युमर्णसो निः समुद्राद्बिभिरूहथुऋज्रेभिरश्वैः॥१४॥
हे दुःख दूर करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी तरुण तुग्रराजांसाठी केलेल्या कर्मामुळे पूजनीय होता. आपण दोघांनी वेगवान पक्ष्यांसारख्या उडणाऱ्या घोड्यांच्या मदतीने तुग्रराजांच्या पुत्राला, भुज्यूला खवळलेल्या महासागरातून बाहेर काढले, या आपल्या पराक्रमाची स्तुति स्तोत्रे तुग्रराजा गात आहे॥१४॥

अजोहवीदश्विना तौग्र्यो वां प्रोळ्हः समुद्रमव्यथिर्जगन्वान् ।
निष्टमूहथुः सुयुजा रथेन मनोजवसा वृषणा स्वस्ति॥१५॥
हे अश्विनीकुमारांनो ! तुग्रराजांनी आपल्या भुज्यु नांवाच्या पुत्राला समुद्र प्रवासासाठी पाठवले होते. त्यावेळी भुज्यु बुडू लागल्याने तुंगराजांनी त्याला वाचवण्यासाठी आपली स्तुती केल्यावर आपण दोघानी सुंदर घोड्यांनी कोरलेल्या रथातून सुरक्षितपणे त्याला पित्याच्या घरी परत आणले ॥१५॥

अजोहवीदश्विना वर्तिका वामास्नो यत्सीममुञ्चतं वृकस्य ।
वि जयुषा ययथुः सान्वद्रेर्जातं विष्वाचो अहतं विषेण ॥१६॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या विजयी रथातून पर्वत शिखर पार करत असताना चिमणीचा धावा ऐकून आपण दोघांनी लांडग्यांच्या मुखातून तिची मुक्तता केली. आपण दोघांनी विष्वाच राक्षसाच्या पुत्राला विषाने मारले ॥१६॥

शतं मेषान्वृक्ये मामहानं तमः प्रणीतमशिवेन पित्रा ।
आक्षी ऋज्राश्वे अश्विनावधत्तं ज्योतिरन्धाय चक्रथुर्विचक्षे ॥१७॥

हे अश्विनीकुमारांनो ! लांडग्यांसाठी शंभर मेंढ्यांचे बलिदान दिल्यामुळे ऋजश्वाऋषींच्या दुःखी झालेल्या वडिलांनी त्यांना नेत्रहीन केले. अशा ऋजश्वाऋषींना आपण दृष्टी देऊन विश्व पाहण्याची संधी दिली ॥१७॥

शुनमन्धाय भरमह्वयत्सा वृकीरश्विना वृषणा नरेति ।
जारः कनीन इव चक्षदान ऋज्राश्वः शतमेकं च मेषान्॥१८॥
हे अश्विनीकुमारांनो ! दृष्टिहीन झालेल्या ऋजश्वाऋषींना दृष्टि देऊन सुखी करण्यासाठी लांडगीने आपली प्रार्थना करताना कथन केले की, पत्नीस प्रसन्न करू इच्छिणाऱ्या पुरुषाप्रमाणे ऋजश्वाऋषींनी शंभर मेंढ्यां मला खाण्यास दिल्या होत्या॥१८॥

मही वामूतिरश्विना मयोभूरुत स्रामं धिष्ण्या सं रिणीथः ।
अथा युवामिदह्वयत्पुरंधिरागच्छतं सीं वृषणाववोभिः ॥१९॥
उत्तम कल्याणकारी संरक्षण शक्ती असलेल्या, शरीरभंग झालेल्या लोकांना निरोगी करणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! बहुबुद्धिसंपन्न विश्पलाने रोगमुक्त होण्यासाठी आपली संरक्षणात्मक साधनांसह येण्याची प्रार्थना केली ॥१९॥

अधेनुं दस्रा स्तर्यं विषक्तामपिन्वतं शयवे अश्विना गाम् ।
युवं शचीभिर्विमदाय जायां न्यूहथुः पुरुमित्रस्य योषाम् ॥२०॥
हे सौंदर्यवान अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी गर्भधारण करण्यास असमर्थ, दुर्बल, दुग्धरहित शंयुऋषींच्या गायीला दुभती बनवली. आपल्या सामर्थ्याने पुरुमित्रऋषींच्या कन्येला विमद राजाची धर्मपत्नी बनवली ॥२०॥

यवं वृकेणाश्विना वपन्तेषं दुहन्ता मनुषाय दस्रा ।
अभि दस्युं बकुरेणा धमन्तोरु ज्योतिश्चक्रथुरार्याय ॥२१॥

हे सौंदर्यवान अश्विनीकुमारांनो ! जव आदि धान्य नांगरधारी विद्वान मनुष्यासाठी मुबलक अन्नधान्य देत असताना आपल्या तेजस्वी वज्राने दानवांचा विनाश करत आपली महानता वाढवली ॥२१॥

आथर्वणायाश्विना दधीचेऽश्व्यं शिरः प्रत्यैरयतम् ।
स वां मधु प्र वोचदृतायन्त्वाष्ट्रं यद्दस्रावपिकक्ष्यं वाम् ॥२२॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी अथर्व कुळामध्ये जन्म घेतलेल्या दधीचिऋषींना अश्वाचे तोंड लावले, त्यावेळी दधीचिऋषींनी त्वष्टादेवांकडून प्राप्त झालेल्या मधु विद्या (आत्म्याला सर्वोच्च आनंद देणारी विद्या) आणि भग्न झालेल्या शरीराला जोडण्याच्या प्रवर्ग्य नामक विद्या आपण दोघांना शिकविल्या ॥२२॥

सदा कवी सुमतिमा चके वां विश्वा धियो अश्विना प्रावतं मे ।
अस्मे रयिं नासत्या बृहन्तमपत्यसाचं श्रुत्यं रराथाम् ॥२३॥
हे सौंदर्यवान अश्विनीकुमारांनो ! आम्ही आपल्या कल्याणकारी, अनुग्रह करणाऱ्या बुद्धीची सतत प्रार्थना करत असतो. आपण आमच्या सर्व कार्यांचे संरक्षण करावे, आम्हाला संतती आणि विपुल संपत्ती द्यावी ही विनंती ॥२३॥

हिरण्यहस्तमश्विना रराणा पुत्रं नरा वध्रिमत्या अदत्तम् ।
त्रिधा ह श्यावमश्विना विकस्तमुज्जीवस ऐरयतं सुदानू ॥२४॥
श्रेष्ठ दातृत्व असलेल्या, औदार्य पूर्ण, नेतृत्वक्षमता असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! वांझ वध्रिमती राणीला हातात सुवर्ण धारण करणारे पुत्र प्रदान केलेत. शरीराचे छिन्नविच्छिन्न तीन भाग झालेल्या श्यावऋषींना जीवनदान दिले ॥२४॥

एतानि वामश्विना वीर्याणि प्र पूर्व्याण्यायवोऽवोचन् ।
ब्रह्म कृण्वन्तो वृषणा युवभ्यां सुवीरासो विदथमा वदेम ॥२५॥

हे अश्विनीकुमारांनो !आपल्या पराक्रमांची वरील स्तोत्रे आम्ही भक्तिभावाने पठण करत असतो. आम्हाला पराक्रमी पुत्र आणि यज्ञ करण्याकरता स्तोत्रे रचण्याचे सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती ॥२५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- ११८

ऋषि- कक्षीवान् औशिज देवता- अश्विनीकुमार , छंद- त्रिष्टुप्

आ वां रथो अश्विना श्येनपत्वा सुमृळीकः स्ववाँ यात्वर्वाङ् ।
यो मर्त्यस्य मनसो जवीयान्त्रिवन्धुरो वृषणा वातरंहाः ॥१॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या दोघांचा बसण्यासाठी सुखकारक, अत्यंत बळकट, मनुष्यांच्या मनापेक्षा अधिक वेगवान, वायुसारखा गतिमान, श्येन पक्ष्यांसारखा आकाशगामिनी रथ आमच्याकडे घेऊन यावे ही विनंती ॥१॥

त्रिवन्धुरेण त्रिवृता रथेन त्रिचक्रेण सुवृता यातमर्वाक् ।
पिन्वतं गा जिन्वतमर्वतो नो वर्धयतमश्विना वीरमस्मे॥२॥
हे अश्विनीकुमारांनो! तीन चाकांच्या, त्रैलोक्यात फिरणाऱ्या, उत्तम गतिमान रथावर आरूढ होऊन आमच्याकडे यावे ही विनंती. आम्हाला दूध-दुभत्या गायी, वेगवान अश्व आणि वीर संतती द्यावी ही विनंती ॥२॥

प्रवद्यामना सुवृता रथेन दस्राविमं शृणुतं श्लोकमद्रेः ।
किमङ्ग वां प्रत्यवर्तिं गमिष्ठाहुर्विप्रासो अश्विना पुराजाः॥३॥
हे सौंदर्यवान अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी द्रुतगतीने चालणाऱ्या रथावर आरूढ होऊन आमच्या यज्ञस्थळी येऊन सोमरस प्राशन करण्याच्या वेळी आम्ही पठण करीत असलेली स्तोत्रे श्रवण करावीत ही विनंती. भूतकाळातील आमच्या ज्ञानी पूर्वजांनी सांगितले आहे की आपण भक्तांच्या दारिद्र्याचा आणि दुःखाचा नाश करण्याकरता भ्रमण करत असता॥३॥

आ वां श्येनासो अश्विना वहन्तु रथे युक्तास आशवः पतंगाः ।
ये अप्तुरो दिव्यासो न गृध्रा अभि प्रयो नासत्या वहन्ति ॥४ ॥
हे सत्याचे पालन करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपल्या रथाला जोडलेले गतिशील, ऊर्जा संपन्न, गिधाडांइतके उंच उडणारे, श्येन पक्ष्यांप्रमाणे आकाशगामी, घोडे यज्ञातील हविष्यान्न ग्रहण करण्यासाठी आपल्याला घेऊन येऊ देत ॥४ ॥

आ वां रथं युवतिस्तिष्ठदत्र जुष्ट्वी नरा दुहिता सूर्यस्य ।
परि वामश्वा वपुषः पतंगा वयो वहन्त्वरुषा अभीके॥५॥
आपल्या दोघांशी स्नेहपूर्ण वर्तन करणाऱ्या सूर्यदेवांची तरुण कन्या आपल्या रथावर आरूढ झाली. सुंदर, दुडक्या चालीचे, आरक्त रंगाचे रथाला जोडलेले घोडे आपल्या दोघांनाही आमच्या यज्ञस्थळी घेऊन येवोत ही विनंती ॥५॥

उद्वन्दनमैरतं दंसनाभिरुद्रेभं दस्रा वृषणा शचीभिः ।
निष्टौग्र्यं पारयथः समुद्रात्पुनश्च्यवानं चक्रथुर्युवानम्॥६॥
हे सामर्थ्यवान शत्रुसंहारक अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी आपल्या अभूतपूर्व सामर्थ्याने विहिरीच्या खोल गर्तेत पडलेल्या वंदन आणि रेभ ऋषींना बाहेर काढले, तुग्र राजाच्या भुज्यु पुत्राला सागरातून वाचून सुखरूप घरी आणले, त्याचप्रमाणे च्यवनऋषींना परत एकदा तारुण्य दिलेत॥६॥

युवमत्रयेऽवनीताय तप्तमूर्जमोमानमश्विनावधत्तम् ।
युवं कण्वायापिरिप्ताय चक्षुः प्रत्यधत्तं सुष्टुतिं जुजुषाणा॥७॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी पीडा गृहामध्ये कैदेत असलेल्या अत्रीऋषींना वाचवण्यासाठी आपण पीडादायी आगीला शांत करून त्यांना

आनंद देणारे अन्न दिलेत. त्याच प्रकारे दृष्टिहीन कण्वऋषींच्या प्रार्थनेने प्रसन्न होऊन त्यांना दिव्य नेत्र प्रदान केलेत ॥७॥

युवं धेनुं शयवे नाधितायापिन्वतमश्विना पूर्व्याय ।
अमुञ्चतं वर्तिकामंहसो निः प्रति जङ्घां विश्पलाया अधत्तम्॥८॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी प्राचीन काळापासून आपली स्तुती करणाऱ्या शन्यूऋषींच्या गायीला दुभती केलीत, चिमणीची लांडग्याच्या तोंडातून मुक्तता केलीत आणि विश्पला राणीला लोहमय पाय दिलात ॥८॥

युवं श्वेतं पेदव इन्द्रजूतमहिहनमश्विनादत्तमश्वम् ।
जोहूत्रमर्यो अभिभूतिमुग्रं सहस्रसां वृषणं वीड्वङ्गम्॥९॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी, आपल्या पेरू नामक भक्ताला; श्वेतवर्णीय, इंद्रदेवांची प्रेरणा असलेला, शत्रूंचा नाश करणारा, उच्च स्वरात खिंकाळणारा (आवाज करणारा), धन देणारा, धष्टपुष्ट, अश्व प्रदान केलात ॥९॥

ता वां नरा स्ववसे सुजाता हवामहे अश्विना नाधमानाः ।
आ न उप वसुमता रथेन गिरो जुषाणा सुविताय यातम् ॥१०॥
हे पराक्रमी, श्रेष्ठ कुलोत्पन्न अश्विनीकुमारांनो ! आमच्या संरक्षणासाठी आम्ही आपले आवाहन करतो. आम्ही करत असलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होऊन, आपल्या धन संपन्न रथावर आरूढ होऊन आमच्याकडे यावे ही विनंती॥१०॥

आ श्येनस्य जवसा नूतनेनास्मे यातं नासत्या सजोषाः ।
हवे हि वामश्विना रातहव्यः शश्वत्तमाया उषसो व्युष्टौ॥११॥

हे सत्यस्वरूप अश्विनीकुमारांनो ! शाश्वत उषादेवतेचा उदय होताच, आपण दोघेही एकत्र येऊन, नव्या दमाच्या श्येनपक्ष्यांच्या द्रुतगतीने येण्याचे आम्ही आवाहन करत आहोत आणि आपल्यासाठी सिद्ध केलेले हविष्यान्न ग्रहण करावे ही विनंती॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- ११९

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- अश्विनीकुमार **, छंद-** जगती

आ वां रथं पुरुमायं मनोजुवं जीराश्वं यज्ञियं जीवसे हुवे ।
सहस्रकेतुं वनिनं शतद्वसुं श्रुष्टीवानं वरिवोधामभि प्रयः ॥१ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! अद्भुत कृत्य करणारा, मनाच्या वेगाप्रमाणे अत्यंत शीघ्रगतीने चालणाऱ्या, द्रुतगती अश्व जोडलेल्या, सहस्रध्वजयुक्त, धन प्रदान करणाऱ्या, सुखकारक, धनसंपन्न रथाला आम्ही आमच्या आरोग्यपूर्ण जीवनासाठी हविष्यान्न ग्रहण करण्यासाठी आवाहन करत आहोत. ॥१ ॥

ऊर्ध्वा धीतिः प्रत्यस्य प्रयामन्यधायि शस्मन्त्समयन्त आ दिशः ।
स्वदामि घर्मं प्रति यन्त्यूतय आ वामूर्जानी रथमश्विनारुहत्॥२॥
हे अश्विनीकुमारांनो ! सूर्यदेवांची कन्या आरूढ झालेला आपला रथ जसजसा यज्ञस्थानाकडे जाण्यास निघतो त्यावेळेला आम्ही आमच्या बुद्धीने उच्च स्वरामध्ये आपल्या दोघांची प्रशंसा असलेलल्या स्तोत्रांचे पठण करतो. आम्ही सर्व चहूबाजूंचे यज्ञकर्ते एकत्र येऊन, तूपमिश्रित आहुतीसाठी हवि अर्पण करतो॥२॥

सं यन्मिथः पस्पृधानासो अग्मत शुभे मखा अमिता जायवो रणे ।
युवोरह प्रवणे चेकिते रथो यदश्विना वहथः सूरिमा वरम्॥३॥
हे अश्विनीकुमारांनो ! सर्वसाधारण लोकांच्या कल्याणासाठी अनेक रणझुंजार योद्धे एकत्र येतात त्यावेळी आपल्या दोघांचा रथ, मंदगतीने भक्तांच्या सहाय्यार्थ अवतीर्ण होतो. त्याच रथातून आपण दोघे भक्तांसाठी श्रेष्ठधन घेऊन येता॥३॥

युवं भुज्युं भुरमाणं विभिर्गतं स्वयुक्तिभिर्निवहन्ता पितृभ्य आ ।
यासिष्टं वर्तिर्वृषणा विजेन्यं दिवोदासाय महि चेति वामवः॥४॥
हे शक्तिमान अश्विनीकुमारांनो ! आपल्या पक्ष्यांप्रमाणे उडणाऱ्या वेगवान रथातून, जीवनाबद्दल संशयात असलेल्या आणि भयाने ग्रासलेल्या भुज्युची मुक्तता करून त्याला त्याच्या माता- पित्यांकडे सुखरूप पोहोचविले. आपण दोघांनी संरक्षणासाठी दिलेला सहयोग दिवोदास राजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे॥४॥

युवोरश्विना वपुषे युवायुजं रथं वाणी येमतुरस्य शर्ध्यम् ।
आ वां पतित्वं सख्याय जग्मुषी योषावृणीत जेन्या युवां पती ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या सुंदर रथाच्या अश्वांनी स्वयंवराच्या शर्यतीमध्ये सर्वप्रथम पोहोचवून विजयी केले त्यामुळे तरुण, कुलवती सूर्यदेवाची कन्या, उषादेवतेने आपल्या दोघांना पती म्हणून स्वीकारले ॥५॥

युवं रेभं परिषूतेरुरुष्यथो हिमेन घर्मं परितप्तमत्रये ।
युवं शयोरवसं पिप्यथुर्गवि प्र दीर्घेण वन्दनस्तार्यायुषा॥६॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी रेभासऋषींची कष्टदायक जीवनातून मुक्तता केलीत. कारागृहात, प्रज्वलित अग्नीवर ठेवलेल्या अत्रीऋषींवर शीतल पाण्याचा शिडकावा करून अग्नि विझवलात, शंयुऋषींच्या गायीला दुभती केलीत आणि वंदन ऋषींना दीर्घ आयुष्य दिलेत ॥६॥

युवं वन्दनं निऋतं जरण्यया रथं न दस्रा करणा समिन्वथः ।
क्षेत्रादा विप्रं जनथो विपन्यया प्र वामत्र विधते दंसना भुवत्॥७॥
हे कार्यकुशल अश्विनीकुमारांनो ! ज्या प्रमाणे जुन्या पुराण्या रथाला शिल्पकार दुरुस्त करून नवीन बनवतो, त्याप्रमाणे जराजर्जर झालेल्या वंदनऋषींना

आपण परत एकदा नवतारुण्य प्रदान केलेत. स्तोत्राच्या पठणाने प्रसन्न होऊन ज्ञानी ऋषींना मातेच्या उदरातून बाहेर काढलेत आपले संरक्षण देण्याचे सेवाकार्य सर्व लोकांसाठी अत्यंत प्रभाव पूर्ण आहे॥७॥

अगच्छतं कृपमाणं परावति पितुः स्वस्य त्यजसा निबाधितम् ।
स्वर्वतीरित ऊतीर्युवोरह चित्रा अभीके अभवन्नभिष्टयः॥८ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! तुग्र राजाने क्रोधाने त्याग केलेल्या भुज्यु नांवाच्या पुत्राने आपली प्रार्थना केल्याने आपण दोघांनी त्याला संकटमुक्त केले. असे आपले हे संरक्षणात्मक कार्य अत्यंत अद्भुत, तेजस्वी आणि सर्वांनाअनुकरणीय आहे ॥८॥

उत स्या वां मधुमन्मक्षिकारपन्मदे सोमस्यौशिजो हुवन्यति ।
युवं दधीचो मन आ विवासथोऽथा शिरः प्रति वामश्व्यं वदत् ॥९ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! मधमाशी मध मिळवण्यासाठी गुंजन करते त्याप्रमाणे उशिज ऋषींचे पुत्र कक्षीवान्ऋषी सोमरस प्राशन करून आनंदित होण्यासाठी आपल्याला बोलावत आहेत. ज्या वेळेला दधिचीऋषींनी आपली मनःपूर्वक सेवा केली त्यामुळे प्रसन्न होऊन ऋषींच्या अश्वमुखाद्वारे आपण दोघांनी मधु विद्या प्राप्त केलीत ॥९ ॥

युवं पेदवे पुरुवारमश्विना स्पृधां श्वेतं तरुतारं दुवस्यथः ।
शर्यैरभिद्युं पृतनासु दुष्टरं चर्कृत्यमिन्द्रमिव चर्षणीसहम्॥१०॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी आपल्या पेदु नांवाच्या राजाला इंद्रदेवांप्रमाणे शत्रूंना पराभूत करण्यास सक्षम, श्वेतवर्णीय, तेजःपुंज, बहुउद्देशीय,अजेय, चपळ अश्व प्रदान केलात॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२०

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- १-११ अश्विनीकुमार१२- दुःस्वप्ननाशक **छंद**-१ गायत्री,२ ककुभ्,३- काविराट्, ४ – नष्टरुपी, ५- तनुशिरा, ६- उष्णिक्

,

७ विष्टाऱ बृहती, ८- कृती ९ -विराज १०-१२ गायत्री

का राधद्धोत्राश्विना वां को वां जोष उभयोः । कथा विधात्यप्रचेताः ॥१ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! कोणत्या स्तुतिपूर्ण स्तोत्रांच्या पठणाने आपण प्रसन्न व्हाल ? कोणता यज्ञ आपल्या दोघांना आनंदी करण्यास सक्षम आहे? ज्या कोणाला आपल्या दोघांचे माहात्म्य माहीत नाही तो आपली सेवा कशी करू शकेल? ॥१ ॥

विद्वांसाविदुरः पृच्छेदविद्वानित्थापरो अचेताः । नू चिन्नु मर्ते अक्रौ॥२॥

अज्ञानी, प्रतिभाहीन दोन्ही प्रकारच्या मनुष्यांनी विद्वान अश्विनीकुमारांकडून ज्ञान प्राप्त करून घ्यावे. मनुष्यांच्या हितासाठी काही न करण्याचा अश्विनीकुमारांचा स्वभाव नाही. नेहमीच अश्विनीकुमारांनी मनुष्यांचे हितच बघितले आहे ॥२॥

ता विद्वांसा हवामहे वां ता नो विद्वांसा मन्म वोचेतमद्य । प्रार्चद्दयमानो युवाकुः॥३ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! आम्ही आपल्या दोघांना सर्वज्ञ म्हणून ओळखतो. आम्ही भक्तगण आपली हविष्यान्नाची आहुती देऊन प्रार्थना करत आहोत. त्यासाठी पठण करायची स्तोत्रे आम्हाला शिकवावी ही विनंती॥३ ॥

वि पृच्छामि पाक्या न देवान्वषट्कृतस्याद्भुतस्य दस्रा ।
पातं च सह्यसो युवं च रभ्यसो नः॥४॥
हे शत्रुसंहारक अश्विनीकुमारांनो ! आम्ही करत असलेल्या प्रार्थना फक्त तुमच्यासाठीच आहेत अन्य कोणासाठीही नाहीत. आपल्यासाठी वषट्कारपूर्वक(यज्ञांमध्ये देवांना आहुति अर्पण करताना वषट्कार मंत्राचा वापर प्रामुख्याने केला जातो) अर्पण केलेला सोमरस उमाशंकर प्राशन करून देत आणि आम्हाला कर्तबगार बनवावे ही विनंती ॥४॥

प्र या घोषे भृगवाणे न शोभे यया वाचा यजति पञ्चियो वाम् । प्रैषयुर्न विद्वान् ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! घोषाऋषींचा पुत्र सुहस्त्य आणि भृगवाणऋषींच्या उत्तम स्तुती युक्त स्तोत्राने प्रसन्न झालेल्या अश्विनीकुमारांनो ! अन्नाची इच्छा करणारे पञ्चीऋषींचा वंशज कक्षीवान्ऋषींच्या स्तोत्राने आपण आज प्रसन्न व्हावे ही विनंती ॥५॥

श्रुतं गायत्रं तकवानस्याहं चिद्धि रिरेभाश्विना वाम् । आक्षी शुभस्पती दन् ॥६॥
हे अश्विनीकुमारांनो ! प्रगतीची इच्छा असणाऱ्या ऋषींनी आपल्या दोघांसाठी गायत्री छंदामध्ये रचलेल्या स्तोत्रांचे आपण श्रवण करावे, आपण दोघांनी नेत्रहीन ऋषींना दृष्टि प्रदान केल्यामुळे आम्ही आपले गुणगान करत आहोत. आपण आमचे मनोरथ पुरे करावे ही विनंती॥६॥

युवं ह्यास्तं महो रन्युवं वा यन्निरततंसतम् ।
ता नो वसू सुगोपा स्यातं पातं नो वृकादघायोः॥७॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण काही भक्तगणांना विपुल धन प्रदान करतात तर काही भक्तगणांचे धन हिरावून घेता. संरक्षण करणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! दुष्ट आणि लांडग्याच्या मनोवृत्ती असलेल्या घातक शत्रूंपासून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥७॥

मा कस्मै धातमभ्यमित्रिणे नो माकुत्रा नो गृहेभ्यो धेनवो गुः । स्तनाभुजो अशिश्वीः ॥८ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! कोणत्याही प्रकारच्या शत्रूंपासून आमचा पराभव होऊ नये, आमच्या घरातील दुभत्या गायी त्यांच्या वासरांचा त्याग करून घराबाहेर न पडता दुधासारख्या पौष्टिक रसाने आम्हाला सदैव सुदृढ बनवावे ही विनंती॥८ ॥

दुहीयन्मित्रधितये युवाकु राये च नो मिमीतं वाजवत्यै । इषे च नो मिमीतं धेनुमत्यै॥९॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या दोघांच्या कृपादृष्टीची इच्छा बाळगणारे आम्ही आमच्या मित्रांच्या भरणपोषण करण्यासाठी विपुल अन्नधान्य आणि गोधन प्रदान करण्याची विनंती करत आहोत ॥९॥

अश्विनोरसनं रथमनश्वं वाजिनीवतोः । तेनाहं भूरि चाकन॥१०॥
हे अश्विनीकुमारांनो ! आम्ही विपुल धन प्राप्तीसाठी आपल्या अश्वरहितरथाची उपासना करत आहोत ॥१०॥

अयं समह मा तनूह्यातेजनाँ अनु । सोमपेयं सुखो रथः॥११॥
अश्विनीकुमारांचा हा सुखदायक रथ, धनसंपन्न आहे. अश्विनीकुमार सोमपान प्राशन करण्याकरता याच रथावर आरूढ होऊन यज्ञकर्त्यांकडे जातात. हा रथ आम्हाला यशस्वी करू दे ही विनंती ॥११॥

अध स्वप्नस्य निर्विदेऽभुञ्जतश्च रेवतः । उभा ता बस्रि नश्यतः॥१२॥
हे अश्विनीकुमारांनो ! काम न करता स्वप्नांमध्ये रमणाऱ्या आणि मदत न करणाऱ्या कंजूष लोकांचा आम्ही तिरस्कार करतो. त्यांचा सत्वगुणाने सत्वर नाश होवो ही विनंती ॥१२॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२१

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- अग्नि **छंद**- त्रिष्टुप्

कदित्था नॄँः पात्रं देवयतां श्रवद्गिरो अङ्गिरसां तुरण्यन् ।
प्र यदानड्विश आ हर्म्यस्योरु क्रंसते अध्वरे यजत्रः॥१॥
यज्ञकर्त्यांचे पालक, गोधन प्रदान करणाऱ्या, पूजनीय इंद्रदेवांनी, अंगिरस ऋषींनी रचलेल्या भक्तगणांनी केलेल्या प्रार्थना कधी श्रवण केल्या हे नक्की माहीत नाही, परंतु त्या प्रार्थनांचा स्वीकारकरून इंद्रदेव यज्ञस्थळी शीघ्रतेने जातात आणि भक्तगणांच्या इच्छा पूर्ण करतात॥१॥

स्तम्भीद्द्यां स धरुणं पृषायदृभुर्वाजाय द्रविणं नरो गोः ।
अनु स्वजां महिषश्चक्षत व्रां मेनामश्वस्य परि मातरं गोः॥२॥
आकाशास स्थिरता देणाऱ्या, तेजस्वी, सूर्यरुपी इंद्रदेवांनी पृथ्वीवर सर्वत्र अन्नधान्याच्या उत्पन्नासाठी जलवृष्टी केली. उषादेवतेंच्या पश्चात् प्रकाशणाऱ्या सूर्यरूपी इंद्रदेवांनी अश्विनीचे (घोडीचे) गोमाते मध्ये रूपांतर केले ॥२॥

नक्षद्धवमरुणीः पूर्व्यं राट् तुरो विशामङ्गिरसामनु द्यून् ।
तक्षद्वज्रं नियुतं तस्तम्भद्द्यां चतुष्पदे नर्याय द्विपादे॥३॥
मानवांच्या हितासाठी द्विपाद आणि चतुष्पादांचे रक्षण करणाऱ्या, प्रलयकारी वज्रधारण करणारे इंद्रदेव आरक्त वर्णीय उषादेवतेला प्रकाशित करत अंगिरस

ऋषींच्या वंशजांनी रचलेली स्तोत्रे ऐकून सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी आकाशाला स्थिरता देवोत ही विनंती ॥३॥

अस्य मदे स्वर्यं दा ऋतायापीवृतमुस्रियाणामनीकम् ।
यद्ध प्रसर्गे त्रिककुम्निवर्तदप द्रुहो मानुषस्य दुरो वः॥४॥
सोमरसाच्या प्राशनाने प्रसन्न होऊन इंद्रदेवांनी शत्रूंच्या अभेद्य फळयांना उद्ध्वस्त करून असुरांनी चोरलेल्या गायींची मुक्तता करून त्यांचे प्रशंसनीय दान प्रदान केले ॥४॥

तुभ्यं पयो यत्पितरावनीतां राधः सुरेतस्तुरणे भुरण्यू ।
शुचि यत्ते रेक्ण आयजन्त सबर्दुघायाः पय उस्रियायाः॥५ ॥
जेव्हा भक्तगण दुभत्या गायींच्या तूपमिश्रीत दुधाने यज्ञ करतात तेव्हा हे इंद्रदेवा !आपण शीघ्रतेने कार्यान्वित होऊन माता-पितारूपी पृथ्वीदेवता आणि आकाशदेवता यांना ऐश्वर्य आणि श्रेष्ठ उत्पादन करण्यासाठी जलवृष्टी करता॥५॥

अध प्र जज्ञे तरणिर्ममत्तु प्र रोच्यस्या उषसो न सूरः ।
इन्दुर्येभिराष्ट स्वेदुहव्यैः स्रुवेण सिञ्चञ्जरणाभि धाम ॥६ ॥
शत्रुविजेता इंद्रदेव, सूर्यदेवांच्या रूपाने उषादेवतेंच्या सान्निध्यात प्रकाशमान होत आहेत. आम्ही यज्ञवेदीत स्रुवाच्या सहाय्याने सोमरस अर्पण करत आहोत, त्याचा स्वीकार करून हे इंद्रदेवा !आपण प्रसन्न व्हावे ही विनंती ॥६ ॥

स्विध्मा यद्वनधितिरपस्यात्सूरो अध्वरे परि रोधना गोः ।
यद्ध प्रभासि कृत्व्याँ अनु द्यूननर्विशे पश्विषे तुराय॥७॥

अंतरिक्षामध्ये मेघमाला चमकू लागताच इंद्रदेव जलवृष्टीची सर्व बंधने मोकळी करतात. हे इंद्रदेवा ! आपण सूर्यदेवांच्या किरणांच्या रूपात कामाच्या दिवसात संचार करता तेव्हा गाडीवान, पशुपालक, त्याचप्रमाणे गतीशील मनुष्य आपली कार्ये करण्यास तयार होतात॥७॥

अष्टा महो दिव आदो हरी इह द्युम्नासाहमभि योधान उत्सम् ।
हरिं यत्ते मन्दिनं दुक्षन्वृधे गोरभसमद्रिभिर्वाताप्यम्॥८॥
हे इंद्रदेवा ! यज्ञकर्त्यांनी आपल्यासाठी उत्तम, आनंददायी, गायीच्या दूधमिश्रित, दगडावर वाटून सोमरस सिद्ध करून ठेवला आहे. आपण आपल्या शत्रूंशी सामना करणाऱ्या अश्वांना तो सोमरस पाजावा आणि आमच्या धनाचे अपहरण केलेल्या शत्रूंचा पराभव करावा ही विनंती ॥८॥

त्वमायसं प्रति वर्तयो गोर्दिवो अश्मानमुपनीतमृभ्वा ।
कुत्साय यत्र पुरुहूत वन्वञ्छुष्णमनन्तैः परियासि वधैः॥९॥
हे पुरुहूता,(इंद्रदेवांचे नांव) ज्यावेळी आपण कुत्साऋषींच्या संरक्षणासाठी शुष्णासुराला वेगवेगळ्या अस्त्रांचा प्रहार करून त्याचा नाश केला आणि त्यामुळे निर्भय झालेले सर्वजण चारीदिशांमध्ये संचार करू लागले. त्या आक्रमणकारी शुष्णासुराचा वध करताना ऋभुंऋषींनी तयार केलेल्या पोलादी वज्राने आपण प्रहार केला होता॥९॥

पुरा यत्सूरस्तमसो अपीतेस्तमद्रिवः फलिगं हेतिमस्य ।
शुष्णस्य चित्परिहितं यदोजो दिवस्परि सुग्रथितं तदादः॥१०॥
हे वज्रधारी इंद्रदेवा ! जेव्हा आपण ढगांचा नाश करण्याकरीता शस्त्रांचा प्रहार केलात तेव्हा सूर्यदेव मुक्त झाले. सर्व आकाशलोकांना बंदिवान केलेल्या शुष्णसुराच्या शक्तीचा आपण नाश केलात ॥१०॥

अनु त्वा मही पाजसी अचक्रे द्यावाक्षामा मदतामिन्द्र कर्मन् ।
त्वं वृत्रमाशयानं सिरासु महो वज्रेण सिष्वपो वराहुम्॥११॥
हे सामर्थ्यशाली इंद्रदेवा ! जलधारांचा मार्ग रोखणाऱ्या वृत्रासुराचा आपण वज्राने वध केल्यामुळे, शक्तीसंपन्न तसेच सर्व व्यापक आकाशदेवतेने आणि पृथ्वीदेवतेने आपले अभिनंदन केले॥११॥

त्वमिन्द्र नर्यो याँ अवो नृन्तिष्ठा वातस्य सुयुजो वहिष्ठान् ।
यं ते काव्य उशना मन्दिनं दाद्वृत्रहणं पार्यं ततक्ष वज्रम् ॥१२॥
हे मानवहितकारक इंद्रदेवा ! वाऱ्यासारखे वेगवान, भार वाहण्यास कुशल, उत्तम अश्वांनी जोडलेल्या रथावर आरूढ होऊन आम्हा भक्तांच्या रक्षणा करता यावे. तसेच काव्यऋषीपुत्र ऊशनऋषींनी आपल्यासाठी तयार केलेले उत्साहवर्धक, वृत्रासुरघातक, त्याचप्रमाणे शत्रुंवर आक्रमण करणारे वज्र आपण धारण करावे ही विनंती॥१२॥

त्वं सूरो हरितो रामयो नृन्भरच्चक्रमेतशो नायमिन्द्र ।
प्रास्य पारं नवतिं नाव्यानामपि कर्तमवर्तयोऽयज्यून् ॥१३॥
हे इंद्रदेवा यज्ञ न करणाऱ्या असुरांना आपण नव्वद नद्याच्या पात्रांच्या बाहेर खोल दरीमध्ये टाकून दिले त्यावेळी आपले हरिद्रवर्णीय अश्व थकल्याने एतशऋषींनी आपला रथ ओढला॥१३॥

त्वं नो अस्या इन्द्र दुर्हणाया: पाहि वज्रिवो दुरितादभीके ।
प्र नो वाजान्रथ्यो अश्वबुध्यानिषे यन्धि श्रवसे सूनृतायै॥१४॥

हे वज्रधारी इंद्रदेवांनो ! दारिद्र्यातून आणि पापाच्या मार्गातून आमची मुक्तता करावी, त्याचप्रमाणे ऐश्वर्य, आणि अश्वांसहित रथ प्रदान करावे ही विनंती ॥१४॥

मा सा ते अस्मत्सुमतिर्वि दसद्वाजप्रमहः समिषो वरन्त ।
आ नो भज मघवन्गोष्वर्यो मंहिष्ठास्ते सधमादः स्याम॥१५॥
आपल्या सदसद् विवेकबुद्धीचा प्रभाव आमच्यावर सतत राहो. हे मघवन ! आम्हाला गोधनाने परिपूर्ण करावे आणि आम्हाला आपली कीर्ती वृद्धिंगत करणाऱ्या पुत्र-पौत्रादि ततीसह आम्हाला आनंदित करावे ही विनंती ॥१५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२२

ऋषि- कक्षीवान् औशिज देवता- विश्वेदेव छंद- त्रिष्टुप्

प्र वः पान्तं रघुमन्यवोऽन्धो यज्ञं रुद्राय मीळ्हुषे भरध्वम् ।
दिवो अस्तोष्यसुरस्य वीरैरिषुध्येव मरुतो रोदस्योः ॥१॥

हे क्षमाशील, न रागावणाऱ्या यज्ञकर्त्यांनो ! आपल्या कर्माचे फळ देणाऱ्या रुद्रदेवांना अन्नरूपी आहुती प्रदान करावी ही विनंती. ज्याप्रकारे धनुर्धारी आपल्या बाणांनी शत्रुपक्षांचा विनाश करतो त्याचप्रमाणे अनुयायांच्या सहाय्याने शत्रूंना हाकलून लावणाऱ्या रुद्रदेवांची तसेच आकाश आणि पृथ्वी यांच्यामध्ये वास्तव्य असणाऱ्या मरुद्गणांची स्तुति करावी ही विनंती ॥१॥

पत्नीव पूर्वहूतिं वावृधध्या उषासानक्ता पुरुधा विदाने ।
स्तरीर्नात्कं व्युतं वसाना सूर्यस्य श्रिया सुदृशी हिरण्यैः॥२ ॥

ज्याप्रमाणे पत्नी आपल्या पतीच्या हाकेसरशी त्याची सहाय्यता करते, त्याचप्रमाणे उषादेवता आणि रात्र आम्ही केलेल्या प्रार्थना ऐकून शीघ्रतेने आम्हाला प्रगतीच्या मार्गांवर पुढे नेऊ देत ही विनंती. उषादेवतेने शत्रूंचा नाश करणाऱ्या सूर्यदेवांप्रमाणे सौंदर्य आणि महान रूप धारण करून आमच्या यज्ञस्थानी उपस्थित रहावे ही विनंती ॥२ ॥

ममत्तु नः परिज्मा वसर्हा ममत्तु वातो अपां वृषण्वान् ।
शिशीतमिन्द्रापर्वता युवं नस्तन्नो विश्वे वरिवस्यन्तु देवाः॥३ ॥

सर्वत्र संचार करणाऱ्या, अंधाराचा नाश करणाऱ्या सूर्यदेवांनी आम्हाला सुख-शांती प्रदान करावी. जलधारांची वृष्टी करणाऱ्या वायुदेवांनी आम्हाला आनंदित करावे. इंद्रदेवांनी आणि पर्जन्यदेवांनी आम्हाला बुद्धी प्रदान करावी आणि समस्त विश्वेदेवांनी आम्हाला समृद्धी द्यावी ही विनंती ॥३ ॥

उत त्या मे यशसा श्वेतनायै व्यन्ता पान्तौशिजो हुवध्यै ।
प्र वो नपातमपां कृणुध्वं प्र मातरा रास्पिनस्यायोः॥४॥
उशिजऋषींचे पुत्र कक्षीवान्ऋषी, यश आणि तेज मिळवण्यासाठी सर्वत्र संचार करणाऱ्या, पालनपोषण करणाऱ्या अश्विनीकुमारांची प्रार्थना करत असत. हे यज्ञकर्त्यांनो आपण सत्कर्माचे संरक्षक अग्निदेवांची प्रार्थना करावी. मातापित्यासारख्या आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता यांची सुद्धा प्रार्थना करावी ही विनंती॥४॥

आ वो रुवण्युमौशिजो हुवध्यै घोषेव शंसमर्जुनस्य नंशे ।
प्र वः पूष्णे दावन आँ अच्छा वोचेय वसुतातिमग्नेः॥५॥
हे विश्वेदेवांनो घोषा नांवाच्या (घोषा ही प्राचीन वैदिक काळातील एक विद्वान स्त्री होती, जिला ऋग्वेदात दोन स्तोत्रे रचण्याचे श्रेय दिले जाते.) स्त्रीने रोगमुक्तीसाठी अश्विनीकुमारांची प्रार्थना केली होती, त्याचप्रमाणे उच्च स्वरात उशिजऋषींचे पुत्र कक्षीवान् ऋषींनी आपली स्तुती करण्याकरता स्तोत्रांचे पठण केले. आपल्यातील दानशूर पूषन् देवतेची आणि धनसंपन्न अग्निदेवांची आम्ही स्तुती करतो॥५॥

श्रुतं मे मित्रावरुणा हवेमोत श्रुतं सदने विश्वतः सीम् ।
श्रोतु नः श्रोतुरातिः सुश्रोतुः सुक्षेत्रा सिन्धुरद्भिः॥६॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघेही आम्ही करत असलेल्या विनवण्या आणि यज्ञमंडपात चारही बाजूंनी उच्चारत असलेल्या आमच्या प्रार्थना श्रवण कराव्यात ही विनंती. सुविख्यात, दानशूर जलदेवतेने आमच्या प्रार्थना ऐकून आमच्या शेतात जलवृष्टि करावी ही विनंती॥६ ॥

स्तुषे सा वां वरुण मित्र रातिर्गवां शता पृक्षयामेषु पज्रे ।
श्रुतरथे प्रियरथे दधानाः सद्यः पुष्टिं निरुन्धानासो अग्मन्॥७ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! अन्नाचे नियमन करणाऱ्या स्तोत्रांनी आम्ही आपली स्तुति करतो म्हणून आम्हाला योग्य मार्गावर जाण्यासाठी असंख्य गायींचे दान करावे ही विनंती. आपण दोघेही विख्यात आणि सुंदर रथावर आरूढ होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे आणि आमचे पालनपोषण करावे ही विनंती॥७ ॥

अस्य स्तुषे महिमघस्य राधः सचा सनेम नहुषः सुवीराः ।
जनो यः पज्रेभ्यो वाजिनीवानश्वावतो रथिनो मह्यं सूरिः॥८ ॥
आम्ही महान, श्रीमंत, शत्रूंना पराभूत करण्यास सक्षम असलेल्या, विद्वान, दानशूर विश्वेदेवांची स्तुति करत आहोत. विश्वेदेवांनी आम्हाला वीरपुत्र, उत्तम अश्व, रथ आणि विपुल संपत्ती द्यावी ही विनंती॥८ ॥

जनो यो मित्रावरुणावभिध्रुगपो न वां सुनोत्यक्ष्णयाध्रुक् ।
स्वयं स यक्ष्मं हृदये नि धत्त आप यदीं होत्राभिरृतावा॥९ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो जो माणूस आपला निष्कारण द्वेष करत असतो, आपल्यासाठी सोमरस सिद्ध न करता वैरभावना वाढवतो, यज्ञकर्मे न करता वाईट मार्गावर प्रवास करतो असा माणूस अनेक प्रकारच्या मानसिक आणि हृदयाशी संबंधित रोगाने ग्रासला जातो. परंतु सन्मार्गाने यज्ञ करणाऱ्या

स्तोत्रांचे पठण करत सोमरस सिद्ध करणाऱ्या भक्तांवर आपली कृपादृष्टी असते ॥९॥

स व्राधतो नहुषो दंसुजूतः शर्धस्तरो नरां गूर्तश्रवाः ।
विसृष्टरातिर्याति बाळ्हसृत्वा विश्वासु पृत्सु सदमिच्छूरः॥१०॥
हे विश्वेदेवांनो ! यज्ञकरणारे आपले भक्तगण; अश्वसंपन्न होऊन शत्रूंचा भयंकर विनाश करणारे, अत्यंत तेजस्वी, अतिथींचा सन्मान करणारे आणि महान बलशाली होतात. हे सर्व भक्तगण सर्व युद्धांमध्ये सामर्थ्यवान शत्रूंचा विनाश करण्यात अग्रेसर असतात॥१०॥

अध ग्मन्ता नहुषो हवं सूरेः श्रोता राजानो अमृतस्य मन्द्राः ।
नभोजुवो यन्निरवस्य राधः प्रशस्तये महिना रथवते॥११॥
हे तेजपुंज, आनंददायी, आकाशात भ्रमण करणाऱ्या विश्वेदेवांनो ! आम्हा नश्वर भक्तगणांची प्रार्थना ऐकून आमच्या यज्ञामध्ये अर्पण केलेल्या आहुतींचा स्वीकार करून प्रसन्न व्हावे ही विनंती. आपल्याशिवाय आमचा दुसरा रक्षक नाही ॥११॥

एतं शर्धं धाम यस्य सूरेरित्यवोचन्दशतयस्य नंशे ।
द्युम्नानि येषु वसुताती रारन्विश्वे सन्वन्तु प्रभृथेषु वाजम् ॥१२॥
सिद्ध केलेला सोमरस पात्रामध्ये ठेवून, आमची स्तुतियुक्त स्तोत्रे पठण करून आम्हाला प्रसन्न करत असलेल्या भक्तगणांचे सामर्थ्य आम्ही वाढवू असे विश्वदेवांनी जाहीर केले आहे. तेजपुंज, ऐश्वर्यशाली विश्वेदेवांनी आमच्या यज्ञामध्ये सहभागी होऊन अर्पण केलेले हविष्यान्न ग्रहण करावे ही विनंती॥१२॥

मन्दामहे दशतयस्य धासेर्द्विर्यत्पञ्च बिभ्रतो यन्त्यन्ना ।
किमिष्टाश्व इष्टरश्मिरेत ईशानासस्तरुष ऋञ्जते नॄन् ॥१३॥
यज्ञकर्त्यांद्वारे यज्ञस्थानी आणल्या जाणाऱ्या, दहा चमस पात्रांमध्ये ठेवलेल्या, दहा वेगवेगळ्या हविष्यान्नांची आम्ही प्रशंसा करतो. अश्वांना प्रेमाने काबूत ठेवणाऱ्या, प्रेमळ विश्वेदेवांची कृपा असलेल्या भक्तगणांचे कोणीही अहित करू शकत नाही॥१३॥

हिरण्यकर्णं मणिग्रीवमर्णस्तन्नो विश्वे वरिवस्यन्तु देवाः ।
अर्यो गिरः सद्य आ जग्मुषीरोस्राश्चाकन्तूभयेष्वस्मे ॥१४॥
हे विश्वेदेवांनो ! आम्हाला, कानामध्ये सुवर्ण आभूषणे आणि गळयामध्ये रत्नमाला परिधान केलेली सुसंतती प्रदान करावी ही विनंती. हे विश्वेदेवांनो आम्ही उद्घोष करत असलेल्या प्रार्थना आणि तूपमिश्रित आहुतींचा आपण स्वीकार करावा ही विनंती॥१४॥

चत्वारो मा मशर्शारस्य शिश्वस्त्रयो राज्ञ आयवसस्य जिष्णोः ।
रथो वां मित्रावरुणा दीर्घाप्साः स्यूमगभस्तिः सूरो नाद्यौत्॥१५॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! सुखकारक सूर्यप्रकाशासारख्या तेजस्वी रथावर आरूढ होऊन आम्हाला त्रास देणाऱ्या मशर्शारराजाच्या चार पुत्रांच्या (काम, क्रोध, लोभ आणि मोह) आणि आयवस राजाच्या तीन पुत्रांच्या(भौतिक, दैविक आणि आध्यात्मिक) त्रासांपासून आमचे संरक्षण करावे ही विनंती॥१५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२३

ऋषि- काक्षीवान् औशिज देवता- उषा छंद- त्रिष्टुप्

पृथू रथो दक्षिणाया अयोज्यैनं देवासो अमृतासो अस्थुः ।
कृष्णादुदस्थादर्या विहायाश्चिकित्सन्ती मानुषाय क्षयाय ॥१॥
कौशल्यशाली उषादेवतांचा रथ अश्व जोडून तयार झालेला आहे. या रथामध्ये अमर देवगण आरूढ झाले आहेत. थोर आणि पूज्य उषादेवता मानवांना प्रकाश प्रदान करण्यासाठी अंधार दूर करून येत आहेत॥१॥

पूर्वा विश्वस्माद्भुवनादबोधि जयन्ती वाजं बृहती सनुत्री ।
उच्चा व्यख्यद्युवतिः पुनर्भूरोषा अगन्प्रथमा पूर्वहूतौ॥२॥
संपूर्ण प्राणिमात्रांच्या आधी जागृत होणाऱ्या ,ऐश्वर्य देणाऱ्या, प्रतिदिन नव्याने अवतीर्ण होणाऱ्या, यौवन संपन्न उषादेवता उंच आकाशलोकातून सर्व जगाचे निरीक्षण करतात आणि सर्वप्रथम यज्ञस्थानी विराजमान होतात ॥२॥

यदद्य भागं विभजासि नृभ्य उषो देवि मर्त्यत्रा सुजाते ।
देवो नो अत्र सविता दमूना अनागसो वोचति सूर्याय ॥३॥
हे सुशील, सर्व प्राणिमात्रांचे पालन करणाऱ्या उषादेवते ! ज्यावेळी आपण मानवाला आपल्या प्रकाशाच्या योग्य वाटा प्रदान कराल, त्यावेळी आमच्या यज्ञस्थळी येणाऱ्या सूर्यदेवांना आम्ही निष्पाप असल्याची ग्वाही द्यावी ही विनंती ॥३॥

गृहंगृहमहना यात्यच्छा दिवेदिवे अधि नामा दधाना ।
सिषासन्ती द्योतना शश्वदागादग्रमग्रमिद्भजते वसूनाम्॥४॥
सुंदर उषादेवता प्रत्येक दिवशी नवे रूप धारण करून नम्रता पूर्वक प्रत्येकांचे घर प्रकाशमान करत येत असतात आणि यज्ञकर्त्यांनी अर्पण केलेले हविष्यान्न स्वीकारतात ॥४॥

भगस्य स्वसा वरुणस्य जामिरुषः सूनृते प्रथमा जरस्व ।
पश्चा स दघ्या यो अघस्य धाता जयेम तं दक्षिणया रथेन ॥५ ॥
हे भगनामक देवांची ((सूर्यदवांचे नांव) आणि वरुणदेवांची बहीण असलेल्या उषादेवते ! आपण सर्व देवांच्या आधी स्तुति करण्यास योग्य आहात. आपण प्रसन्न झाल्यावर,आम्हाला पीडा देणाऱ्यांचा, आपल्या रथाच्या आणि इतर साधनांच्या मदतीने पराभव करावा ही विनंती ॥५ ॥

उदीरतां सूनृता उत्पुरंधीरुदग्नयः शुशुचानासो अस्थुः ।
स्पार्हा वसूनि तमसापगूळ्हाविष्कृण्वन्त्युषसो विभातीः ॥६॥
हे यज्ञकर्त्यांनो स्तुतीच्या स्वरूपात सुंदर आणि सत्य गोष्टी कथन करा. आपल्या ज्ञानाचे दर्शन करत यज्ञासाठी तेजस्वी अग्निदेवांना प्रज्वलित करावे ही विनंती. असे केल्याने तेजस्वी उषादेवता अंधकारात लपलेली संपत्ती नव्याने प्रकट करतील॥६ ॥

अपान्यदेत्यभ्यन्यदेति विषुरूपे अहनी सं चरेते ।
परिक्षितोस्तमो अन्या गुहाकरद्यौदुषाः शोशुचता रथेन ॥७॥
एकमेकांच्या विरुद्ध दिशेने फिरणाऱ्या उषदेवता आणि रात्रदेवता ह्या दोन्ही देवता कोणत्याही अडथळ्याशिवाय भ्रमण करत असतात. एकीच उदय होत

असताना दुसरीचा अस्त होतो. रात्रदेवता अंधकाराने वस्तु आच्छादित करते तर अत्यंत तेजस्वी रथाने उषादेवता वस्तु प्रकाशमान करते॥७॥

सदृशीरद्य सदृशीरिदु श्वो दीर्घं सचन्ते वरुणस्य धाम ।
अनवद्यास्त्रिंशतं योजनान्येकैका क्रतुं परि यन्ति सद्यः ॥८॥
आजच्या उषादेवतेंच्या आगमना सारखे उद्या सुद्धा उषादेवतेंचे आगमन होणार आहे. उषादेवतेंचे आगमन वरुण देवांच्या निर्दोष मार्गाने पृथ्वीलोकी होत असते. उषादेवतेंचा प्रकाश सामर्थ्यशाली सूर्यदेवांच्या तीस योजने अगोदर पसरत असतो॥८॥

जानत्यह्नः प्रथमस्य नाम शुक्रा कृष्णादजनिष्ट श्वितीची ।
ऋतस्य योषा न मिनाति धामाहरहर्निष्कृतमाचरन्ती ॥९॥
दिवसाच्या प्रथम प्रहराला ओळखणाऱ्या उषादेवता रात्रीच्या काळ्या अंधकारातून उदयास येतात आणि सूर्यदेवांच्या तेजामध्ये विलीन होतात. सत्यप्रिय उषादेवता दररोज निश्चित वेळेस येतात आणि शोभा वाढवतात ॥९॥

कन्येव तन्वा शाशदानाँ एषि देवि देवमियक्षमाणम् ।
संस्मयमाना युवतिः पुरस्तादाविर्वक्षांसि कृणुषे विभाती ॥१०॥
हे उषादेवते ! कन्येसारखे सर्वांगाचे सौंदर्य उघड करत आपण आपल्या प्रिय, इच्छा पूर्ण करणाऱ्या पतीकडे म्हणजे सूर्यदेवांकडे जाता. त्यानंतर नवयुवतीप्रमाणे हास्य वदनाने तेजपुंज होऊन प्रकाशरूपी वक्षस्थळ प्रकट करता ॥१०॥

सुसंकाशा मातृमृष्टेव योषाविस्तन्वं कृणुषे दृशे कम् ।
भद्रा त्वमुषो वितरं व्युच्छ न तत्ते अन्या उषसो नशन्त ॥११॥

मातेने सुशोभित केलेल्या नवयुवतीप्रमाणे उषदेवता आपल्या प्रकाशरूपी दर्शनीय सर्वांगाचे प्रदर्शन करत प्रकट होतात. हे उषादेवते ! मनुष्यांचे कल्याण करण्याकरता आपण व्यापक क्षेत्र प्रकाशमान करता. असे कार्य दुसरे कोणीही करू शकणार नाही ॥११॥

अश्वावतीर्गोमतीर्विश्ववारा यतमाना रश्मिभिः सूर्यस्य ।
परा च यन्ति पुनरा च यन्ति भद्रा नाम वहमाना उषासः ॥१२ ॥
अश्व आणि गायींनी संपन्न, सर्वांकडून आदर मिळववणाऱ्या, सूर्यदेवांच्या किरणांनी अंधकार दूर करण्यास प्रयत्नशील, कल्याणकारी, यशस्वी उषादेवता दूर जाताना दिसत आहेत परंतु त्याच रूपाने त्या प्रकट होतील ॥१२ ॥

ऋतस्य रश्मिमनुयच्छमाना भद्रम्भद्रं क्रतुमस्मासु धेहि ।
उषो नो अद्य सुहवा व्युच्छास्मासु रायो मघवत्सु च स्युः ॥१३॥
हे उषा देवते ! सूर्यकिरणांच्या सान्निध्यात राहून आपण आम्हाला सत्कर्मे करण्यास प्रोत्साहित करता. आम्ही आपली प्रार्थना केल्यावर आम्हाला प्रकाशमान करावे तसेच पर्याप्त संपत्ती आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२४

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- उषा **छंद**- त्रिष्टुप्

उषा उच्छन्ती समिधाने अग्ना उद्यन्त्सूर्य उर्विया ज्योतिरश्रेत् ।
देवो नो अत्र सविता न्वर्थं प्रासावीद्द्विपत्प्र चतुष्पदित्यै॥१॥
अग्नि प्रज्वलित केल्यानंतर उषादेवता अंधाराचा नाश करतात आणि सूर्यदेवांसारखे तेज धारण करतात. उषादेवतेच्या आगमना नंतर त्याच मार्गावरून सूर्यदेव आम्हाला उपयुक्त संपत्ती देवो. मानव आणि मानवेतर प्राण्यांसाठी येण्या-जाण्याचा मार्ग प्रकाशमान करोत ही विनंती ॥१॥

अमिनती दैव्यानि व्रतानि प्रमिनती मनुष्या युगानि ।
ईयुषीणामुपमा शश्वतीनामायतीनां प्रथमोषा व्यद्यौत् ॥२॥
उषादेवता सृष्टीच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करतात आणि सतत मानवांचे आयुष्य कमी करतात. भूतकाळात आलेल्या उषादेवता आणि भविष्यकाळात येणाऱ्या उषादेवता यां मध्ये आजची उषादेवता प्रथम प्रकाश मान होते ॥२॥

एषा दिवो दुहिता प्रत्यदर्शि ज्योतिर्वसाना समना पुरस्तात् ।
ऋतस्य पन्थामन्वेति साधु प्रजानतीव न दिशो मिनाति॥३॥
स्वर्गकन्या उषादेवता प्रकाशाचे वस्त्र परिधान करून उदात्त मनाने दररोज पूर्व दिशेस उगवताना दिसतात. ज्याप्रमाणे विदुषी सत्याच्यामार्गावर विना

अडथळा दृढपणे चालते त्याचप्रमाणे उषादेवता दिशांमध्ये विनाअडथळा प्रवास करतात ॥३॥

उपो अदर्शि शुन्ध्युवो न वक्षो नोधा इवाविरकृत प्रियाणि ।
अद्मसन्न ससतो बोधयन्ती शश्वत्तमागात्पुनरेयुषीणाम् ॥४ ॥
शुद्ध आणि पवित्र सूर्यकिरणांच्या वक्षस्थळा प्रमाणे प्रकट होणाऱ्या उषादेवता नोधऋषींनी सांगितलेल्या मंत्रांप्रमाणे सर्वांग प्रदर्शित करतात. प्रातःकाळी जागृत होणाऱ्या गृहिणीप्रमाणे, अत्यंत सुंदर उषदेवता कुटुंबातील सर्व सदस्यांना सुनिश्चित वेळी जागे करतात ॥४ ॥

पूर्वे अर्धे रजसो अप्त्यस्य गवां जनित्र्यकृत प्र केतुम् ।
व्यु प्रथते वितरं वरीय ओभा पृणन्ती पित्रोरुपस्था॥५॥
विशाल अंतराळाच्या पूर्व भागात उत्पन्न होणारी, स्वर्गलोक आणि पृथ्वीलोकातील मातापित्यांच्या रूपातील निवासस्थानी राहून स्वतेजाने व्यापून टाकणाऱ्या उषादेवता सर्वत्र प्रसिद्ध झाल्या आहेत .॥५॥

एवेदेषा पुरुतमा दृशे कं नाजामिं न परि वृणक्ति जामिम् ।
अरेपसा तन्वा शाशदाना नार्भादीषते न महो विभाती ॥६॥
निर्मळ शरीराच्या, स्वतःमध्ये आणि इतरांमध्ये कोणताही भेदभाव न करणाऱ्या उषादेवता सर्व जगतास प्रकाशापासून वंचित ठेवत नाहीत. परिचित-अपरिचित, लहान-मोठा, तरुण-वृद्ध असा कुठलाही भेदभाव न करता निर्दोष शरीराच्या उषादेवता सर्वांना सारखेच प्रकाशमान करतात . ॥६॥

अभ्रातेव पुंस एति प्रतीची गर्तारुगिव सनये धनानाम् ।
जायेव पत्य उशती सुवासा उषा हस्रेव नि रिणीते अप्सः ॥७॥

जशी भावाशिवाय बहिण निराधार झाल्यानंतर तिच्या पालकांकडे परत जाते किंवा विधवा स्त्री संपत्तीतील वाटा मिळविण्यासाठी न्यायालयात जाते, किंवा सुंदर वस्त्र परिधान करून सुहास्य वदनाने पतीकडे जाणाऱ्या स्त्री प्रमाणे आपल्या किरणांचे सौंदर्य प्रकट करत उषादेवता अवतीर्ण होतात . ॥७॥

स्वसा स्वस्रे ज्यायस्यै योनिमारैगपैत्यस्याः प्रतिचक्ष्येव ।
व्युच्छन्ती रश्मिभिः सूर्यस्याञ्ज्यङ्क्ते समनगा इव व्राः ॥८॥
उषादेवतेच्या आगमनाची चाहूल लागताच उषादेवतेची कनिष्ठ भगिनी रात्र, आपले स्थान मोकळे करते. एखाद्या उत्सवात जाणाऱ्या सुंदरस्त्रीप्रमाणे सूर्यदेवांच्या किरणांनी अंधार दूर करत उषादेवता समस्त जगाला प्रकाशमान करतात .॥८॥

आसां पूर्वासामहसु स्वसॄणामपरा पूर्वामभ्येति पश्चात् ।
ताः प्रत्नवन्नव्यसीर्नूनमस्मे रेवदुच्छन्तु सुदिना उषासः ॥९॥
भूतकाळात आणि भविष्यकाळात अवतीर्ण होणाऱ्या सर्व उषादेवता एकमेकींच्या भगिनी आहेत. आज नव्याने अवतीर्ण होणाऱ्या उषादेवता मागील मंगलमयी उषादेवते प्रमाणे आम्हाला विपुल संपत्ती सह सर्वोत्तम दिवस आणतील ॥९॥

प्र बोधयोषः पृणतो मघोन्यबुध्यमानाः पणयः ससन्तु ।
रेवदुच्छ मघवद्भ्यो मघोनि रेवत्स्तोत्रे सूनृते जारयन्ती ॥१०॥
सर्व प्राण्यांचे आयुष्य एक एक दिवसाने कमी करणाऱ्या समृद्ध उषादेवते ! आपण दानशूरांना जागृत करावे, यज्ञ न करणाऱ्या व्यापाऱ्यांना (पणींना) निद्रिस्त अवस्थेत ठेवावे. यज्ञ करणाऱ्या भक्तांना वैभव प्रदान करावे ही विनंती॥१०॥

अवेयमश्वैद्युवतिः पुरस्ताद्युङ्क्ते गवामरुणानामनीकम् ।
वि नूनमुच्छादसति प्र केतुर्गृहंगृहमुप तिष्ठाते अग्निः ॥११॥
किरणांच्या स्वरूपात ताम्रवर्णीय गायींना आपल्या रथाला जोडीत उषादेवता पूर्व दिशेस अवतीर्ण होत आहे. प्रकाश रुपी ध्वज(केतू) फडकवत आकाशातील अंधार दूर करत उषादेवतेचे आगमन होताच घराघरात पवित्र अग्निदेव प्रज्वलित होतो॥११॥

उत्ते वयश्चिद्वसतेरपप्तन्नरश्च ये पितुभाजो व्युष्टौ ।
अमा सते वहसि भूरि वाममुषो देवि दाशुषे मर्त्याय ॥१२॥
हे उषादेवते! आपले आगमन होताच पक्षी त्यांच्या घरट्यांमधून उडून जातात, सर्वलोक अन्न मिळवण्याच्या इच्छेने घराबाहेर पडतात. हे उषादेवते ! आपण गृहस्थाश्रमी असणाऱ्या यज्ञकर्त्याला भरपूर धन द्यावे ही विनंती ॥१२॥

अस्तोढ्वं स्तोम्या ब्रह्मणा मेऽवीवृधध्वमुशतीरुषासः ।
युष्माकं देवीरवसा सनेम सहस्रिणं च शतिनं च वाजम् ॥१३॥
हे स्तुतिपात्र उषादेवते !आमच्या स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न होऊन आमचा उत्कर्ष करावा ही विनंती. हे दिव्य उषादेवते! आपल्या संरक्षणामुळे आम्हाला शेकडो आणि हजारो प्रकारची संपत्ती आणि धान्यांनी भरलेली शक्ती आणि बळ प्राप्त होवो ही विनंती॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२५

ऋषि- कक्षीवान् औशिज **देवता**- स्वनय दानस्तुति । **छन्दः** त्रिष्टुप्, ४-५ जगती

"स्वनय दानस्तुती" म्हणजे राजा स्वनयाने केलेल्या कक्षीवान् ऋषींना दिलेल्या दानांची स्तुती. ह्या ऋचा काक्षीवत् ऋषींनी रचल्या

प्राता रत्नं प्रातरित्वा दधाति तं चिकित्वान्प्रतिगृह्या नि धत्ते ।
तेन प्रजां वर्धयमान आयू रायस्पोषेण सचते सुवीरः॥१॥

कक्षीवान् ऋषी म्हणतात, "स्वनय राजाने सूर्योदयापूर्वी दान दिलेली संपत्ती मी नीट तपासून त्याचा स्वीकार केला. दानशूर स्वनय राजाला संतती, सेवक, दीर्घायुष्य आणि विपुल संपत्ती मिळवण्याचा आशीर्वाद दिला" ॥१॥

सुगुरसत्सुहिरण्यः स्वश्वो बृहदस्मै वय इन्द्रो दधाति ।
यस्त्वायन्तं वसुना प्रातरित्वो मुक्षीजयेव पदिमुत्सिनाति॥२ ॥

दोरीने बांधल्या प्रमाणे दररोज स्वतःहून पहाटेच्या वेळी उठून गायी, सोने आणि अश्वांनी संपन्न दानशूर राजा स्वनय याचकाला प्रचंड संपत्ती दान देतात. अशा दानशूर राजाला इंद्रदेव विपुल अन्नधान्य आणि संपत्ती प्रदान करोत ही विनंती ॥२ ॥

आयमद्य सुकृतं प्रातरिच्छन्निष्टेः पुत्रं वसुमता रथेन ।
अंशोः सुतं पायय मत्सरस्य क्षयद्वीरं वर्धय सूनृताभिः ॥३॥

(दानशूर राजा स्वानय यज्ञ करणाऱ्यांना म्हणतो), "हे यज्ञकर्त्यांनो प्रातःकाळी तुमच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी आणि सर्वोत्तम कर्तव्ये पार पाडण्यासाठी

धनाने सजवलेल्या रथातून येथे यज्ञस्थळी आलो आहे. मला सुखदायक, उत्साहवर्धक सोमरस, अर्पण करून मला संतुष्ट करा"॥३॥

उप क्षरन्ति सिन्धवो मयोभुव ईजानं च यक्ष्यमाणं च धेनवः ।
पृणन्तं च पपुरिं च श्रवस्यवो घृतस्य धारा उप यन्ति विश्वतः॥४॥
यज्ञ करणाऱ्या आणि यज्ञ करण्याचा संकल्प करणाऱ्या उपासकांच्या निवासस्थानी सुख देणाऱ्या दुभत्या गायी नियमितपणे येत असतात. पूर्वजांना नैवेद्य दाखवणाऱ्या आणि सर्व प्राणिमात्रांना प्रसन्न करणाऱ्या आणि समाधान देणाऱ्या, शुभसकाळी, उपासकाकडे समृद्धी देणाऱ्या तुपाच्या धारा सर्व बाजूनी वाहू लागतात॥४॥

नाकस्य पृष्ठे अधि तिष्ठति श्रितो यः पृणाति स ह देवेषु गच्छति ।
तस्मा आपो घृतमर्षन्ति सिन्धवस्तस्मा इयं दक्षिणा पिन्वते सदा॥५॥
याचकास संपत्ती आणि धान्य देणारा उपासक स्वर्गीय सुख आणि देवत्व प्राप्त करतो. वाहत्या नद्यांतील पाणी त्या उपासकाला ऊर्जा देते आणि पृथ्वी भरपूर पिकांनी तृप्त करते.॥५॥

दक्षिणावतामिदिमानि चित्रा दक्षिणावतां दिवि सूर्यासः ।
दक्षिणावन्तो अमृतं भजन्ते दक्षिणावन्तः प्र तिरन्त आयुः॥६॥
याचकाला दान करणाऱ्या उपासकाला असाधारण गोष्टी मिळतात आणि त्यांचे उत्पन्न वाढते. सूर्यदेव अशा उपासकाला आरोग्य प्रदान करतात. याचकाला दान करणाऱ्या उपासकाला दीर्घ आयुष्य मिळते आणि तो अमरत्व प्राप्त करतो॥६॥

मा पृणन्तो दुरितमेन आरन्मा जारिषुः सूरयः सुव्रतासः ।

अन्यस्तेषां परिधिरस्तु कश्चिदपृणन्तमभि सं यन्तु शोकाः॥७॥

जे उपासक यज्ञाच्या उदात्त कार्याने आणि कल्याणकारी दानाने लोकांना संतुष्ट करतात ते दुःख आणि पापी कृत्यांपासून दूर राहतात. विद्वान साधक व्रताचे पालन करणारे वृद्धापकाळापासून दूर राहतात. या दोघांच्या व्यतिरिक्त जे दान आणि स्तुती करत नाहीत ते पापाने आणि दुःखाने ग्रस्त असतात॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२६

ऋषि- कक्षीवान् औशिज

देवता- १-५आणि ७ स्वनय भावयव्य; ६ रोमशा (स्वनय राजाची पत्नी) ।

छन्द- त्रिष्टुप्; ६-७ अनुष्टुप् ।

अमन्दान्स्तोमान्प्र भरे मनीषा सिन्धावधि क्षियतो भाव्यस्य ।
यो मे सहस्रममिमीत सवानतूर्तो राजा श्रव इच्छमानः॥१॥

कक्षीवान् ऋषी म्हणतात, " मी सिंधू नदीच्या तीरावर निवास करणाऱ्या कीर्तीची आकांक्षा बाळगणाऱ्या माझ्यासाठी सहस्त्र यज्ञ करणाऱ्या स्वानय भावयव्य राजासाठी स्तोत्रांची रचना करीत आहे" ॥१॥

शतं राज्ञो नाधमानस्य निष्काञ्छतमश्वान्प्रयतान्त्सद्य आदम् ।
शतं कक्षीवाँ असुरस्य गोनां दिवि श्रवोऽजरमा ततान ॥२॥

कक्षीवान् ऋषी म्हणतात, "दानशूर स्वनय भावयव्य राजाने माझी प्रार्थना करून मला दिलेल्या शंभर सुवर्णमुद्रा, शंभर घोडे आणि शंभर बैलांचे दान मी स्वीकारले. या दानामुळे राजाची कीर्ती स्वर्गात सर्वत्र पसरली"॥२॥

उप मा श्यावाः स्वनयेन दत्ता वधूमन्तो दश रथासो अस्थुः ।
षष्टिः सहस्रमनु गव्यमागात्सनत्कक्षीवाँ अभिपित्वे अह्नाम् ॥३॥

कक्षीवान् ऋषी म्हणतात, " स्वनय भावयव्य राजाने, उत्तम घोड्यांनी जोडलेले दहा रथ, साठ सहस्र गायींचे दान मी स्वीकारले आणि दिवस मावळण्याच्या आत ते सर्व माझ्या घराच्या दारात हजर झाले" ॥३॥

चत्वारिंशद्दशरथस्य शोणाः सहस्रस्याग्रे श्रेणिं नयन्ति ।
मदच्युतः कृशनावतो अत्यान्कक्षीवन्त उदमृक्षन्त पज्राः ॥४॥
कक्षीवान् ऋषी म्हणतात, " सहस्रावधी गायी मागे असलेले, एका रांगेतील दहा रथ सोन्याच्या दागिन्यांनी सजवलेले, आरक्त वर्णीय, चपळ अश्व ओढून आणत आहेत. माझ्या कुळातील वंशजांनी या अश्वांना स्वच्छ केले"॥४॥

पूर्वामनु प्रयतिमा ददे वस्त्रीन्युक्ताँ अष्टावरिधायसो गाः ।
सुबन्धवो ये विश्या इव व्रा अनस्वन्तः श्रव ऐषन्त पज्राः ॥५॥
कक्षीवान् ऋषी म्हणतात, " हे चांगले आचरण असलेल्या बंधूंनो ! तुमच्या वरच्या प्रेमाने तीन बैल जोड्या, आठ रथ, आणि अगणित किमतीच्या गुरा ढोरांचे दान मी स्वीकारले आहे. आपण सर्वांनी प्रेमाने जगणाऱ्या कुटुंबासारखे राहावे" ॥५॥

आगधिता परिगधिता या कशीकेव जङ्गहे ।
ददाति मह्यं यादुरी याशूनां भोज्या शता ॥६॥
स्वनय भावयव्य, आपली पत्नी रोमशाला उद्देशून म्हणाले - " संभोगसमयी जशी नकुली(मुंगूस मादी) तिच्या पतीला चिकटून राहते, त्याला मिठी मारल्यानंतर बराच काळ आनंद घेते, त्याचप्रमाणे वाळूमध्ये बरबटलेली रोमशा शेकडो वेळा सुख देते"॥६ ॥

उपोप मे परा मृश मा मे दभ्राणि मन्यथाः ।
सर्वाहमस्मि रोमशा गन्धारीणामिवाविका॥७॥
रोमशा तिच्या पतीला (स्वनय भावयव्य राजाला) म्हणते, "जवळ ये आणि मला स्पर्श कर. गांधारदेशाच्या मेंढ्यासारखे केसाने झाकलेल्या माझ्या शरीराच्या अवयवांना कमी लेखू नकोस. मी अंगांनी भरलेली आहे ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२७

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता**- अग्नि **छन्द**- अविशिष्ट अत्यष्टि ; ६ अतिधृति

अग्निं होतारं मन्ये दास्वन्तं वसुं सूनुं सहसो
जातवेदसं विप्रं न जातवेदसम् ।
य ऊर्ध्वया स्वध्वरो देवो देवाच्या कृपा ।
घृतस्य विभ्राष्टिमनु वष्टि शोचिषाजुह्वानस्य सर्पिषः ॥ ॥१॥

आम्ही अग्निदेवांचे आवाहनकर्ते, दैवी गुणांनी संपन्न, बलपुत्र, उदात्त कर्म करणाऱ्या, दानशूर, ऊर्ध्वगामी ज्वालांनी प्रकाशित झालेल्या आणि विशाल विस्तार असलेल्या अग्निदेवांना सर्वज्ञ मानतो. यज्ञ करण्यास सक्षम असलेले ज्ञानी अग्निदेव यज्ञात वितळणाऱ्या घृताचे (तुपाचे) तेज शोषून घेतात ॥१॥

यजिष्ठं त्वा यजमाना हुवेम ज्येष्ठमङ्गिरसां
विप्र मन्मभिर्विप्रेभिः शुक्र मन्मभिः ।
परिज्मानमिव द्यां होतारं चर्षणीनाम् ।
शोचिष्केशं वृषणं यमिमा विशः प्रावन्तु जूतये विशः ॥२॥

हे यज्ञ करण्यास पात्र असलेले आम्ही, यज्ञकर्ते आङ्गिरस ऋषींच्या वंशाचा आदिपुरुष असणाऱ्या, पूजनीय, ज्ञानी आणि तेजस्वी अग्निदेवांचे ध्यानपूर्वक मंत्रांच्या पठणाने आवाहन करीत आहोत. तेजस्वी, सूर्यदेवांसारखे गतिमान, केसांसारख्या ज्वाळा असलेल्या अग्निदेवांना यज्ञकर्ते प्रसन्न करतात.॥२॥

स हि पुरू चिदोजसा विरुक्मता दीद्यानो भवति द्रुहंतरः परशुर्न द्रुहंतरः ।
वीळु चिद्यस्य समृतौ श्रुवद्वनेव यत्स्थिरम् ।
निःषहमाणो यमते नायते धन्वासहा नायते ॥३॥
अग्निदेव तेजस्वी शक्तीने परिपूर्ण आहेत. शत्रूंमध्ये भीती निर्माण करतात. कुऱ्हाडीच्या प्रहाराने शत्रूंचा नाश करतात. अग्निदेवांच्या संपर्कात येणाऱ्या सर्व जलमय आणि कठीण वस्तू नष्ट होतात. शत्रूंचा नाश करणाऱ्या धनुर्धराप्रमाणे अग्निदेव ठामपणे उभे राहतात॥३॥

दृळ्हा चिदस्मा अनु दुर्यथा विदे
तेजिष्ठाभिररणिभिर्दाष्ट्यवसेऽग्नये दाष्ट्यवसे ।
प्र यः पुरूणि गाहते तक्षद्वनेव शोचिषा ।
स्थिरा चिदन्ना नि रिणात्योजसा नि स्थिराणि चिदोजसा ॥४॥
ज्याप्रमाणे बलवान (शक्तिशाली) पुरुष विद्वानांना पैसे अर्पण करतात, त्याचप्रमाणे प्रत्येक मंत्रानंतर बलवान पुरुष अग्निदेवांना नैवेद्य अर्पण करतात. मंथनातून प्रकट होणारा अग्निदेव आपल्या भयंकर ज्वालांनी वनांमध्ये प्रवेश करून वनाला जाळतो आणि आपल्या तेजाने धान्य शिजवतो. अग्निदेव आपल्या तेजाने बलवान शत्रूंचा नाश करतात ॥४॥

तमस्य पृक्षमुपरासु धीमहि नक्तं
यः सुदर्शतरो दिवातरादप्रायुषे दिवातरात् ।
आदस्यायुर्ग्रभणवद्वीळु शर्म न सूनवे ।
भक्तमभक्तमवो व्यन्तो अजरा अग्नयो व्यन्तो अजराः ॥५॥
जो दिवसापेक्षा रात्री अधिक सुंदर दिसतो, अशा अग्निदेवांना आम्ही यज्ञामध्ये आहुती अर्पण करतो. मुलाला घर देणाऱ्या वडिलांच्या मायेने आपण अग्निदेवांना नैवेद्य अर्पण करतो. अग्निदेव, भक्त किंवा अभक्त यांच्यामध्ये

कोणताही भेदभाव न ठेवता कोणीही आहुतीत दिलेल्या नैवेद्याचा स्वीकार करतात. अग्निदेव सर्वांना ओळखून भक्त किंवा अभक्तांचे रक्षण करतात. नैवेद्य ग्रहण करून अग्निदेव चिरतरुण रहातात ॥५॥

स हि शर्धो न मारुतं तुविष्वणिरप्नस्वतीषूर्वरास्विष्टनिरार्तनास्विष्टनिः ।
आदद्धव्यान्यादर्दिर्यज्ञस्य केतुरर्हणा ।
अध स्मास्य हर्षतो हृषीवतो विश्वे
जुषन्त पन्थां नरः शुभे न पन्थाम् ॥६॥

सुपीक क्षेत्रातील किंवा युद्धभूमीवरील कोणत्याही यज्ञस्थळी पूजनीय अग्निदेव वेगवान वाऱ्याप्रमाणे मोठ्याने गर्जना करतात. यज्ञाच्या ध्वजासारखे पूजनीय अग्निदेव नैवेद्य स्वीकारत ग्रहण करतात. कल्याणकारी सुख मिळवण्यासाठी राजमार्गा वरून चालणाऱ्या लोकांप्रमाणे सर्व देवगण अग्निदेवांच्या मार्गाचे अनुसरण करतात॥६॥

द्विता यदीं कीस्तासो अभिद्यवो नमस्यन्त
उपवोचन्त भृगवो मथ्नन्तो दाशा भृगवः ।
अग्निरीशे वसूनां शुचिर्यो धर्णिरेषाम् ।
प्रियाँ अपिधीँर्वनिषीष्ट मेधिर आ वनिषीष्ट मेधिरः ॥७॥

आहुती देण्यासाठी मंथनातून अग्निदेवांना प्रज्वलित करणारे स्तोत्रांचे पठण करणारे, तेजस्वी आणि नम्र भृगुवंशात जन्मलेले महान महर्षी दोन प्रकारे प्रार्थना करतात. सर्वात पवित्र, ज्ञानी अग्निदेवांनी आम्ही प्रेमाने अर्पण केलेल्या आहुतींचा स्वीकार करवा ही विनंती ॥७॥

(श्रौत आणि स्मार्त असे दोन प्रकारचे यज्ञ आहेत
श्रौतकर्मे कठीण आणि वेळखाऊ असतात उदाहरणार्थ अग्निहोत्र, वाजपेय, अश्वमेध यज्ञ.

स्मार्तकर्मे त्या मानाने सोपी आणि कमी वेळ खाऊ असतात उदाहरणार्थ दैनंदिन पूजा, संध्या इत्यादि)

विश्वासां त्वा विशां पतिं हवामहे सर्वासां
समानं दम्पतिं भुजे सत्यगिर्वाहसं भुजे ।
अतिथिं मानुषाणां पितुर्न यस्यासया ।
अमी च विश्वे अमृतास आ वयो हव्या देवेष्वा वयः ॥८॥
आम्ही यज्ञकर्ते समस्त लोकांचा रक्षक, घराचा रक्षक, सत्यवादी, समान विचारी अग्निदेवांची अतिथींप्रमाणे पूजा करतो. ज्या प्रमाणे पुत्राला वडील अन्न देतात, त्याचप्रमाणे समस्त देवगण अग्निदेवांकडे नैवेद्य देण्यासाठी येतात. त्याच भावनेने यज्ञकर्ते देवांना नैवेद्य दाखविण्यासाठी अग्निदेवांना नैवेद्य अर्पण करतात ॥८॥

त्वमग्ने सहसा सहन्तमः शुष्मिन्तमो
जायसे देवतातये रयिर्न देवतातये ।
शुष्मिन्तमो हि ते मदो द्युम्निन्तम उत क्रतुः ।
अध स्मा ते परि चरन्त्यजर श्रुष्टीवानो नाजर ॥९॥
हे शक्तीपूर्वक आणि सामर्थ्याने शत्रूंचा नाश करणाऱ्या अग्निदेवा ! आपण तेजस्वी रूपात प्रकट झाला आहात. ज्याप्रमाणे देवांच्या यज्ञांसाठी धन प्रकट होते, त्याचप्रमाणे अग्निदेव यज्ञांच्या रक्षणासाठी प्रकट होतात. यज्ञामध्ये प्रज्वलित होताना निर्माण होणारा आपला आनंद अत्यंत शक्तिशाली आहे. आपली कृत्ये अत्यंत तेजस्वी आहेत. चिरतरुण अग्निदेव भक्तांना सदैव तरुण ठेवतात आणि त्यामुळे यज्ञकर्ते अग्निदेवांची दूत म्हणून सेवा करतात॥९॥

प्र वो महे सहसा सहस्वत उषर्बुधे

पशुषे नाग्नये स्तोमो बभूत्वग्नये ।
प्रति यदीं हविष्मान्विश्वासु क्षासु जोगुवे ।
अग्रे रेभो न जरत ऋषूणां जूर्णिर्होत ऋषूणाम् ॥१०॥
पशु आदींचे दान देणारा दानशूर माणूस, दुसऱ्या माणसा माणसांनी केलेल्या स्तुतीमुळे प्रसन्न होतो त्याचप्रमाणे हे यज्ञकर्त्यांनो आपल्या गौरवशाली स्तुतीमुळे शत्रुनाशक आणि सकाळी जागृत होणारे अग्निदेव प्रसन्न होवोत. गरीब माणूस श्रीमंतांची स्तुती करतो त्याचप्रमाणे स्तुती करण्यात कुशल असलेला यज्ञकर्ता अग्निदेवांची स्तुती करतो ॥१०॥

स नो नेदिष्ठं ददृशान आ भराग्ने देवेभिः
सचनाः सुचेतुना महो रायः सुचेतुना ।
महि शविष्ठ नस्कृधि संचक्षे भुजे अस्यै ।
महि स्तोतृभ्यो मघवन्त्सुवीर्यं मथीरुग्रो न शवसा ॥११॥
हे निकटवर्ती दैदिप्यमान अग्निदेवा ! आपण देवांनाही पूजनीय आहात. आम्हा भक्तांवर कृपादृष्टी ठेवून दयाळूपणे आम्हाला संपत्ती प्रदान करावी ही विनंती. हे शक्तिशाली अग्निदेवा ! दीर्घायुष्य उपभोगण्यासाठी आम्हाला अन्न प्रदान करावे ही विनंती. हे अग्निदेवा !आम्हाला शक्तिशाली आणि शूर बनवावे, आपल्या सामर्थ्याने शत्रूंचा नाश करावा ही विनंती॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२८

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता**- अग्नि **छन्द**- अत्यष्टि

अयं जायत मनुषो धरीमणि होता यजिष्ठ
उशिजामनु व्रतमग्निः स्वमनु व्रतम् ।
विश्वश्रुष्टिः सखीयते रयिरिव श्रवस्यते ।
अदब्धो होता नि षददिळस्पदे परिवीत इळस्पदे ॥१॥

देवांना आवाहन करणारे आणि यज्ञासाठी योग्य, असे अग्निदेव यज्ञकर्त्यांच्या यज्ञातील यज्ञकर्मे संपन्न करण्यासाठी अवतीर्ण झाले. मैत्रीची इच्छा बाळगणाऱ्या भक्ताला, धनाची इच्छा असलेल्या भक्ताला संपत्तीचा प्रचंड साठा देणारे अग्निदेव यज्ञवेदी मध्ये स्थापित होतात. यज्ञवेदी पृथ्वीवरील सर्वोत्तम ठिकाणी आहे. यज्ञकर्त्यांनी वेढलेले अग्निदेव यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित होतात ॥१॥

तं यज्ञसाधमपि वातयामस्यृतस्य पथा
नमसा हविष्मता देवताता हविष्मता ।
स न ऊर्जामुपाभृत्यया कृपा न जूर्यति ।
यं मातरिश्वा मनवे परावतो देवं भाः परावतः ॥२॥

यज्ञसंपादक अग्निदेवांची आम्ही नम्रतेने, स्तोत्राच्या पठणाने, तुपाच्या आणिहविष्यान्नाच्या आहुतीने, अग्निदेव तृप्त होईपर्यंत उपासना करतो. आम्ही देत असलेल्या आहुतींनी अग्निदेवांचे तेज नष्ट होणार नाही. मातरिश्वाने मानवांसाठी दूर देशातून अग्निदेवांना आणून प्रज्वलित केले त्याचप्रमाणे

अग्निदेवांनी दूरच्या प्रदेशातून आमच्या यज्ञामध्ये प्रज्वलित व्हावे ही विनंती ॥२॥

एवेन सद्यः पर्येति पार्थिवं मुहुर्गी रेतो वृषभः
कनिक्रदद्दधद्रेतः कनिक्रदत् ।
शतं चक्षाणो अक्षभिर्देवो वनेषु तुर्वणिः ।
सदो दधान उपरेषु सानुष्वग्निः परेषु सानुषु ॥३॥
स्तुतियोग्य, असंख्य ज्वाळांनी सृष्टीला प्रकाशमान करणारे, जवळच्या आणि दूरच्या पर्वत शिखरांवर आसनस्थ होणारे, शक्तिशाली, गर्जना करणारे, शत्रूंचा नाश करणारे अग्निदेव सहजतेने पृथ्वीला प्रदक्षिणा घालतात॥३॥

स सुक्रतुः पुरोहितो दमेदमेऽग्निर्यज्ञस्याध्वरस्य
चेतति क्रत्वा यज्ञस्य चेतति ।
क्रत्वा वेधा इषूयते विश्वा जातानि पस्पशे ।
यतो घृतश्रीरतिथिरजायत वह्निर्वेधा अजायत ॥४॥
सद्गुणी, महापराक्रमी अग्निदेव घराघरातील यज्ञवेदी मध्ये प्रज्वलित होतात आणि यज्ञकार्य संपन्न करतात. पूजनीय आणि ज्ञानी अग्निदेव अन्नाची इच्छा असलेल्यांना त्वरित कृति द्वारे सर्व उपयुक्त साहित्य प्रदान करतात. तुपाची आहुती स्वीकारणारे,अतिथि म्हणून आलेले बुद्धिमान अग्निदेव नैवेद्य स्वीकारण्यासाठी प्रकट झाले. ॥४॥

क्रत्वा यदस्य तविषीषु पृञ्चतेऽग्नेरवेण
मरुतां न भोज्येषिराय न भोज्या ।
स हि ष्मा दानमिन्वति वसूनां च मज्मना ।
स नस्त्रासते दुरितादभिह्रुतः शंसादघादभिह्रुतः ॥५॥

ज्याप्रमाणे मरुद्गण अग्निदेवांना अन्न देतात (प्रज्वलित करतात) किंवा सदगुणी पुरुष याचकाला अन्नदान करतात त्याचप्रमाणे यज्ञकर्ते आदराने अग्निदेवांना आहुती अर्पण करतात. यज्ञकर्त्यांना धनसंपन्न करणारे अग्निदेव आमचे पापापासून आणि शत्रूंच्या उपद्रवा पासून आरक्षण करोत ही विनंती. अग्निदेव आपल्याला वेदनादायक आणि हिंसक पापांपासून वाचवतात ॥५॥

विश्वो विहाया अरतिर्वसुर्दधे हस्ते दक्षिणे
तरणिर्न शिश्रथच्छ्रवस्यया न शिश्रथत् ।
विश्वस्मा इदिषुध्यते देवत्रा हव्यमोहिषे ।
विश्वस्मा इत्सुकृते वारमृण्वत्यग्निर्द्वारा व्यृण्वति ॥६॥
सूर्यदेवांप्रमाणे जगद्-व्यापी, महान आणि शक्तिशाली अग्निदेवही यज्ञकर्त्या भक्तांना देण्यासाठी उजव्या हातात धन धारण करतात. सत्कर्म करणाऱ्या भक्तांसाठी अग्निदेवांची मूठ धन देण्यासाठी मुक्त असते. हे अग्निदेवा ! सर्व देवगणांना आहुती देणाऱ्या, सत्कर्म करणाऱ्यांना धनाचे द्वार उघडून आपण त्यांना धन देता ॥६॥

स मानुषे वृजने शंतमो हितोऽग्निर्यज्ञेषु जेन्यो
न विश्पतिः प्रियो यज्ञेषु विश्पतिः ।
स हव्या मानुषाणामिळा कृतानि पत्यते ।
स नस्त्रासते वरुणस्य धूर्तेर्महो देवस्य धूर्तेः ॥७॥
मानवाने पापांचे निवारण करण्यासाठी केलेल्या यज्ञांमध्ये अग्निदेव सहाय्यक असतात. एखाद्या विजयी राजाप्रमाणे अग्निदेव यज्ञस्थळी यज्ञकर्त्यांचे रक्षण करतात. अग्निदेव यज्ञकर्त्यांना संतुष्ट करतात. यज्ञकर्त्यांनी अर्पण केलेल्या अ हविष्यान्नाचा कोणताही संकोच न करता अग्निदेव स्वीकार करतात.

अग्निदेवांनी आमच्या यज्ञाच्या विरोधकांपासून आणि तेजस्वी देवांच्या क्रोधा पासून आम्हाला वाचवावे ही विनंती ॥७॥

अग्निं होतारमीळते वसुधितिं प्रियं
चेतिष्ठमरतिं न्येरिरे हव्यवाहं न्येरिरे ।
विश्वायुं विश्ववेदसं होतारं यजतं कविम् ।
देवासो रण्वमवसे वसूयवो गीर्भी रण्वं वसूयवः ॥८॥
सर्व यज्ञकर्ते धनदाता, सर्वप्रिय, ज्ञानदाता, दररोज प्रज्वलित होणाऱ्या अग्निदेवांची यज्ञकार्यांमध्ये स्तुती करतात. यज्ञकर्त्यांच्या प्रयत्नामुळे सर्वज्ञ, देव-योग्य, पूजनीय आणि क्रांतिकारी, सर्व प्राण्यांचे जीवन असलेले अग्निदेव यशस्वीरीत्या प्रज्वलित होतात. संपत्तीच्या इच्छेने प्रेरित होऊन यज्ञकार्य करणारे, अग्निदेवांची मधुर स्तोत्रांनी स्तुती करतात ॥८॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १२९

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता**- अग्नि

छन्द- १-७,१० अत्यष्टि ८,९ अतिशक्वरी ११ अष्टी

यं त्वं रथमिन्द्र मेधसातयेऽपाका सन्तमिषिर प्रणयसि प्रानवद्य नयसि ।
सद्यश्चित्तमभिष्टये करो वशश्च वाजिनम् ।
सास्माकमनवद्य तूतुजान वेधसामिमां वाचं न वेधसाम् ॥१॥

हे पापरहित, प्रेरणादायी, निर्दोष इंद्रदेवा ! आपण आपला रथ घेऊन ज्ञानसंपन्न यज्ञकर्त्यांच्या यज्ञस्थळी जाता आणि त्यांना धन, ज्ञान इत्यादींनी समृद्ध करतात. हे इंद्रदेवा यज्ञकर्त्यांच्या सर्व इच्छा त्वरेने पुऱ्या कराव्यात आणि त्यांना अन्न पुरवावे ही विनंती. हे इंद्रदेवा आपण सर्व पुरोहितांमध्ये श्रेष्ठ आहात. ज्या वेगाने आपण आमच्या प्रार्थना स्वीकारता त्याच वेगाने आम्ही अर्पण करत असलेले हविष्यान्न आपण ग्रहण करावे ही विनंती॥१॥

स श्रुधि यः स्मा पृतनासु कासु चिद्दक्षाय्य इन्द्र भरहूतये नृभिरसि प्रतूर्तये नृभिः ।
यः शूरैः स्वः सनिता यो विप्रैर्वाजं तरुता ।
तमीशानास इरधन्त वाजिनं पृक्षमत्यं न वाजिनम्॥२॥

हे इंद्रदेवा ! वीरपुरुषांच्या बरोबर शत्रूंचा नाश करण्यात आपण कुशल आहात. भरण-पोषण करणाऱ्या आत्मनिर्भर भक्तगणांना आपण शक्ती आणि सामर्थ्य देता. ज्याप्रमाणे बलवान लोक घोड्यांचा आधार घेतात,

त्याचप्रमाणे बलवान लोक तेजस्वी इंद्रदेवांचा आधार घेतात. हे इंद्रदेवा ! आपण आमची प्रार्थना ऐकावी ही विनंती ॥२॥

दस्मो हि ष्मा वृषणं पिन्वसि त्वचं कं चिद्यावीररुं
शूर मर्त्यं परिवृणक्षि मर्त्यम् ।
इन्द्रोत तुभ्यं तद्दिवे तद्रुद्राय स्वयशसे ।
मित्राय वोचं वरुणाय सप्रथः सुमृळीकाय सप्रथः ॥॥३॥
हे बलशाली इंद्रदेवा ! आपण, माणसासारख्या सतत हालचाल करणाऱ्या ढगांना काबूत आणून त्यांना विदीर्ण करून जलवृष्टी करण्यास भाग पाडता. हे इंद्रदेवा आपल्या शत्रूंचा विनाश करणाऱ्या पराक्रमाचे गुणगान आम्ही स्वर्गलोकांतील अग्निदेव, वरुणदेव, मित्रदेव,आदि देवांपर्यंत पोहोचवतो ॥३॥

अस्माकं व इन्द्रमुश्मसीष्टये सखायं विश्वायुं
प्रासहं युजं वाजेषु प्रासहं युजम् ।
अस्माकं ब्रह्मोतयेऽवा पृत्सुषु कासु चित् ।
नहि त्वा शत्रुः स्तरतेः स्तृणोषि यं विश्वं शत्रुं: स्तृणोषि यम् ॥॥४॥
हे यज्ञकर्त्यांनो ! आपल्या सर्वांचे मित्र असलेल्या, सर्व यज्ञांमध्ये सहभागी होणाऱ्या, शत्रुनाशक, मदत करणाऱ्या इंद्रदेवांना आपल्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी आपण विनंती करूया. युद्धभूमीमध्ये इंद्रदेव आपल्या सर्व शत्रूंचा संहार करतात. कोणताही शत्रु इंद्रदेवांशी सामना करू शकत नाही ॥४॥

नि षू नमातिमतिं कयस्य
चित्तेजिष्ठाभिररणिभिर्नोतिभिरुग्राभिरुग्रोतिभिः ।
नेषि णो यथा पुरानेनाः शूर मन्यसे ।

विश्वानि पूरोरप पर्षि वह्निरासा वह्निर्नो अच्छ॥५॥

हे महापराक्रमी इंद्रदेवा ! आपण आपल्या शक्तिशाली आणि संरक्षणाच्या साधनांच्या तेजाने शत्रूंचा पराभव करतात. हे इंद्रदेवा ! आपण शत्रूंचा संहार करत असलात तरीही पापमुक्त आहात. प्राचीन काळी आमच्या पूर्वजांना आपण ज्या मार्गाने पापमुक्त केले त्याच सन्मार्गाने आम्हाला पापमुक्त करावे ही विनंती. आपण आमच्या यज्ञस्थळी येऊन आम्हाला यज्ञाचे फळ द्यावे ही विनंती॥५॥

प्र तद्वोचेयं भव्यायेन्दवे हव्यो न य इषवान्मन्म रेजति रक्षोहा मन्म रेजति ।

स्वयं सो अस्मदा निदो वधैरजेत दुर्मतिम् ।

अव स्रवेदघशंसोऽवतरमव क्षुद्रमिव स्रवेत् ॥६॥

सतत प्रगती करणाऱ्या, राक्षसांचा नाश करणाऱ्या इंद्रदेवांना आम्ही स्तोत्र पठणाने यज्ञस्थळी येण्याची विनंती करतो, त्या वेळेस इंद्रदेव उत्सुकतेने आमच्या यज्ञस्थळी येतात. हे इंद्रदेवा ! आपण आमच्या निंदकांचा वध करावा, त्यांची बुद्धी नष्ट करावी ही विनंती. हे इंद्रदेवा ! ज्या प्रमाणे थोडेसे पाणी नष्ट होते त्याच प्रमाणे आमच्या शत्रूंचा आपण नाश करावा ही विनंती ॥६॥

वनेम तद्धोत्रया चितन्त्या वनेम रयिं रयिवः सुवीर्यं रण्वं सन्तं सुवीर्यम् ।

दुर्मन्मानं सुमन्तुभिरेमिषा पृचीमहि ।

आ सत्याभिरिन्द्रं द्युम्नहूतिभिर्यजत्रं द्युम्नहूतिभिः ॥७॥

हे इंद्रदेवा आम्ही स्तोत्रांद्वारे आपल्या गुणांचे वर्णन करत आपल्याकडे आलो आहोत. हे इंद्रदेवा! आम्हाला सुंदर, शक्तिशाली, मोहक, पुत्र आणि सेवकांनी

संपन्न अशी अविनाशी संपत्ती प्राप्त होवो ही विनंती. हे इंद्रदेवा आम्ही सर्वोत्तम स्तोत्रांनी आणि हविष्यान्नानी आपली सेवा करत आहोत ॥७॥

प्रप्रा वो अस्मे स्वयशोभिरूती परिवर्ग इन्द्रो दुर्मतीनां दरीमन्दुर्मतीनाम् ।
स्वयं सा रिषयध्यै या न उपेषे अत्रैः ।
हतेमसन्न वक्षति क्षिप्रा जूर्णिर्न वक्षति॥८॥
हे इंद्रदेवा आपल्या तेजस्वी संरक्षण शक्तीद्वारे, दुष्ट मनाच्या लोकांच्या विरुद्ध विनाशकारी युद्धात आमचे रक्षण करून त्यांचा नाश करावा ही विनंती. हे इंद्रदेवा ! आपण पाठीराखे असल्याने भक्षक शत्रूंनी पाठवलेले वेगवान सैन्य स्वतःहून नष्ट होऊन आमच्या पर्यंत पोचणार नाही ॥८॥

त्वं न इन्द्र राया परीणसा याहि पथाँ अनेहसा पुरो याह्यरक्षसा ।
सचस्व नः पराक आ सचस्वास्तमीक आ ।
पाहि नो दूरादारादभिष्टिभिः सदा पाह्यभिष्टिभिः॥९॥
हे इंद्रदेवा ! दूर अंतरावरून, राक्षसरहित, निर्दोष आणि सुरक्षित मार्गाने आमच्यासाठी धनधान्य घेऊन यावे ही विनंती. आपण दूर किंवा जवळ कुठेही असलात तरी आमचे रक्षण करावे आणि उपयुक्त गोष्टींचे दान करून आम्हाला प्रत्येक प्रकारे मदत करावी ही विनंती॥९॥

त्वं न इन्द्र राया तरूषसोग्रं चित्त्वा महिमा सक्षदवसे महे मित्रं नावसे ।
ओजिष्ठ त्रातरविता रथं कं चिदमर्त्य ।
अन्यमस्मद्रिरिषेः कं चिदद्रिवो रिरिक्षन्तं चिदद्रिवः ॥१०॥
हे पराक्रमी, पालनपोषणकर्त्या , रक्षक आणि अमर इंद्रदेवा ! आम्हाला सुखकर संपत्तीचे दान करून दुःख आणि क्लेशापासुन मुक्त करावे ही विनंती. हे बलसंपन्न इंद्रदेवा ! आपल्या विशेष रथावर आरूढ होऊन आमच्या

यज्ञस्थळी यावे ही विनंती. हे सूर्यासारख्या तेजस्वी इंद्रदेवा ! आपल्या सान्निध्यात आम्ही निवास केला पाहिजे. आमच्या हिंसक शत्रूंचा आपण नाश करावा ही विनंती ॥१०॥

पाहि न इन्द्र सुष्टुत स्निधोऽवयाता सदमिद्दुर्मतीनां देवः सन्दुर्मतीनाम् ।
हन्ता पापस्य रक्षसस्त्राता विप्रस्य मावतः ।
अधा हि त्वा जनिता जीजनद्वसो रक्षोहणं त्वा जीजनद्वसो॥११॥

दुष्ट मनांच्या शत्रूंचा नाश करणाऱ्या, वाईट विचारांचा नाश करणाऱ्या, सर्वोत्तम, स्तुतियोग्य इंद्रदेवा ! पापी कृत्यांपासून आमचे आपण रक्षण करावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! आपण राक्षसांचा नाश करण्यासाठी आणि विद्वानांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने प्रकट झाला आहात ॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३०

ऋषी- परुच्छेप दैवोदासि देवता- इंद्र
छन्द- १-९ अत्यष्टि १० त्रिष्टुप्

एन्द्र याह्युप नः परावतो नायमच्छा
विदथानीव सत्पतिरस्तं राजेव सत्पतिः ।
हवामहे त्वा वयं प्रयस्वन्तः सुते सचा ।
पुत्रासो न पितरं वाजसातये मंहिष्ठं वाजसातये॥१॥

हे इंद्रदेवा ! आमच्या यज्ञामध्ये अग्निदेवासारखे दुरून येण्याची किंवा राज्याचे रक्षण करणारा राजा येण्याची आम्ही विनंती करत आहोत. पित्याला भोजनाचे निमंत्रण देणाऱ्या पुत्राप्रमाणे आम्ही आहुती देणारे यज्ञकर्ते हविष्यान्न स्वीकारण्या करता आपले आवाहन करत आहोत ॥१॥

पिबा सोममिन्द्र सुवानमद्रिभिः कोशेन
सिक्तमवतं न वंसगस्तातृषाणो न वंसगः ।
मदाय हर्यताय ते तुविष्टमाय धायसे ।
आ त्वा यच्छन्तु हरितो न सूर्यमहा विश्वेव सूर्यम्॥२॥

हे इंद्रदेवा ! अत्यंत तहानलेला वृषभ (बैल) पाणी पिण्यासाठी जलाशयामध्ये पाणी पिण्यास जातो त्याप्रमाणे दगडांच्या भांड्यांमध्ये सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्याकरता आपण यावे ही विनंती. सकाळच्या प्रहरी किरणांच्या रूपातील अश्व, सूर्यदेवांना इच्छित स्थळी घेऊन येतात त्याप्रमाणे हे बलवान

इंद्रदेवा ! आपले अश्व सोमरस प्राशन करण्यासाठी आपल्याला घेऊन येवोत ही विनंती॥२॥

अविन्ददिवो निहितं गुहा निधिं वेर्न गर्भं
परिवीतमश्मन्यनन्ते अन्तरश्मनि ।
व्रजं वज्री गवामिव सिषासन्नङ्गिरस्तमः ।
अपावृणोदिष इन्द्रः परीवृता द्वार इषः परीवृताः ॥३॥
मांसाहारी व्यक्ती, गोठ्यात लपवलेल्या किंवा दुर्गम ठिकाणी लपवलेली पक्ष्यांची पिल्ले शोधतो त्याचप्रमाणे अंगिराऋषींना प्रिय इंद्रदेवांनी मौल्यवान, दगडांच्या ढिगाऱ्यात लपवलेला सोमरस शोधला. वज्रधारी इंद्रदेवांनी ढगांमध्ये लपलेल्या पाण्याचे भांडार शोधले आणि जलवृष्टी करून मानवांसाठी संपत्ती आणि समृद्धीची द्वारे उघडली॥३॥

दादृहाणो वज्रमिन्द्रो गभस्त्योः क्षद्मेव
तिग्ममसनाय सं श्यदहिहत्याय सं श्यत् ।
संविव्यान ओजसा शवोभिरिन्द्र मज्मना ।
तष्टेव वृक्षं वनिनो नि वृश्चसि परश्वेव नि वृश्चसि ॥४॥
इंद्रदेवांनी, मंत्रांच्या मदतीने शक्तिशाली बनवलेल्या पाण्याप्रमाणे तीक्ष्ण धार असलेले वज्र शत्रूंवर हल्ला करण्यासाठी हातात घट्ट धरले आहे. हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे लाकूडतोड्या कुऱ्हाडीने जंगलातील झाडे कापत असतो, त्याप्रमाणे आपण आपल्या तेजाने ,शक्तीने ज्ञान मिळवून आपल्या शत्रूंना कापून टाकता ॥४॥

त्वं वृथा नद्य इन्द्र सर्तवेऽच्छा समुद्रमसृजो
रथाँ इव वाजयतो रथाँ इव ।

इत ऊतीरयुञ्जत समानमर्थमक्षितम् ।
धेनूरिव मनवे विश्वदोहसो जनाय विश्वदोहसः ॥५॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे राजा युद्धभूमीवर विजय मिळवण्यासाठी रथांसह सैन्य पाठवतो, त्याप्रमाणे आपण नद्यांच्या पाण्याचा प्रवाह समुद्राच्या दिशेने वाहण्यास प्रेरित केला आहे. सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या कामधेनु गायी प्रमाणे हा पाण्याचा प्रवाह सर्व लोकांच्या इच्छा पूर्ण करणारा बनला आहे॥५॥

इमां ते वाचं वसूयन्त आयवो रथं न धीरः
स्वपा अतक्षिषुः सुम्नाय त्वामतक्षिषुः ।
शुम्भन्तो जेन्यं यथा वाजेषु विप्र वाजिनम् ।
अत्यमिव शवसे सातये धना विश्वा धनानि सातये ॥६॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे कुशल कारागीर धनाच्या इच्छेने प्रेरित होऊन उत्कृष्ट रथ बांधतात, त्याचप्रमाणे आम्ही धन मिळवण्याच्या इच्छेने स्तोत्रांचे पठण करीत आहोत. हे बुद्धिसंपन्न इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे ऋषी शक्तिशाली घोड्यांना विजयासाठी प्रोत्साहित करतात त्याचप्रमाणे आम्ही भक्त; धन, बल आणि आनंद मिळविण्यासाठी स्तोत्रांचे पठण करत आहोत ॥६॥

भिनत्पुरो नवतिमिन्द्र पूरवे दिवोदासाय
महि दाशुषे नृतो वज्रेण दाशुषे नृतो ।
अतिथिग्वाय शम्बरं गिरेरुग्रो अवाभरत् ।
महो धनानि दयमान ओजसा विश्वा धनान्योजसा ॥७॥
हे इंद्रदेवा ! यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या दानशूर राजा दिवोदासच्या शत्रूंची वज्राच्या आघाताने आपण नव्वद शहरे नष्ट नष्ट केलीत. हे अफाट शक्तीने संपन्न इंद्रदेवा ! राजा दिवोदासाच्या कल्याणासाठी आपण

शंबरासुराला पर्वतावरून खाली फेकलेत आणि आपल्या सामर्थ्याने राजा दिवोदासाला अमर्याद संपत्ती दिलीत ॥७॥

इन्द्रः समत्सु यजमानमार्यं प्रावद्विश्वेषु
शतमूतिराजिषु स्वर्मीळ्हेष्वाजिषु ।
मनवे शासदव्रतान्त्वचं कृष्णामरन्धयत् ।
दक्षन्न विश्वं ततृषाणमोषति न्यर्शसानमोषति ॥८॥

शेकडो संरक्षणात्मक साधनांनी सुसज्ज असलेल्या हे इंद्रदेवा ! आपण श्रेष्ठ यज्ञकर्त्यांचे सर्व युद्धांमध्ये रक्षण करता. इंद्रदेवांनी आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी यज्ञाला विरोध करणाऱ्यांचा नाश केला आणि त्यांच्यावर नियंत्रण आणले. ज्याप्रमाणे अग्नि सर्व भौतिक वस्तूंना जाळून टाकतो त्याप्रमाणे काळ्या कातडीच्या "कृष्ण" नावाच्या हिंसक राक्षसाला जाळून टाकले ॥८॥

सूरश्चक्रं प्र वृहज्जात ओजसा प्रपित्वे
वाचमरुणो मुषायतीशान आ मुषायति ।
उशना यत्परावतोऽजगन्नूतये कवे ।
सुम्नानि विश्वा मनुषेव तुर्वणिरहा विश्वेव तुर्वणिः ॥९॥

तेजस्वी आणि प्रेरणादायी इंद्रदेव, सूर्यदेवांच्या रथाचे चक्र उगारून हातात शत्रू जवळ पोहोचताच सर्व शत्रू शांत होतात. जणू काही इंद्रदेवांनी त्यांची वाचाच बंद केली आहे.

हे इंद्रदेवा! आपण ज्याप्रमाणे उषना ऋषींच्या रक्षणासाठी खूप दूरवरून येऊन त्यांना सुख प्रदान करता; त्याचप्रमाणे मानवांनाही आपण सर्व प्रकारची सुखे प्रदान करावी ही विनंती. दानशूर माणूस संपूर्ण दिवस दान करण्यात व्यतीत करतो त्याप्रमाणे कृपया आमच्यासाठी तसेच दाते व्हावे ही विनंती ॥९॥

स नो नव्येभिर्वृषकर्मन्नुक्थैः पुरां दर्तः पायुभिः पाहि शग्मैः ।
दिवोदासेभिरिन्द्र स्तवानो वावृधीथा अहोभिरिव द्यौः ॥१०॥

शत्रूंच्या नगराचा नाश करण्यास सक्षम असलेल्या हे इंद्रदेवा ! आम्ही रचित असलेल्या नवीन स्तोत्रांनी प्रसन्न होऊन, आमचे सर्व प्रकारे रक्षण करावे आणि आम्हाला आनंद द्यावा ही विनंती. हे इंद्रदेवा ! सूर्यदेवांच्या, आकाश व्यापणाऱ्या तेजाप्रमाणे आमची स्तोत्रे आपल्या शक्तीला व्यापून टाकोत. ॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३१

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** इंद्र **छन्द**- अत्यष्टि

इन्द्राय हि द्यौरसुरो अनम्नतेन्द्राय मही
पृथिवी वरीमभिर्द्युम्नसाता वरीमभिः ।
इन्द्रं विश्वे सजोषसो देवासो दधिरे पुरः ।
इन्द्राय विश्वा सवनानि मानुषा रातानि सन्तु मानुषा ॥॥१॥

हे इंद्रदेवा! विशाल आकाशलोक आणि महाबली पृथ्वीदेवता स्तोत्रांचे पठण करीत आपल्यापुढे नतमस्तक झाले आहेत. सर्व प्रेमळ देवतांनी इंद्रदेवांना एकमताने आपला नेता म्हणून मान्यता दिली आहे आणि सर्व देवता इंद्रदेवांना नैवेद्य अर्पण करतात. यज्ञकर्ते इंद्रदेवांना सोमरस युक्त आहुती समर्पित करतात ॥१॥

विश्वेषु हि त्वा सवनेषु तुञ्जते समानमेकं
वृषमण्यवः पृथक्स्वः सनिष्यवः पृथक् ।
तं त्वा नावं न पर्षणिं शूषस्य धुरि धीमहि ।
इन्द्रं न यज्ञैश्चितयन्त आयवः स्तोमेभिरिन्द्रमायवः ॥२॥

हे इंद्रदेवा ! सर्व वेगवेगळ्या यज्ञांमध्ये विभिन्न भक्तगण फक्त आपल्यालाच आहुति देतात. आपण सर्व भक्तांच्यामध्ये समभाव बाळगता. स्वर्गप्राप्तीची इच्छा बाळगणारे भक्तगण वेगवेगळ्या स्वरूपात आपल्याला आहुति अर्पण करतात. संकटपार करणाऱ्या हे इंद्रदेवा ! आम्ही विजयाच्या इच्छेने आपली सर्वप्रथम स्थापना करतो आणि स्तोत्रांच्या पठणाने आपली उपासना करतो ॥२॥

वि त्वा ततस्रे मिथुना अवस्यवो व्रजस्य साता
गव्यस्य निःसृजः सक्षन्त इन्द्र निःसृजः ।
यद्व्यन्ता द्वा जना स्वर्यन्ता समूहसि ।
आविष्करिक्रद्वृषणं सचाभुवं वज्रमिन्द्र सचाभुवम् ॥३॥
हे इंद्रदेवा ! स्वर्गप्राप्ती करण्याच्या इच्छेने आणि गायी मिळवण्याच्या इच्छेने यज्ञकर्ते आपल्या पत्नीसह यज्ञ करून आपली सेवा करतात. अशा सर्व भक्तगणांच्या इच्छा आपण पूर्ण करता. आपण भक्तांसाठी आपले वज्र प्रकट केले आहे॥३॥

विदुष्टे अस्य वीर्यस्य पूरवः पुरो यदिन्द्र
शारदीरवातिरः सासहानो अवातिरः ।
शासस्तमिन्द्र मर्त्यमयज्युं शवसस्पते ।
महीममुष्णाः पृथिवीमिमा अपो मन्दसान इमा अपः ॥४॥
हे इंद्रदेवा ! आपली महानता जाणणारे यज्ञकर्ते आपल्यासाठी यज्ञ करतात. दुष्ट शत्रूंच्या शक्तीचा आपण नाश केलात. हिवाळ्याचा सामना करण्यासाठी शत्रूंनी तयार केलेल्या नगरांचा आपण नाश केलात .आपली ही शौर्यपूर्ण कृत्ये सर्वत्र प्रसिद्ध आहेत. हे शक्तिशाली इंद्रदेवा ! मानवाच्या कल्याणासाठी आपण यज्ञात बाधा आणणाऱ्या राक्षसांना शिक्षा केलीत आणि राक्षसांचे पृथ्वीवरील आणि पाण्यावरील वर्चस्व संपविले॥४॥

आदित्ते अस्य वीर्यस्य चर्किरन्मदेषु
वृषन्नुशिजो यदाविथ सखीयतो यदाविथ ।
चकर्थ कारमेभ्यः पृतनासु प्रवन्तवे ।
ते अन्यामन्यां नद्यं सनिष्णत श्रवस्यन्तः सनिष्णत ॥५॥

हे इंद्रदेवा ! सोमरसाच्या प्राशनाने उल्हसित होऊन आपण यज्ञकर्त्यांचे मित्रत्वाच्या भावनेतून रक्षण करता. ह्या यज्ञकर्त्यांमुळे आपली कीर्ति चौफेर पसरली आहे. यज्ञकर्त्या भक्तांच्या विजय प्राप्तीसाठी आपण युद्धामध्ये गर्जना करता. आपल्या कृपेमुळे यज्ञकर्त्या भक्तांना विविध प्रकारच्या अन्नाचा आणि सम्पत्तीचा लाभ होतो ॥५॥

उतो नो अस्या उषसो जुषेत ह्यर्कस्य बोधि
हविषो हवीमभिः स्वर्षाता हवीमभिः ।
यदिन्द्र हन्तवे मृधो वृषा वज्रिञ्चिकेतसि ।
आ मे अस्य वेधसो नवीयसो मन्म श्रुधि नवीयसः॥६॥

हे इंद्रदेवा ! आपण आमच्या सकाळच्या यज्ञांमध्ये म्हटल्या जाणाऱ्या स्तोत्रांकडे लक्ष द्यावे आणि आहुतींचा स्वीकार करावा ही विनंती. हे वज्रधारी इंद्रदेवा ! आमच्या हिंसक शत्रूंच्या नाशाची आमची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण यावे आणि आमच्या , कल्पक, नवीन आणि असाधारण उत्कृष्ट स्तोत्रांचे श्रवण करावे ही विनंती॥६॥

त्वं तमिन्द्र वावृधानो अस्मयुरमित्रयन्तं
तुविजात मर्त्यं वज्रेण शूर मर्त्यम् ।
जहि यो नो अघायति शृणुष्व सुश्रवस्तमः ।
रिष्टं न यामन्नप भूतु दुर्मतिर्विश्वाप भूतु दुर्मतिः॥७॥

हे अतिविख्यात, वीर इंद्रदेवा ! आपण आमच्या रक्षणासाठी, दुष्ट मनाच्या व्यक्तींचा वज्राने नाश करावा; तसेच आमच्याशी वैर करणाऱ्यांना आणि आम्हाला दुःख देणाऱ्यांना आपल्या वज्राने नष्ट करावे ही विनंती. आपल्या वज्राच्या प्रहाराने दुष्टमनाचे शत्रु तुटलेल्या वस्तूंप्रमाणे आमच्या मार्गावरून दूर व्हावेत आणि जगातून सर्व दुष्टमनाचे लोक नष्ट व्हावेत ही इच्छा ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३२

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** इंद्र **छन्द**- अत्यष्टि

त्वया वयं मघवन्पूर्व्ये धन इन्द्रत्वोताः
सासह्याम पृतन्यतो वनुयाम वनुष्यतः ।
नेदिष्ठे अस्मिन्नहन्यधि वोचा नु सुन्वते ।
अस्मिन्यज्ञे वि चयेमा भरे कृतं वाजयन्तो भरे कृतम्॥१॥
हे गौरवशाली इंद्रदेवा! आपल्या संरक्षणाखाली आम्ही बलवान सैन्य असलेल्या शत्रूंनाही पराभूत करू. आपण प्रेरणा दिल्याने आम्हाला मारण्यास तयार असलेल्या शत्रूंवर आम्ही हल्ला करू. श्रेष्ठ कर्म करण्यासाठी संघर्ष करणारे आम्ही, यज्ञकर्ते भक्तगण इंद्रदेवांना आवाहन करतो. आपल्या कृपेमुळे आम्ही युद्ध करण्यास निपुण होऊ शकू ॥१॥

स्वर्जेषे भर आप्रस्य वक्मन्युषर्बुधः
स्वस्मिन्नञ्जसि क्राणस्य स्वस्मिन्नञ्जसि ।
अहन्निन्द्रो यथा विदे शीर्ष्णाशीर्ष्णोपवाच्यः ।
अस्मत्रा ते सध्यक्सन्तु रातयो भद्रा भद्रस्य रातयः ॥२॥
हे आमच्यासाठी युद्धामध्ये सहभागी होणाऱ्या इंद्रदेवा ! युद्धात मृत्युमुखी पडणाऱ्या शूर पुरुषांना स्वर्गाच्या उत्तम मार्गावरून आपण स्वर्गलोकी नेता. ज्याप्रमाणे सर्वज्ञांना मान देऊन आपण प्रणाम करतो, त्याचप्रमाणे आपण इंद्रदेवांना प्रणाम केला पाहिजे. हे इंद्रदेवा ! आपण आम्हाला ऐश्वर्य प्रदान

करावे ही विनंती. आपल्या सारख्या शुभ पुरुषांचे सर्व दान आमच्यासाठी शुभ असते ॥२॥

तत्तु प्रयः प्रत्नथा ते शुशुक्वनं यस्मिन्यज्ञे
वारमकृण्वत क्षयमृतस्य वारसि क्षयम् ।
वि तद्वोचेरध द्वितान्तः पश्यन्ति रश्मिभिः ।
स घा विदे अन्विन्द्रो गवेषणो बन्धुक्षिद्भ्यो गवेषणः ॥३॥
यज्ञकर्त्या भक्तगणांनी यज्ञामध्ये उत्कृष्ट हविष्यान्न अर्पण केलेल्या हे इंद्रदेवा ! यज्ञामधील आपले स्थान अजूनही अढळ आहे. सूर्यादेवांच्या किरणांद्वारे सर्व लोक आपल्याला आकाशलोक आणि पृथ्वीलोकांच्या मध्यभागी स्थिर मेघांच्या रूपात पाहतात. आपण गायींचे दाता आहात आणि सत्याच्या निवासस्थानाचे जाणकार आहात. आपण याचकांना गायीचे दान देण्यास प्रसिद्ध देवता आहात ॥३॥

नू इत्था ते पूर्वथा च प्रवाच्यं यदङ्गिरोभ्योऽवृणोरप
व्रजमिन्द्र शिक्षन्नप व्रजम् ।
ऐभ्यः समान्या दिशास्मभ्यं जेषि योत्सि च ।
सुन्वद्भ्यो रन्धया कं चिदव्रतं हृणायन्तं चिदव्रतम् ॥४॥
हे इंद्रदेवा ! आपली कृत्ये पूर्वीप्रमाणेच आजही प्रशंसनीय आहेत. आपण अंगिरसऋषींच्या राक्षसांनी चोरलेल्या गायी मुक्त करून परत दिल्यात. या ऋषींप्रमाणेच आमच्या साठी युद्ध करून आपण विजयी होऊन आम्हाला

संपत्ती प्रदान करावी ही विनंती. आपण यज्ञाला विरोध करणाऱ्या, आणि क्रोधाने भरलेल्या, पापीशत्रूंचा पराभव करता ॥४॥

सं यज्जनान्क्रतुभिः शूर ईक्षयद्धने हिते
तरुषन्त श्रवस्यवः प्र यक्षन्त श्रवस्यवः ।
तस्मा आयुः प्रजावदिद्वाधे अर्चन्त्योजसा ।
इन्द्र ओक्यं दिधिषन्त धीतयो देवाँ अच्छा न धीतयः ॥५॥
शक्तिशाली इंद्रदेवांचा पराक्रम पाहिला म्हणून अन्नाची इच्छा असलेल्या यज्ञकर्त्यांनी इंद्रदेवांच्या प्रेरणेने शत्रूंचा नाश केला. इंद्रदेवांसाठी केलेल्या यज्ञांमधून यज्ञकर्त्यांना पुत्र, सेवक इत्यादि मिळतात. यज्ञकर्त्यां उपासकांना इंद्रलोकी निवास मिळतो ॥५॥

युवं तमिन्द्रापर्वता पुरोयुधा यो नः पृतन्यादप
तन्तमिद्धतं वज्रेण तन्तमिद्धतम्.
दूरे चत्ताय च्छन्त्सद्गहनं यदिनक्षत्.
अस्माकं शत्रून्परि शूर विश्वतो दर्मा दर्षीष्ट विश्वतः ॥६॥
हे युद्धामध्ये अग्रगामी असणाऱ्या इंद्रदेवा आणि पर्वतदेवांनो ! वज्राच्या तीक्ष्ण प्रहाराने आमच्याशी दूर आणि अगदी दुर्गम ठिकाणी सुद्धा लढणाऱ्या प्रत्येक शत्रूंचा नाश करावा ही विनंती. हे वीरांनो ! आमच्या शत्रूंना विविध मार्गांनी विदीर्ण करावे ही विनंती. आपले वज्र सर्व मार्गांनी शत्रूंचा नाश करण्यास सक्षम आहे ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३३

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** इंद्र

छन्द- १ त्रिष्टुप् २-४ अनुष्टुप् ५ गायत्री ६ धृति ७अत्यष्टि

उभे पुनामि रोदसी ऋतेन द्रुहो दहामि सं महीरनिन्द्राः ।
अभिव्लग्य यत्र हता अमित्रा वैलस्थानं परि तृळ्हा अशेरन् ॥१॥

यज्ञांच्या शक्तीने पृथ्वीलोक आणि आकाशलोक हे दोन्ही पवित्र करणाऱ्या इंद्रदेवा ! आम्ही इंद्रदेवाच्या सर्वात भयानक शत्रूंना दग्ध करतो. मोठ्या संख्येत शत्रु मारले गेल्याने युद्धभूमी स्मशानभूमी सारखी दिसते ॥१॥

अभिव्लग्या चिदद्रिवः शीर्षा यातुमतीनाम् ।
छिन्धि वटूरिणा पदा महावटूरिणा पदा॥२॥

हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपण हिंसक शत्रूंच्या अगदी जवळ जाऊन आपल्या विलक्षण लष्करी सामर्थ्याने शत्रूंच्या सैन्यांची मस्तके चिरडून टाकावी ही विनंती. ॥२॥

अवासां मघवञ्जहि शर्धो यातुमतीनाम् ।
वैलस्थानके अर्मके महावैलस्थे अर्मके॥३॥

हे ऐश्वर्यवान इंद्रदेवा ! आपण आपल्या पराक्रमाने हिंसक, घृणास्पद सैन्यदलाचा जगाच्याजागी नाश करावा आणि त्यांना स्मशानात टाकून द्यावे ही विनंती ॥३॥

यासां तिस्रः पञ्चाशतोऽभिव्लङ्गैरपावपः ।
तत्सु ते मनायति तकत्सु ते मनायति॥४ ॥
हे इंद्रदेवा ! आपण शत्रूसैन्याला सर्व बाजूंनी वेढून दिडशे सैनिकांना कंठस्नान घातलेत. आपल्याला हा पराक्रम विशेष महत्त्वाचा वाटत नसला तरी आपला हा पराक्रम अत्यंत प्रशंसनीय आहे ॥४॥

पिशङ्गभृष्टिमम्भृणं पिशाचिमिन्द्र सं मृण । सर्वं रक्षो नि बर्हय ॥५॥
हे इंद्रदेवा ! क्रोधाने लाल झालेल्या, शस्त्रधारी आणि महाकाय पिशाच्चाचा नाश करावा तसेच सर्व राक्षसी शक्तींचा आपण नाश करावा ही विनंती ॥५ ॥

अवर्महं इन्द्र दादृहि श्रुधी नः शुशोच हि द्यौः
क्षा न भीषाँ अद्रिवो घृणान्न भीषाँ अद्रिवः ।
शुष्मिन्तमो हि शुष्मिभिर्वधैरुग्रेभिरीयसे ।
अपूरुषघ्नो अप्रतीत शूर सत्वभिस्त्रिसप्तैः शूर सत्वभिः॥६॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे सर्वजण त्वष्टादेवांच्या भीतीमुळे भयग्रस्त होत असतात त्याच प्रमाणे अन्नधान्यांच्या कमतरतेमुळे पृथ्वीलोक आणि आकाशलोक भयग्रस्त झाले आहेत; म्हणून आमची प्रार्थना श्रवण करून आपण महाकाय ढगाला विदीर्ण करावे ही विनंती. भक्तगणांना कधी त्रास न देणाऱ्या, शूर आणि शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्रदेवा ! आपल्या एकवीस सेवकांसह आमच्या मदतीसाठी यावे ही विनंती. ॥६॥

वनोति हि सुन्वन्क्षयं परीणसः सुन्वानो
हि ष्मा यजत्यव द्विषो देवानामव द्विषः ।
सुन्वान इत्सिषासति सहस्रा वाज्यवृतः ।
सुन्वानायेन्द्रो ददात्याभुवं रयिं ददात्याभुवम् ॥७॥

हे इंद्रदेवा ! सोमरस सिद्ध करून आपल्या यज्ञकर्त्या भक्तांना आपण समृद्ध निवासस्थान देता. असे हे आपले भक्तगण आपल्या कृपेने दुष्ट मनाच्या आणि देवतांच्या विरोधी शत्रूंचा नाश करतात. हे इंद्रदेवा ! आपण आपल्या या भक्तांना विपुल संपत्ती आणि सहस्र प्रकारचे अन्न प्रदान करावे ही विनंती ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३४

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** वायू **छन्द**- अत्यष्टि

आ त्वा जुवो रारहाणा अभि प्रयो वायो
वहन्त्विह पूर्वपीतये सोमस्य पूर्वपीतये ।
ऊर्ध्वा ते अनु सूनृता मनस्तिष्ठतु जानती ।
नियुत्वता रथेना याहि दावने वायो मखस्य दावने॥१॥

हे वायुदेवते ! आपले वेगवान आणि शक्तिशाली घोडे, आम्ही सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी सर्वांच्या आधी आपल्याला यज्ञस्थळी घेऊन येवोत. आम्ही करत असलेल्या खऱ्या, मधुर आणि अनुकूल प्रार्थना आपल्या गुणांचे वर्णन करतात. त्यांचे श्रवण करून आपण नेहमीच प्रसन्न व्हावे. यज्ञामध्ये आम्ही देत असलेल्या हविअन्नाच्या आहुती स्वीकारण्यासाठी आणि आम्हाला इच्छित फळ देण्यासाठी "नियुत" नावाचे अश्व आपल्या रथाला जोडून आमच्या यज्ञस्थानी यावे ही विनंती॥१॥

मन्दन्तु त्वा मन्दिनो वायविन्दवोऽस्मत्क्राणासः
सुकृता अभिद्यवो गोभिः क्राणा अभिद्यवः ।
यद्ध क्राणा इरध्यै दक्षं सचन्त ऊतयः ।
सध्रीचीना नियुतो दावने धिय उप ब्रुवत ईं धियः॥२॥

हे वायुदेवते ! आमच्याकडून उत्तम प्रकारे तयार केलेला, उत्साहाने भरलेला, तेजस्वी आणि गायीच्या दुधात मिसळलेला सोमरस आपण आनंदाने प्राशन करावा ही विनंती. हे वायुदेवते ! यज्ञाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी

आपल्याला नियुत नावाचे घोडे मदत करतात. हे वायुदेवते! यज्ञकर्ते आपली प्रार्थना करतात ॥२॥

वायुर्युङ्क्ते रोहिता वायुररुणा वायू रथे
अजिरा धुरि वोळ्हवे वहिष्ठा धुरि वोळ्हवे ।
प्र बोधया पुरंधिं जार आ ससतीमिव ।
प्र चक्षय रोदसी वासयोषसः श्रवसे वासयोषसः॥३॥
वायुदेवता आपल्या रथाला आरक्त रंगाचे, भार वाहण्यास सक्षम अश्व जोडून त्यावर आरूढ होतात. हे वायुदेवते ! ज्याप्रमाणे एक प्रेमळ पती झोपलेल्या पत्नीला जागे करतो, त्याचप्रमाणे आपण मानवाला जागे करावे ही विनंती. आपण पृथ्वीदेवता आणि आकाशदेवतेला प्रकाशमान करून यज्ञात आहुती अर्पण करण्यासाठी उषादेवतेची स्थापना करावी ही विनंती ॥३॥

तुभ्यमुषासः शुचयः परावति भद्रा वस्त्रा
तन्वते दंसु रश्मिषु चित्रा नव्येषु रश्मिषु ।
तुभ्यं धेनुः सबर्दुघा विश्वा वसूनि दोहते ।
अजनयो मरुतो वक्षणाभ्यो दिव आ वक्षणाभ्यः॥४॥
हे वायुदेवते ! पवित्र उषादेवता आपल्या साठी नवीन, दृश्यमान किरणांमधून अद्भुत शुभवस्त्रे विणते (उषादेवतेचे आगमन होते). गायी अमृततुल्य दुधाचा वर्षाव करत यज्ञासाठी अन्न पुरवतात. नद्यातील, समुद्रातील पाणी आकाशात जाण्यास आणि परत एकदा जल वृष्टीच्या स्वरूपात नद्यांमध्ये परत येण्यास वायुदेवताच कारणीभूत आहे. ॥४॥

तुभ्यं शुक्रासः शुचयस्तुरण्यवो मदेषूग्रा
इषणन्त भुर्वण्यपामिषन्त भुर्वणि ।

त्वां त्सारी दसमानो भगमीट्टे तक्ववीये ।
त्वं विश्वस्माद्भुवनात्पासि धर्मणासुर्यात्पासि धर्मणा॥५॥
हे वायुदेवते ! तेजस्वी, शुद्ध, अत्यंत गतिमान, तीक्ष्ण यज्ञकर्ते यज्ञस्थळी आपल्याकडून सहकार्याची (पावसाची) अपेक्षा करतात. अत्यंत भयभीत आणि कमकुवत यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला यज्ञांतील असुरी शक्तींचा नाश करण्यासाठी प्रार्थना करतात. आपण प्राणवायूच्या चलनवलनाने संपूर्ण जगाचे सर्व भयांपासून रक्षण करता॥५॥

त्वं नो वायवेषामपूर्व्यः सोमानां प्रथमः
पीतिमर्हसि सुतानां पीतिमर्हसि ।
उतो विहुत्मतीनां विशां ववर्जुषीणाम् ।
विश्वा इत्ते धेनवो दुह्र आशिरं घृतं दुह्रत आशिरम्॥६॥
हे परमश्रेष्ठ वायुदेवते ! सर्व देवगणांमध्ये सिद्ध केलेला सोमरस सर्वप्रथम प्राशन करण्याचा अधिकार आपला आहे. ज्या प्रमाणे गायी दूध-तूप प्रदान करतात त्या प्रमाणे हे वायुदेवते आपण सर्व मनुष्यांना जीवनदायी हवा प्रदान करता. आपण निर्दोष आणि यज्ञासारखी पुण्यकर्मे करणाऱ्या लोकांकडून हविष्यान्नाची आहुती स्वीकारता ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३५

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता**- १-३,९ वायु; ४-८ इंद्र - वायु
छन्द- अत्यष्टि; ६-८ अष्टि

स्तीर्णं बर्हिरुप नो याहि वीतये सहस्रेण
नियुता नियुत्वते शतिनीभिर्नियुत्वते ।
तुभ्यं हि पूर्वपीतये देवा देवाय येमिरे ।
प्र ते सुतासो मधुमन्तो अस्थिरन्मदाय क्रत्वे अस्थिरन् ॥१॥
हे वायुदेवते ! आपल्या नियुत नावाच्या सहस्रावधी अश्वांवर स्वार होऊन दर्भासनावर ठेवलेले हविद्रव्य ग्रहण करण्यासाठी आपण यावे ही विनंती. हा सिद्ध केलेला सोमरस यज्ञकर्त्यांनी सहस्र अश्व असलेल्या वायुदेवतांसाठी तयार करून ठेवला आहे. कार्यांमध्ये वायुदेवतांच्या आनंदासाठी हा मधुर सोमरस अर्पण केला जातो॥१॥

तुभ्यायं सोमः परिपूतो अद्रिभिः स्पार्हा
वसानः परि कोशमर्षति शुक्रा वसानो अर्षति ।
तवायं भाग आयुषु सोमो देवेषु हूयते ।
वह वायो नियुतो याह्यस्मयुर्जुषाणो याह्यस्मयुः ॥२॥
हे वायुदेवते ! दगडांच्या भांड्यांमध्ये वाटलेला, सर्वांना हवा असलेला, तेजस्वी सोमरस, स्वछ चकचकीत पात्रांमध्ये सिद्ध करून ठेवला आहे. यज्ञकर्त्यांनी देवगणांसाठी शुद्ध आणि तेजस्वी सोमरस तयार करून ठेवला आहे. हे वायुदेवते ! नियुत नावाच्या अश्वांवर आरूढ होऊन ह्या सोमरसातील

पहिला वाटा ग्रहण करण्यास आमच्या वरील प्रेमामुळे आपण यावे आणि आम्हाला आशीर्वाद द्यावा ही विनंती ॥२॥

आ नो नियुद्भिः शतिनीभिरध्वरं सहस्रिणीभिरुप
याहि वीतये वायो हव्यानि वीतये ।
तवायं भाग ऋत्वियः सरश्मिः सूर्ये सचा ।
अध्वर्युभिर्भरमाणा अयंसत वायो शुक्रा अयंसत ॥३॥
हे वायुदेवते ! ऋतु-अनुसार सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी नियुत नावाच्या शेकडो आणि हजारो अश्वांवर आरुढ होऊन आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. सूर्यदेवांच्या किरणांच्या संपर्कामुळे हा सोमरस सूर्यदेवांसारखा तेजस्वी झाला आहे. हे वायुदेवते ! आपली शक्ती वृद्धिंगत करण्यासाठी हा सोमरस पात्रांमध्ये भरून ठेवला आहे ॥३ ॥

आ वां रथो नियुत्वान्वक्षदवसेऽभि प्रयांसि
सुधितानि वीतये वायो हव्यानि वीतये ।
पिबतं मध्वो अन्धसः पूर्वपेयं हि वां हितम् ।
वायवा चन्द्रेण राधसा गतमिन्द्रश्च राधसा गतम् ॥४॥
हे वायुदेवते ! नियुत नावाच्या अश्वांनी ओढलेल्या रथावर आरूढ होऊन आपण आणि इंद्रदेव उत्तम प्रकारे सिद्ध केलेला, सोमरस ग्रहण करण्यास यावे ही विनंती. सर्व देवगणांच्या आधी आपण दोघांनी हा सोमरस प्राशन करावा आणि आम्हाला आनंदमयी ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥४॥

आ वां धियो ववृत्युरध्वराँ उपेममिन्दुं
मर्मृजन्त वाजिनमाशुमत्यं न वाजिनम् ।
तेषां पिबतमस्मयू आ नो गन्तमिहोत्या ।

इन्द्रवायू सुतानामद्रिभिर्युवं मदाय वाजदा युवम् ॥५॥
हे वायुदेवते आणि इंद्रदेवांनो ! आम्ही पठण करत असलेल्या स्तोत्रांमुळे आम्ही आपल्याला यज्ञकार्यामध्ये सहभाग घेण्यास प्रेरित करीत आहोत . ज्याप्रमाणे वेगाने धावणाऱ्या घोड्याला मालिश केले जाते त्याच प्रमाणे यज्ञकर्ते सोमरस पात्रे स्वच्छ करतात. हे वायुदेवते आणि इंद्रदेवांनो ! आपण आमचे रक्षण करावे आणि दगडाच्या भांड्यात वाटलेला सोमरस आनंद प्राप्तीसाठी प्राशन करावा ही विनंती ॥५॥

इमे वां सोमा अप्स्वा सुता इहाध्वर्युभिर्भरमाणा
अयंसत वायो शुक्रा अयंसत ।
एते वामभ्यसृक्षत तिरः पवित्रमाशवः ।
युवायवोऽति रोमाण्यव्यया सोमासो अत्यव्यया ॥६॥
हे वायुदेवते आणि इंद्रदेवांनो ! यज्ञकर्त्या भक्तांनी हा सोमरस आपल्या दोघांकरता सिद्ध केला आहे. हे वायूदेवते आणि इंद्रदेवांनो ! हा तेजस्वी, उत्तमसंवर्धन गुणधर्मांनी संपन्न आणि प्रवाही सोमरस अखंड केसांच्या तंतूंमधून गाळून कुशासनवर ठेवला आहे.॥६॥

अति वायो ससतो याहि शश्वतो यत्र ग्रावा
वदति तत्र गच्छतं गृहमिन्द्रश्च गच्छतम् ।
वि सूनृता ददृशे रीयते घृतमा पूर्णया नियुता
याथो अध्वरमिन्द्रश्च याथो अध्वरम् ॥७॥
हे वायुदेवते ! आपण आळशीपणामुळे झोपलेल्या लोकांना ओलांडून दगडाच्या भांड्यात सोमरस वाटत असताना आवाज होत आलेल्या आणि मंत्रांचा उद्घोष ऐकू येत आहे अशा यज्ञस्थळी यावे ही विनंती. इंद्रदेव आणि वायुदेव आपण दोघेही जीवनशक्ती देण्यासाठी नियुत नावाच्या अश्वावर

आरूढ होऊन तुपाच्या धारांची आहुती देता असलेल्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥७॥

अत्राह तद्वहेथे मध्व आहुतिं यमश्वत्थमुपतिष्ठन्त
जायवोऽस्मे ते सन्तु जायवः ।
साकं गावः सुवते पच्यते यवो न ते वाय
उप दस्यन्ति धेनवो नाप दस्यन्ति धेनवः ॥८॥
हे वायुदेवते आणि इंद्रदेवांनो ! कष्टाळू यज्ञकर्ते औषधी सोम पर्वतावरून तोडून आणण्यात यशस्वी झाले आणि त्याची आहुती त्यांनी दिली आहे . त्या आहुतीचा आपण स्वीकार करावा ही विनंती. गायी आपल्यासाठी अमृतासारखे दूध देतात आणि सोमरसात जव इत्यादी धान्ये देखील आपल्यासाठी शिजवली जातात. हे वायुदेवते ! आपल्यासाठी दूध देणाऱ्या गायींची कधीही कमतरता भासू नये तसेच गायींना कोणीही पळवून नेऊ नये. ॥८॥

इमे ये ते सु वायो बाह्वोजसोऽन्तर्नदी ते
पतयन्त्युक्षणो महि व्राधन्त उक्षणः ।
धन्वञ्चिद्ये अनाशवो जीराश्चिदगिरौकसः ।
सूर्यस्येव रश्मयो दुर्नियन्तवो हस्तयोर्दुर्नियन्तवः ॥९॥
'हे वायुदेवते !आपले तरुण आणि बलवान अश्व आकाश आणि पृथ्वी यामधील सर्व भाग सहजपणे ओलांडून यज्ञस्थळी येतात. या अश्वांचा वेग अवर्णनीय आहे. ज्याप्रमाणे सूर्यकिरणांना कोणीही नियंत्रित करू शकत नाही त्याप्रमाणे वायूदेवतेच्या वेगाला लगाम घालणे कठीण आहे ॥९॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३६

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** १-५ मित्रावरूण ६-७ मंत्रोक्त अनेकदेवता
छन्द- १-६ अत्यष्टि; ७ त्रिष्टुप्

प्र सु ज्येष्ठं निचिराभ्यां बृहन्नमो हव्यं मतिं
भरता मृळयद्भ्यां स्वादिष्ठं मृळयद्भ्याम् ।
ता सम्राजा घृतासुती यज्ञेयज्ञ उपस्तुता ।
अथैनोः क्षत्रं न कुतश्चनाधृषे देवत्वं नू चिदाधृषे ॥॥१॥
हे यज्ञकर्त्यांनो ! नैवेद्य म्हणून तूप स्वीकारणारे मित्रदेव आणि वरुणदेव हे दोघेही अत्यंत तेजस्वी आहेत. प्रत्येक यज्ञामध्ये प्रार्थनेसाठी योग्य असलेल्या मित्रदेव आणि वरुणदेवांसाठी नम्रतापूर्वक आदरपूर्वक आणि भक्तीने नतमस्तक होऊ या. त्यांचे क्षात्रतेज आणि देवत्व कोणीही हिरावून घेऊ शकत नाही ॥१॥

अदर्शि गातुरुरवे वरीयसी पन्था ऋतस्य
समयंस्त रश्मिभिश्चक्षुर्भगस्य रश्मिभिः ।
द्युक्षं मित्रस्य सादनमर्यम्णो वरुणस्य च ।
अथा दधाते बृहदुक्थ्यं वय उपस्तुत्यं बृहद्वयः ॥॥२॥
महान उषादेवी यज्ञासाठी प्रकाशित झाली आहे. सूर्यदेवांचा मार्ग तिच्या किरणांनी दृश्यमान झाला आहे. तेजस्वी सूर्यदेवांच्या किरणांनी डोळे दिपले आहेत. मित्रदेव, अर्यमा आणि वरुणदेव ह्यांचे निवासस्थान सूर्यदेवांच्या

किरणांनी प्रकाशित झाले आहे, म्हणून, सर्व देवतांना प्रशंसनीय हविष्यान्न अर्पण केले जाते. ते सर्व देवता स्वीकारतात. ॥२॥

ज्योतिष्मतीमदितिं धारयत्क्षितिं स्वर्वतीमा
सचेते दिवेदिवे जागृवांसा दिवेदिवे ।
ज्योतिष्मत्क्षत्रमाशाते आदित्या दानुनस्पती ।
मित्रस्तयोर्वरुणो यातयज्जनोऽर्यमा यातयज्जनः॥३॥
विशेष भार वाहण्याची क्षमता असलेल्या पृथ्वीदेवते सह मित्रदेव आणि वरुणदेव अवतीर्ण होतात. दिव्यतेजाने संपन्न असलेल्या अदितीदेवतेचे पुत्र असलेले मित्रदेव आणि वरुणदेव सर्व देवतांचे रक्षण करतात. मित्रदेव, वरुणदेव आणि अर्यमा हे तिघेही मानवांना सर्वोत्तम मार्गावर घेऊन जातात. ॥३॥

अयं मित्राय वरुणाय शंतमः सोमो
भूत्ववपानेष्वाभगो देवो देवेष्वाभगः ।
तं देवासो जुषेरत विश्वे अद्य सजोषसः ।
तथा राजाना करथो यदीमह ऋतावाना यदीमहे ॥४॥
सर्व पेयांमध्ये सर्वोत्तम आणि सर्व देवांमध्ये सर्वात गौरवशाली असलेले हा सोमरस मित्रदेव आणि वरुणदेव दोघांनाही सुखकारक होवो . सुसंवाद, चांगले विचार आणि सद्भावना प्रेरित करणाऱ्या सर्व देवता हा सोमरस प्राशन करोत. हे तेजस्वी मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आम्हाला उदात्त कर्मांना प्रेरित करावे आणि आमच्या इच्छा पूर्ण कराव्यात ही विनंती. ॥४॥

यो मित्राय वरुणायाविधज्जनोऽनर्वाणं
तं परि पातो अंहसो दाश्वांसं मर्तमंहसः ।

तमर्यमाभि रक्षत्यृजूयन्तमनु व्रतम् ।
उक्थैर्य एनोः परिभूषति व्रतं स्तोमैराभूषति व्रतम्॥५॥
द्वेषरहित सेवा करणाऱ्या, प्रशंसापूर्वक स्तुती करणाऱ्या, आपल्या स्तोत्रांचा पठणाने अलंकृत करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तांना मित्रदेव आणि वरुणदेवता वाईट कर्मांच्या पापांसून वाचवतात. अर्यमा सरळ स्वभावाच्या, सत्याच्या मार्गाचे अनुसरण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तांचे रक्षण करतात॥५॥

नमो दिवे बृहते रोदसीभ्यां मित्राय वोचं
वरुणाय मीळ्हुषे सुमृळीकाय मीळ्हुषे ।
इन्द्रमग्निमुप स्तुहि द्युक्षमर्यमणं भगम् ।
ज्योग्जीवन्तः प्रजया सचेमहि सोमस्योती सचेमहि॥६॥
आम्ही स्वर्गीय पृथ्वीदेवतेची, आनंददायी मित्रदेवांची आणि अत्यंत आनंददायी वरुणदेवांची पूजा करतो. हे यज्ञकर्त्या भक्तांनो ! इंद्रदेव, अग्निदेव, तेजस्वी अर्यमा आणि भगदेव यांची पूजा करावी जेणे करून या सर्व देवतांच्या कृपेने, आपण सर्वजण दीर्घायुषी, पुत्र-पौत्र संतती संपन्न आणि संरक्षित राहू ॥६॥

ऊती देवानां वयमिन्द्रवन्तो मंसीमहि स्वयशसो मरुद्भिः ।
अग्निर्मित्रो वरुणः शर्म यंसन्तदश्याम मघवानो वयं च॥७॥
आम्ही आमच्या प्रार्थनेने इंद्रदेवांना आणि मरुद्गणांना प्रसन्न केले आहे. आम्ही देवतांना आमचे रक्षण करण्याची विनंती करत आहोत. इंद्रदेव, अग्निदेव, मित्रदेव आणि वरुणदेव आम्हाला आनंदाने आशीर्वाद देवोत आणि त्यांनी दिलेला ऐश्वर्यपूर्ण आनंद उपभोगू ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त- १३७

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता**-मित्रावरूण **छन्द**- अतिशक्वरी

सुषुमा यातमद्रिभिर्गोश्रीता मत्सरा इमे सोमासो मत्सरा इमे ।
आ राजाना दिविस्पृशास्मत्रा गन्तमुप नः ।
इमे वां मित्रावरुणा गवाशिरः सोमाः शुक्रा गवाशिरः ॥१॥
हे दैदिप्यमान आणि आकाशलोकी निवास करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! दगडांच्या भांड्यांमध्ये वाटून, दुधामध्ये मिसळलेला, आनंददायी सोमरस आपल्यासाठी सिद्ध करून ठेवला आहे. आपण दोघेही आमच्या रक्षणाकरता येथे यावे ही विनंती॥१॥

इम आ यातमिन्दवः सोमासो दध्याशिरः सुतासो दध्याशिरः ।
उत वामुषसो बुधि साकं सूर्यस्य रश्मिभिः ।
सुतो मित्राय वरुणाय पीतये चारुऋताय पीतये॥२॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण, हा सिद्ध केलेला दूध आणि दही मिश्रित सोमरस प्राशन करण्यासाठी, आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. पहाटेची वेळ असली किंवा सूर्यकिरणे सर्वत्र पसरलेली असली तरी हा सिद्ध केलेला सोमरस मित्रदेवांना आणि वरूणदेवांना यज्ञस्थळी अर्पण केला जातो॥२॥

तां वां धेनुं न वासरीमंशुं दुहन्त्यद्रिभिः सोमं दुहन्त्यद्रिभिः ।
अस्मत्रा गन्तमुप नोऽर्वाञ्चा सोमपीतये ।

अयं वां मित्रावरुणा नृभिः सुतः सोम आ पीतये सुतः ॥३॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ज्याप्रमाणे गायींची आचळे पिळून दूध काढले जाते त्याप्रमाणे यज्ञकर्त्यांनी दगडांच्या भांड्यामध्ये वाटून, आपल्याला प्राशन करण्यासाठी योग्य असा सोमरस सिद्ध करून ठेवला आहे. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आमच्या संरक्षणासाठी आणि सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१३८

ऋषी- परुच्छेप दैवोदासि **देवता-** पूषन् **छन्द-** अत्यष्टि

प्रप्र पूष्णस्तुविजातस्य शस्यते महित्वमस्य तवसो न तन्दते स्तोत्रमस्य न तन्दते ।
अर्चामि सुम्नयन्नहमन्त्यूतिं मयोभुवम् ।
विश्वस्य यो मन आयुयुवे मखो देव आयुयुवे मखः॥१॥
यज्ञकर्त्यांच्या कल्याणासाठी जन्म झालेल्या शक्तिशाली पूषन् देवांचा महिमा सर्वत्र गायला जातो. पूषन् देवांच्या सामर्थ्याला विरोध करणे शक्य नाही. पूषन् देवांच्या स्तुतीयुक्त स्तोत्रांची कमतरता नाही म्हणून आम्ही सुद्धा त्यांची स्तुती करतो. यज्ञकर्त्यांच्या मनात एकमेकांशी सहकार्याची शुद्ध भावना जागृत करणाऱ्या आणि संरक्षण देणाऱ्या शक्तीसंपन्न पूषन् देवांची आम्ही प्रार्थना करतो ॥१॥

प्र हि त्वा पूषन्नजिरं न यामनि स्तोमेभिः कृण्व ऋणवो यथा मृध उष्ट्रो न पीपरो मृधः ।
हुवे यत्त्वा मयोभुवं देवं सख्याय मर्त्यः ।
अस्माकमाङ्गूषान्द्युम्निनस्कृधि वाजेषु द्युम्निनस्कृधि॥२॥
हे पूषन् देवा! ज्याप्रमाणे लोक वेगवान घोड्याची स्तुती करतात, त्याचप्रमाणे आम्ही यज्ञाच्या ठिकाणी लवकर येण्यासाठी आपली स्तुती करतो. ज्याप्रमाणे आपण प्रवाशांना उंटावर बसून वाळवंट पार करण्यास मदत करता त्याप्रमाणे हिंसक शत्रूंपासून आमचे रक्षण करावे ही विनंती. आपली मैत्री अबाधित

राहण्यासाठी, आनंद निर्माण करणाऱ्या हे पूषन् देवा!, आम्ही आपले आवाहन करतो. आमची वाणी समृद्ध करावी ही विनंती॥२॥

यस्य ते पूषन्त्सख्ये विपन्यवः क्रत्वा चित्सन्तोऽवसा बुभुज्रिर इति क्रत्वा बुभुज्रिरे ।
तामनु त्वा नवीयसीं नियुतं राय ईमहे ।
अहेळमान उरुशंस सरी भव वाजेवाजे सरी भव ॥३॥
हे पूषन् देवा ! आपली मैत्री प्राप्त झाल्यानंतर, यज्ञकर्ते उत्कृष्ट यज्ञ करून आणि स्तोत्रांचे पठण करून आपल्या संरक्षणाने सर्व उपभोगाच्या वस्तु मिळवतात. त्यांना कोणाहीकडे दयेची भीक मागायला लागत नाही. अनेकांकडून प्रशंसा होणाऱ्या हे पूषन् देवा ! प्रत्येक संघर्षमय युद्धात आपण आम्हाला मदत करावी ही विनंती ॥३॥

अस्या ऊ षु ण उप सातये भुवोऽहेळमानो ररिवाँ अजाश्व श्रवस्यतामजाश्व ।
ओ षु त्वा ववृतीमहि स्तोमेभिर्दस्म साधुभिः ।
नहि त्वा पूषन्नतिमन्य आघृणे न ते सख्यमपह्नुवे ॥४॥
हे अजवाहन, बकरा हेच वाहन असलेल्या. या शब्दाचे अनेक अर्थ आहेत, जसे की स्वयंभू किंवा अजन्मा). पूषन् देवा ! आम्हाला समृद्ध करण्यासाठी, आपण अत्यंत प्रेमाने दाता म्हणून येथे आला आहात. अन्नाची इच्छा बाळगणाऱ्या आम्हाला मुक्तहस्ताने धनधान्य प्रदान करावे ही विनंती .आम्ही उत्कृष्ट स्तोत्रांनी आपली स्तुती करतो. हे पाऊस पाडणाऱ्या पूषन् देवा ! आम्ही आपली कधीही अवहेलना करीत नाही आपल्या मैत्री पासून आम्ही कधीही वंचित राहू नये ही विनंती॥४॥
(अज हा शब्दचा अर्थ "ब्रह्मदेव" किंवा "बकरा" असाही होतो)

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१३९

ऋषी- परुच्छेप दैवोदासि

देवता- १ विश्वेदेवा, २ मित्रावरुण; ३- ५ अश्विनीकुमार; ६ इन्द्र; ७ अग्नि; ८-मरुद्गण; ९ इंद्र आणि अग्नि ; १० बृहस्पति; ११ विश्वेदेवा

छन्द- अत्यष्टि; ५ बृहती; ११ त्रिष्टुप्

अस्तु श्रौषट् पुरो अग्निं धिया दध आ नु
तच्छर्धो दिव्यं वृणीमह इन्द्रवायू वृणीमहे ।
यद्ध क्राणा विवस्वति नाभा संदायि नव्यसी ।
अध प्र सू न उप यन्तु धीतयो देवाँ अच्छा न धीतयः॥१॥

आम्ही यज्ञकर्त्यांनी अग्निदेवांची विधिपूर्वक स्थापना केली आहे. आम्ही अग्निदेवांच्या त्या दिव्य तेजाची भक्तिभावाने पूजा करतो. आम्ही आमचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या इंद्रदेवांची आणि वायुदेवांची पूजा करतो. यज्ञात देवतांची नव्याने रचलेली स्तोत्रे आणि आमच्या प्रार्थना नक्कीच देवतांपर्यंत पोहोचतात. ॥१॥

यद्ध त्यन्मित्रावरुणावृतादध्याददाथे अनृतं
स्वेन मन्युना दक्षस्य स्वेन मन्युना ।
युवोरित्थाधि सद्मस्वपश्याम हिरण्ययम् ।
धीभिश्चन मनसा स्वेभिरक्षभिः सोमस्य स्वेभिरक्षभिः॥२॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या तेजाने आदित्यांनी पसरवलेल्या पाण्याला शोषून घेऊन तेच पाणी आम्हाला सर्व बाजूंनी देता. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! यज्ञस्थळी अवतीर्ण होणाऱ्या आपल्या स्वर्णमयी तेजाचे आम्ही आमच्या बुद्धी, मन, इंद्रियशक्ती आणि ज्ञानशक्तीद्वारे अवलोकन करतो ॥२॥

युवां स्तोमेभिर्देवयन्तो अश्विनाश्रावयन्त
इव श्लोकमायवो युवां हव्याभ्यायवः ।
युवोर्विश्वा अधि श्रियः पृक्षश्च विश्ववेदसा ।
प्रुषायन्ते वां पवयो हिरण्यये रथे दस्रा हिरण्यये॥३॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्याबद्दल श्रद्धेने भरलेले यज्ञकर्ते, भक्तगण आपले स्तोत्रांद्वारे गुणगान करतात. आपण दोघेही सर्वज्ञ असल्याने, सर्व संपत्ती, आणि अन्न आपल्या कृपेमुळे मिळते. हे मनोहारी अश्विनीकुमारांनो ! सुवर्णचक्रे असलेल्या रथातून आपण प्रवास करता ॥३॥

अचेति दस्रा व्यु नाकमृण्वथो युञ्जते
वां रथयुजो दिविष्टिष्वध्वस्मानो दिविष्टिषु ।
अधि वां स्थाम वन्धुरे रथे दस्रा हिरण्यये ।
पथेव यन्तावनुशासता रजोऽञ्जसा शासता रजः॥४॥
हे सुंदर अश्विनीकुमारांनो ! आपण दोघेही आपल्या रथाला वेगवान अश्व जोडून स्वतः सारथी बनून स्वर्गलोकी पोहोचता, असे सर्वजण म्हणतात. हे अश्विनीकुमारांनो ! आम्ही चांगल्या प्रकारे बांधलेल्या तीन बैठकी असलेल्या सुवर्ण रथावर दोघांना बसवतो. आपण दोघे आपापल्या शक्तीने जगावर राज्य करता आणि पावसाच्या पाण्यावर नियंत्रण ठेवता ॥४॥

शचीभिर्नः शचीवसू दिवा नक्तं दशस्यतम् ।
मा वां रातिरुप दसत्कदा चनास्मद्रातिः कदा चन॥५॥
हे वैभवसम्पन्न अश्विनीकुमारांनो ! आमच्या सत्कर्मांनी प्रसन्न होऊन, आपण दोघेही आम्हाला रात्रंदिवस धनदेऊन आशीर्वाद द्यावा ही विनंती. आपल्या कडून मिळालेली संपत्ती कधीही कमी होऊ नये आणि आमचे अर्थपूर्ण दान कधीही कमी होऊ नये ही विनंती . ॥५॥

वृषन्निन्द्र वृषपाणास इन्दव इमे सुता
अद्रिषुतास उद्भिदस्तुभ्यं सुतास उद्भिदः ।
ते त्वा मन्दन्तु दावने महे चित्राय राधसे ।
गीर्भिर्गिर्वाहः स्तवमान आ गहि सुमृळीको न आ गहि॥६॥
हे इंद्रदेवा ! आपल्यासाठी दगडाच्या भांड्यांमध्ये वाटून, सामर्थ्य आणि शक्तीवर्धक, प्राशन करण्यास योग्य, सोमरस सिद्ध केलेला आहे. हा पर्वतावर शुद्ध करण्यात आलेला सोमरस आपण प्राशन करून आम्हाला उदंड वैभव प्रदान करण्यास प्रोत्साहित व्हावे ही विनंती. हे स्तुतीयोग्य इंद्रदेवा आमच्या प्रार्थना श्रवण करून आमच्या यज्ञस्थळी यावे आणि आमच्या सोबत येथे उपस्थित राहावे ही विनंती ॥६॥

ओ षू णो अग्ने शृणुहि त्वमीळितो देवेभ्यो
ब्रवसि यज्ञियेभ्यो राजभ्यो यज्ञियेभ्यः ।
यद्ध त्यामङ्गिरोभ्यो धेनुं देवा अदत्तन ।
वि तां दुह्रे अर्यमा कर्तरी सचाँ एष तां वेद मे सचा॥७॥
हे अग्निदेवा ! आम्ही करत असलेल्या प्रार्थना श्रवण कराव्या. आमच्या यज्ञाची माहिती प्रसिद्ध आणि गौरवशाली देवतांना द्यावी ही विनंती. हे अग्निदेवानो ! आपण आङ्गिरसऋषींना दिलेल्या ज्या गायींचे दूध

अर्यमादेवतेने काढले, ती गाय आणि आम्ही यज्ञकर्ते एकमेकांशी परिचित आहोत ॥७॥

मो षु वो अस्मदभि तानि पौंस्या सना
भूवन्द्युम्नानि मोत जारिषुरस्मत्पुरोत जारिषुः ।
यद्वश्चित्रं युगेयुगे नव्यं घोषादमर्त्यम् ।
अस्मासु तन्मरुतो यच्च दुष्टरं दिधृता यच्च दुष्टरम् ॥८॥

हे मरुद्गणांनो ! आपल्या प्रसिद्ध, शाश्वत आणि तेजस्वी शक्तीचा आम्हाला कधीही विसर पडू नये; त्याचप्रमाणे, आमची कीर्ती नेहमीच अखंड राहो आणि आमची शहरे कधीही नष्ट होऊ नयेत ही विनंती. युगायुगात प्रसिद्ध असणारे आपले अद्भुत, अविनाशी धन आपण आम्हाला द्यावे आणि त्या धनाचा शत्रूंकडून नाश होऊ नये ही विनंती॥८॥

दध्यङ्ह मे जनुषं पूर्वो अङ्गिराः प्रियमेधः
कण्वो अत्रिर्मनुर्विदुस्ते मे पूर्वे मनुर्विदुः ।
तेषां देवेष्वायतिरस्माकं तेषु नाभयः ।
तेषां पदेन मह्या नमे गिरेन्द्राग्नी आ नमे गिरा॥९॥

प्राचीन दध्यांगऋषी, आङ्गिरसऋषी, प्रियमेधऋषी, कण्वऋषी, अत्रिऋषी आणि मनु आम्हा सर्व मानवांचे जन्म जाणतात. ते विचारशील आणि ज्ञानीऋषी आमच्या पूर्वजांना जाणतात. त्या ऋषींचे इंद्रदेवांशी आणि अग्निदेवांशी खूप जवळचे नाते आहे. सामान्य मानवांना इंद्रदेवांकडून आणि अग्निदेवांकडून शक्ती आणि ऊर्जा मिळते. त्या देवांचे अनुयायी बनून आम्ही हृदयापासून नमन करत स्तोत्रांच्या पठणाने प्रार्थना करतो. ॥९॥

होता यक्षद्वनिनो वन्त वार्यं बृहस्पतिर्यजति
वेन उक्षभिः पुरुवारेभिरुक्षभिः ।
जगृभ्मा दूरआदिशं श्लोकमद्रेरध त्मना ।
अधारयदररिन्दानि सुक्रतुः पुरू सद्मानि सुक्रतुः ॥१०॥
यज्ञ करणाऱ्या भक्तांनी विविध इच्छा पूर्ण करण्याकरता अर्पणाची इच्छा असलेल्या बृहस्पतिदेवांचा सोमरस सिद्ध करून यज्ञ करावा. यज्ञकर्त्यांनी दूर देशात दगडाच्या सहाय्याने सोमरस तयार करताना होणारा आवाज ऐकला आहे. सत्कर्म करणाऱ्या भक्तगणांकडे वैभवाने भरलेले निवासस्थान आहे ॥१०॥

ये देवासो दिव्येकादश स्थ पृथिव्यामध्येकादश स्थ ।
अप्सुक्षितो महिनैकादश स्थ ते देवासो यज्ञमिमं जुषध्वम् ॥११॥
हे देवगणांनो आपण पृथ्वीलोकामध्ये ,आकाशलोकामध्ये आणि देवलोकामध्ये अकराअकाराच्या संख्येत आहात. (तेहतीस प्रकारचे म्हणजे तेहतीसकोटी देव) आपण सर्वजणांनी आम्ही देत असलेल्या आहुतींचा स्वीकार करावा ही विनंती ॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त १४०

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य । **देवता-** आग्नि ।
छन्द- जगती; १० जगती अथवा त्रिष्टुप् ; १२-१३ त्रिष्टुप्

वेदिषदे प्रियधामाय सुद्युते धासिमिव प्र भरा योनिमग्नये ।
वस्त्रेणेव वासया मन्मना शुचिं ज्योतीरथं शुक्रवर्णं तमोहनम्॥१॥
हे यज्ञकर्त्यांनो अंधाराचा नाश करणारे शुद्ध आणि तेजस्वी अग्निदेव यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित झालेले आहेत. दर्भासनावर आसनस्थ असलेल्या अग्निदेवांना अधिक प्रखरतेने प्रज्वलित होण्यासाठी यज्ञकर्त्यांनी हविष्यान्न अर्पण करावे. ज्या प्रमाणे शरीर वस्त्राने झाकून टाकाले जाते त्या प्रमाणे अग्निदेवांना स्तोत्रांच्या पठणाने झाकून टाकावे ॥१॥

अभि द्विजन्मा त्रिवृदन्नमृज्यते संवत्सरे वावृधे जग्धमी पुनः ।
अन्यस्यासा जिह्वया जेन्यो वृषा न्यन्येन वनिनो मृष्ट वारणः॥२॥
दोन लाकडांच्या घर्षणातून अरणीवर प्रज्वलित झालेले अग्निदेव अज्य(तूप) , पुरोडाश(भात आणि पिठपासून बनवलेली भाकरी) आणि सोमरस या तीन प्रकारच्या अन्नांचे ग्रहण करतात. अग्निदेवांनी ग्रहण केलेले अन्न द्विगुणित होते. अग्निदेवांचे एकरूप शरीरात जाठराग्नीच्या रूपात, तर दुसरे रूप जंगलातील सर्व वृक्षांना भस्म करणाऱ्या रूपात असते ॥२॥

कृष्णप्रुतौ वेविजे अस्य सक्षिता उभा तरेते अभि मातरा शिशुम् ।
प्राचाजिह्वं ध्वसयन्तं तृषुच्युतमा साच्यं कुपयं वर्धनं पितुः॥३॥
घर्षणाने काळवंडलेल्या, एकत्र राहणाऱ्या अग्निदेवांच्या अरणीरूपी दोन्ही माता कार्यरत झाल्यानंतर, पूर्वाभिमुख ज्वालांच्या जिभांनी सुसज्ज, अंधाराचा

नाश करणाऱ्या, शीघ्र प्रज्वलन होणाऱ्या, सर्वांबरोबर निवास कारण्यास सक्षम, यज्ञकर्त्यांद्वारे संरक्षित शिशु रूपातील अग्निदेवांना प्रकट करतात॥३॥

मुमुक्ष्वो मनवे मानवस्यते रघुद्रुवः कृष्णसीतास ऊ जुवः ।
असमना अजिरासो रघुष्यदो वातजूता उप युज्यन्त आशवः॥४॥
मोक्ष प्रदान करणारे, द्रुतगतीने चालणारे, कृष्णमार्गीय, विविध रंगाच्या छटा असलेले, वाऱ्याने प्रभावित होणारे, सर्वत्र उपस्थित असलेले अग्निदेव यज्ञकार्यामध्ये अत्यंत उपयुक्त आहेत ॥४॥

आदस्य ते ध्वसयन्तो वृथेरते कृष्णमभ्वं महि वर्पः करिक्रतः ।
यत्सीं महीमवनिं प्राभि मर्मृशदभिश्वसन्त्स्तनयन्नेति नानदत्॥५ ॥
जेव्हा अग्निदेव सर्व दिशांना हालचाल करत, जोरात गर्जना करत, विशाल पृथ्वीदेवतेच्या सर्व भागांना स्पर्श करून प्रज्वलित होतात, तेव्हा अग्निदेवांच्या ज्वाळा सर्व दिशांमधील मार्ग प्रकाशमान करतात ॥५॥

भूषन्न योऽधि बभ्रूषु नम्नते वृषेव पत्नीरभ्येति रोरुवत् ।
ओजायमानस्तन्वश्च शुम्भते भीमो न शृङ्गा दविधाव दुर्गृभिः॥६॥
पिवळट रंगाच्या औषधी वनस्पतींमध्ये सौंदर्य प्रस्थापित करण्यासाठी अग्निदेव प्रवेश करतात. ज्याप्रमाणे बैल गायीकडे धावतो त्याचप्रमाणे अग्निदेव मोठ्याने गर्जना करत लाकडांमध्ये प्रवेश करतो करतात. ज्याप्रमाणे माजलेला बैल आपली शिंगे फिरवतो त्याप्रमाणे अग्निदेव आपल्या शक्तीचे प्रदर्शन कारणासाठी चौफेर ज्वाळा फिरवतात ॥६॥

स संस्तिरो विष्टिरः सं गृभायति जानन्नेव जानतीर्नित्य आ शये ।
पुनर्वर्धन्ते अपि यन्ति देव्यमन्यद्वर्पः पित्रोः कृण्वते सचा॥७॥

अग्निदेव, कधीकधी प्रत्यक्ष, कधीकधी अप्रत्यक्षपणे इंधनामध्ये आपली शक्ती पसरवतात. अग्निदेवांच्या ज्वाळा यज्ञकर्त्यांच्या इच्छा जाणून कधी शांत होतात किंवा कधी तीव्रपणे प्रज्वलित होतात. ह्या ज्वाळा आपल्या पित्यासह म्हणजे अग्निदेवांसह पृथ्वी आणि अवकाशात विविध रूपे धारण करतात. (सूर्य, वीज, अग्नि, वडवानल-वणवे इ.)॥७॥

तमग्रुवः केशिनीः सं हि रेभिर ऊर्ध्वास्तस्थुर्मघ्रुषीः प्रायवे पुनः ।
तासां जरां प्रमुञ्चन्नेति नाननददसुं परं जनयञ्जीवमस्तृतम् ॥८॥
केसांप्रमाणे लांब ज्वाला, अग्निदेवांना सर्व बाजूंनी स्पर्श करतात. मृतवत् असूनही,अग्निदेवांचे स्वागत करण्यासाठी ऊर्ध्वगामी (वरच्या बाजूला) होतात आणि तेजस्वी बनतात. अग्निदेव गर्जना करत, ज्वालांचे जुनेपण काढून टाकतात आणि त्यांना शक्तिशाली आणि जिवंत बनवतात. ॥८॥

अधीवासं परि मातू रिहन्नह तुविग्रेभिः सत्वभिर्याति वि ज्रयः ।
वयो दधत्पद्वते रेरिहत्सदानु श्येनी सचते वर्तनीरह॥९॥
अग्निदेव पृथ्वीमातेला कपड्यांप्रमाणे झाकलेल्या झुडुपांना चाटत, मोठ्याने गर्जना करत, प्राण्यांबरोबर अरण्यातून विविध मार्गांनी फिरत असतात.अग्निदेव मानवांना आणि प्राण्यांना अन्नासारखी शक्तीप्रदान करतात. अग्निदेव नेहमीच गवत इत्यादी जाळताना, ज्या मार्गाने जातात तो मार्ग कृष्णवर्णीय होतो ॥९॥

अस्माकमग्ने मघवत्सु दीदिह्यध श्वसीवान्वृषभो दमूनाः ।
अवास्या शिशुमतीरदीदेर्वर्मेव युत्सु परिजर्भुराणः॥१०॥
हे अग्निदेवा ! आपण आमच्या ऐश्वर्यसंपन्न गृहामध्ये प्रज्वलित व्हावे ही विनंती. आपल्या सामर्थ्याने शत्रूंचा नाश करणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण

आपल्या बाल्यअवस्थेचा त्याग करून, वेळोवेळी आमच्या शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी आमचे कवच बनावे ही विनंती ॥१०॥

इदमग्ने सुधितं दुर्धितादधि प्रियादु चिन्मन्मनः प्रेयो अस्तु ते ।
यत्ते शुक्रं तन्वो रोचते शुचि तेनास्मभ्यं वनसे रत्नमा त्वम् ॥११॥
हे अग्निदेवा ! आपल्यासाठी आम्ही पठण करत असलेली स्तोत्रे दुसऱ्या सर्व स्तोत्रांपेक्षा आपल्याला जास्त प्रसन्न करोत. आमच्या या स्तोत्र पठणामुळे आपले तेज अधिकच वृद्धिंगत होवो आणि आपण आम्हाला मौल्यवान रत्नसंपत्ती प्रदान करावी ही विनंती ॥११॥

रथाय नावमुत नो गृहाय नित्यारित्रां पद्वतीं रास्यग्ने ।
अस्माकं वीराँ उत नो मघोनो जनाँश्च या पारयाच्छर्म या च ॥१२॥
हे अग्निदेवा !आपण आमच्या कुटुंबातील सदस्यांसाठी, त्याचप्रमाणे महान वीरांसाठी संकटातून पार होण्यासाठी यज्ञरूपी होडी आम्हाला प्रदान करावी ही विनंती. ही होडी आमच्या शूर वीरांना आणि सर्व यज्ञ करणाऱ्यांना संसाररूपी सागर पार करण्यास मदत करू दे. आपण आम्हाला श्रेष्ठ सुख संपदा प्रदान करावी ही विनंती ॥१२॥

अभी नो अग्न उक्थमिज्जुगुर्या द्यावाक्षामा सिन्धवश्च स्वगूर्ताः ।
गव्यं यव्यं यन्तो दीर्घाहेषं वरमरुण्यो वरन्त ॥१३॥
हे अग्निदेवा ! आमची स्तोत्रे आपली उत्तम प्रशंसा करणारी आहेत. आकाश, पृथ्वी, प्रवाही नद्या आम्हाला गायींचे दूध आणि वेगवेगळे अन्नपदार्थ प्रदान करू देत ही विनंती. याशिवाय आरक्त वर्णीय उषादेवता आम्हाला श्रेष्ठ अन्न आणि शक्तीवर्धक सामर्थ्य प्रदान करू देत ही विनंती॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४१

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य । **देवता-** आग्नि । **छन्द-** जगती ; १२-१३ त्रिष्टुप्

बळित्था तद्वपुषे धायि दर्शतं देवस्य भर्गः सहसो यतो जनि ।
यदीमुप ह्वरते साधते मतिऋतस्य धेना अनयन्त सस्रुतः॥१॥
तेजस्वी अग्निदेवांच्या शक्तीने निर्माण होणारे,दर्शनीय तेज, सर्व मानवांनी आपले शरीर बळकट करण्यासाठी स्वीकारले आहे. या तेजाच्या मदतीने सर्व मानवांची बुद्धी कार्यरत होते आणि त्यांचे ध्येय साध्य होते. यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांची उपासना करतात ॥१॥

पृक्षो वपुः पितुमान्नित्य आ शये द्वितीयमा सप्तशिवासु मातृषु ।
तृतीयमस्य वृषभस्य दोहसे दशप्रमतिं जनयन्त योषणः ॥२ ॥
अन्नाचे पोषण करणाऱ्या, शरीराचे वर्धन करणाऱ्या,आणि यज्ञातील हविअन्नाच्या आद्य (पहिल्या) रूपात अग्निदेव पृथ्वीवर असतात. दुसऱ्या रूपात सप्त लोकांच्या हितासाठी अग्निदेव ढगांमध्ये विजेच्या रूपात वास्तव्य करतात. दाहीदिशांना प्रज्वलित करणारे सूर्यदेव हे अग्निदेवांचे तिसरे रूप आहे ॥२॥

निर्यदीं बुध्नान्महिषस्य वर्पस ईशानासः शवसा क्रन्त सूरयः ।
यदीमनु प्रदिवो मध्व आधवे गुहा सन्तं मातरिश्वा मथायति ॥३ ॥
ज्याप्रकारे पहिल्यांदा यज्ञामध्ये आहुती देण्यासाठी "मातरिश्वानी" अग्निदेवांना प्रकट केले होते त्याप्रमाणे यज्ञकर्त्यांनी विशाल अरणीवर मंथन करून

अग्निदेवांना प्रकट केले. प्रकट झालेल्या अग्निदेवांची सर्वजण स्तुति करू लागले ॥३॥

प्र यत्पितुः परमान्नीयते पर्या पृक्षुधो वीरुधो दंसु रोहति ।
उभा यदस्य जनुषं यदिन्वत आदिद्यविष्ठो अभवद्धूणा शुचिः ॥४॥
सर्वांचे श्रेष्ठ पालक असणारे अग्निदेव ज्यावेळी प्रज्वलित होतात तेव्हा आहुतीची इच्छा असणाऱ्या अग्निदेवांच्या ज्वाळांमध्ये वृक्षांची आहुती दिली जाते. यज्ञकर्ते दोन्ही अरणींच्या सहाय्याने अग्निदेवांना प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा पुण्यवान अग्निदेव प्रकट होऊन तेजस्वी आणि शक्तिशाली बनतात॥४॥

आदिन्मातॄराविशद्यास्वा शुचिरहिंस्यमान उर्विया वि वावृधे ।
अनु यत्पूर्वा अरुहत्सनाजुवो नि नव्यसीष्ववरासु धावते ॥५॥
कोणत्याही अडथळ्याशिवाय इतरांना त्रास न देता अग्निदेवांची शक्ती प्रकट झाली आणि दाही मातृदिशांना पसरत द्रुत गतीने वाढत असते. अग्निदेवांचे गुण दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या औषधींमध्ये आणि औषधी गुण नसलेल्या नवीन दिसणाऱ्या वनस्पतींमध्ये देखील पसरले आहेत. ॥५॥

आदिद्धोतारं वृणते दिविष्टिषु भगमिव पपृचानास ऋञ्जते ।
देवान्यत्क्रत्वा मज्मना पुरुष्टुतो मर्तं शंसं विश्वधा वेति धायसे ॥६॥
स्वर्गात जाण्याच्या इच्छेने यज्ञकर्ते अग्निदेवांची वैभवशाली राजांप्रमाणे स्तुती करतात. या स्तुतीमुळे प्रसन्न होऊन अग्निदेव शक्तिसंपन्न आणि ऊर्जासंपन्न होतात. सर्वोत्तम यज्ञामध्ये अग्निदेव सर्व देवांना हविअन्नाची आहुती स्वीकारण्याचे आवाहन करतात॥६॥

वि यदस्थाद्यजतो वातचोदितो ह्वारो न वक्वा जरणा अनाकृतः ।
तस्य पत्मन्दक्षुषः कृष्णजंहसः शुचिजन्मनो रज आ व्यध्वनः ॥७ ॥
ज्याप्रमाणे अडथळामुक्त, बहुभाषिक आणि स्तुतियोग्य असा विनोद करणारा विदूषक आपल्या व्यंग्यात्मक शब्दांनी संपूर्ण स्थान हास्याने भरतो, त्याचप्रमाणे वायुदेवतेंमुळे प्रभावित झालेले अग्निदेव आपली ऊर्जा सर्वत्र पसरतात. आपल्या ज्वलनशक्तीने सर्व काही दग्ध करून टाकणाऱ्या, शुद्ध स्वरूपात जन्माला आलेल्या, अग्निदेवांनी कृष्णवर्णीय केलेल्या मार्गावरून सर्व लोक प्रवास करतात ॥७ ॥

रथो न यातः शिक्वभिः कृतो द्यामङ्गेभिररुषेभिरीयते ।
आदस्य ते कृष्णासो दक्षि सूरयः शूरस्येव त्वेषथादीषते वयः ॥८॥
कुशल कारागिरांनी तयार केलेल्या आणि समर्थ सारथ्यांनी सारथ्य केलेल्या रथावर आरूढ होऊन अग्निदेव द्रुतगतीने ज्वाळांसह आकाशात भ्रमण करतात. अग्निदेव सर्व लाकडे जाळत असतात त्यामुळे अग्निदेव ज्या मार्गावरून मार्गस्थ होतात तो मार्ग कृष्णवर्णीय होतो. जसे शत्रू शूरवीरांच्या भीतीने पळून जातात, त्याप्रमाणे पक्षीगण अग्निदेवांच्या ज्वाळा पाहून पळून जातात॥८॥

त्वया ह्यग्ने वरुणो धृतव्रतो मित्रः शाशद्रे अर्यमा सुदानवः ।
यत्सीमनु क्रतुना विश्वथा विभुरारान्न नेमिः परिभूरजायथाः ॥९॥
हे अग्निदेवा ! आपल्या शक्तीमुळे वरुणदेव व्रताचे पालन करतात, मित्रदेव अंधाराचा नाश करतात, अर्यमादेवता सर्वोत्तम दानाचे व्रत पाळतात. ज्याप्रमाणे रथाचे आरे सुस्थितीत ठेवावे लागतात त्याचप्रमाणे आपण सर्वव्यापी होऊन सर्व नियम सुस्थितीत ठेवता॥९॥

त्वमग्ने शशमानाय सुन्वते रत्नं यविष्ठ देवतातिमिन्वसि ।
तं त्वा नु नव्यं सहसो युवन्वयं भगं न कारे महिरत्न धीमहि ॥१०॥
हे तरुण अग्निदेवा! स्तुति करणाऱ्या आणि सोमरस सिद्ध करणाऱ्या भक्तांच्या कल्याणासाठी आपण त्यांचे सुंदर नैवेद्य देवतांना घेऊन जावे आणि त्यांना प्रदान करावे ही विनंती. हे बलवान, श्रीमंत, सनातन, तरुण आणि नैवेद्यांचे सेवन करणाऱ्या अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तोत्रांचे पठण करत आपली स्थापना करतो॥१०॥

अस्मे रयिं न स्वर्थं दमूनसं भगं दक्षं न पपृचासि धर्णसिम्.
रश्मींरिव यो यमति जन्मनी उभे देवानां शंसमृत आ च सुक्रतुः ॥११॥
हे अग्निदेवांनो ! गृहस्थ जीवनाशी संबंधित आणि जीवनासाठी उपयुक्त अशा इष्ट आणि पूजनीय संपत्ती बरोबर अत्यंत कुशल, सर्वांना आकर्षित करणारा, उत्साही आणि ज्ञानी पुत्र आम्हाला प्रदान करावा ही विनंती. आपल्या पसरलेल्या किरणांच्या सहाय्याने आकाशलोक आणि पृथ्वीलोकांवर आपण नियंत्रण ठेवावे ही विनंती. अशी महान कृत्ये करणाऱ्या अग्निदेवा यज्ञामध्ये उपस्थित असलेले ज्ञानी यज्ञकर्ते आपली स्तुती करतात ॥११॥

उत नः सुद्योत्मा जीराश्वो होता मन्द्रः शृणवच्चन्द्ररथः ।
स नो नेषन्नेषतमैरमूरोऽग्निर्वामं सुवितं वस्यो अच्छ ॥१२॥
वेगवान घोडे असलेले, देवांना वाहून नेणारे, आरामदायी, सुवर्ण रथ असलेले, अजिंक्य शक्तीने संपन्न आणि आनंदासारख्या दैवी गुणांनी सजलेले अग्निदेव आपल्या प्रार्थनेकडे लक्ष देतील का? आपल्या सत्कर्मांच्या प्रेरणेने अग्निदेव आपल्याला सर्वोच्च सौभाग्य निश्चितच देतील ॥१२॥

अस्ताव्यग्निः शिमीवद्भिरर्कैः साम्राज्याय प्रतरं दधानः ।

अमी च ये मघवानो वयं च मिहं न सूरो अति निष्टतन्युः ॥१३॥

उत्कृष्ट साम्राज्यशाली अग्निदेवांची आपण सर्व यज्ञकर्ते स्तोत्रांच्या पठणाने स्तुती करतो. ज्याप्रमाणे सूर्यदेव मेघांमध्ये गर्जना करतात, त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते, यज्ञकार्य संपन्न करताना गर्जना करत स्तोत्रांचे पठण करत अग्निदेवांची स्तुती करतो॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४२

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य ।

देवता- १ समिद्धआग्नि; २ तनूनपात्; ३ नराशंस ४ इळ; ५ बर्हि; ६ यज्ञ द्वार/देवीद्वार; ७ उषासानक्त; ८ दिव्य होतारौ ९-तीस्र: देव्य: १० त्वष्ट्टा ११ वनस्पति; १२ स्वाहा; १३ इंद्र

छन्द- अनुष्टुप्

समिद्धो अग्न आ वह देवाँ अद्य यतस्रुचे । तन्तुं तनुष्व पूर्व्यं सुतसोमाय दाशुषे॥१॥

हे समिद्ध-अग्निदेवा (प्रज्वलित अग्निदेव) ! आपल्यासाठी ज्या भक्तांनी आपल्याला प्रज्वलित केले आहे त्यांच्या कल्याणासाठी सर्व देवांचे आवाहन करावे ही विंनती. सोमरस सिद्ध करणाऱ्या दानशूर यज्ञकर्त्या भक्तांच्या कल्याणासाठी त्यांच्या प्राचीन यज्ञाच्या ज्वाळा वाढवाव्या ही विनंती ॥१॥

घृतवन्तमुप मासि मधुमन्तं तनूनपात् । यज्ञं विप्रस्य मावतः शशमानस्य दाशुषः॥२॥

हे तनूनपाता अग्निदेवा (शरीराचे आरोग्य वाढवणाऱ्या अग्निदेवा) ! बुद्धिमान स्तुती करणाऱ्या आणि आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्यांनी तूप आणि मधाच्या आहुतीने प्रज्वलित यज्ञामध्ये आपण यावे आणि शेवटपर्यंत राहावे ही विनंती ॥२॥

शुचिः पावको अद्भुतो मध्वा यज्ञं मिमिक्षति । नराशंसस्त्रिरा दिवो देवो देवेषु यज्ञियः॥३॥

हे नराशंसअग्निदेवा ! (मानवांनी कौतुक केलेले) देवगण आपली पूजा करतात, मानव आपले कौतुक करतात. आपण शुद्ध आणि तेजस्वी आहात आणि आपण इतरांना शुद्ध करतात. आपण आमच्या यज्ञाला दिवसातून तीन वेळा गोड मधाने सिंचन करता ॥३॥

ईळितो अग्न आ वहेन्द्रं चित्रमिह प्रियम् । इयं हि त्वा मतिर्ममाच्छा सुजिह्व वच्यते ॥४॥

हे ईळितो (सर्वांनी स्तुती केलेल्या) अग्निदेवा ! अद्वितीय आणि प्रिय इंद्रदेवांना आमच्या यज्ञ स्थानी बोलवावे ही विनंती. सुंदर ज्वालाच्या रूपात जीभ असलेल्या हे अग्निदेवा ! आम्ही नेहमीच आपली प्रार्थना करत असतो ॥४॥

स्तृणानासो यतस्रुचो बर्हिर्यज्ञे स्वध्वरे । वृञ्जे देवव्यचस्तममिन्द्राय शर्म सप्रथः॥५॥

स्रूवा पात्र धारण करणारे यज्ञकर्ते सर्वोत्तम (बर्हिर्यज्ञे अर्थ आगयज्ञ किंवा अग्नियज्ञ) अग्निदेवांच्या यज्ञात देवांसाठी दर्भासन पसरवतात आणि इंद्रदेवांसाठी योग्य आणि विस्तीर्ण आसन तयार करतात॥५॥

वि श्रयन्तामृतावृधः प्रयै देवेभ्यो महीः । पावकासः पुरुस्पृहो द्वारो देवीरसश्चतः॥६॥

तेजस्वी, यज्ञ विकसित करणारे, शुद्ध आणि सर्वांना प्रिय असलेले, वेगळेवेगळे दिव्य दरवाजे देवांच्या प्रवेशासाठी उघडले पाहिजेत ॥६॥

आ भन्दमाने उपाके नक्तोषासा सुपेशसा । यह्वी ऋतस्य मातरा सीदतां बर्हिरा सुमत् ॥७॥

सर्वांनी स्तुती केलेल्या, सुशोभित, परस्परांचे सहकार्याचे प्रतीक असणाऱ्या, यज्ञकार्य यशस्वी करणाऱ्या उषादेवतांनी आणि रात्रदेवतांनी(नक्तोषसा) यज्ञकर्त्यांसाठी चांगले विचार घेऊन दर्भासनी येऊन बसावे ही विनंती ॥७॥

मन्द्रजिह्वा जुगुर्वणी होतारा दैव्या कवी । यज्ञं नो यक्षतामिमं सिध्रमद्य दिविस्पृशम्॥८॥

शब्दांचा वापर करण्यात हुशार, उच्चारात पारंगत, अग्निरुपी, दैवीगुणांनी संपन्न असलेले यज्ञकर्ते(दिव्यहोतारौ) आमच्या स्वर्गलोकी पोहोचणाऱ्या, दिव्यत्वाची स्थिती प्राप्त करण्यास मदत करणाऱ्या यज्ञात उपस्थित राहून यज्ञ पूर्ण करावा ही विनंती ॥८॥

शुचिर्देवेष्वर्पिता होत्रा मरुत्सु भारती । इळा सरस्वती मही बर्हिः सीदन्तु यज्ञियाः ॥९॥

देवतांमध्ये आणि मरुद्गणांमध्ये पूजनीय, पवित्र यज्ञकार्य करणाऱ्या भारती, सरस्वती आणि इळा (तिस्त्र: देव्य:) या तिन्ही देवतांनी यज्ञात दर्भासानवर उपस्थित राहोत ही विनंती ॥९॥

तन्नस्तुरीपमद्भुतं पुरु वारं पुरु त्मना । त्वष्टा पोषाय वि ष्यतु राये नाभा नो अस्मयुः ॥१०॥

हे आमच्यावर परोपकार करणाऱ्या त्वष्टादेवांनो ! आमचे पालनपोषण करण्यासाठी जलद गतीने वाहणाऱ्या आणि अंतराळात असलेल्या जलधारी ढगांतून आमच्यासाठी जलवृष्टि करावी ही विनंती ॥१०॥

अवसृजन्नुप त्मना देवान्यक्षि वनस्पते । अग्निर्हव्या सुषूदति देवो देवेषु मेधिरः ॥११॥

हे वनस्पतीदेवा! देवतांसाठी यज्ञ करण्यासाठी आपण अग्निदेवांना प्रज्वलित करावे ही विनंती. ज्ञानी लोक यज्ञामध्ये अग्निदेवाला ज्या आहुती अर्पण करतात त्या सूक्ष्म स्वरूपात देवतांशी पोहोचतात ॥११॥

पूषण्वते मरुत्वते विश्वदेवाय वायवे । स्वाहा गायत्रवेपसे हव्यमिन्द्राय कर्तन ॥१२॥

हे यज्ञकर्त्यांनो ! पूषन् देव, मरुद्गण, विश्वेदेव,आदिनी युक्त अशा वायुदेवांना आणि गायत्री रूपी इंद्रदेवांना सर्वोत्तम आहुती प्रदान (स्वाहा) करावी ही विनंती ॥१२ ॥

स्वाहाकृतान्या गह्युप हव्यानि वीतये । इन्द्रा गहि श्रुधी हवं त्वां हवन्ते अध्वरे ॥१३॥

हे इंद्रदेवा ! भक्तीने अर्पण केलेले नैवेद्य स्वीकारण्यासाठी कृपया यज्ञस्थळी यावे ही विनंती. यज्ञकार्याचे सत्कर्म करण्यासाठी यज्ञकर्ते आपले आवाहन करत आहेत. त्यांच्या विनंतीला मान देऊन आपण यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४३

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य । **देवता-** अग्नि **छन्द-** जगती ८ त्रिष्टुप्

प्र तव्यसीं नव्यसीं धीतिमग्नये वाचो मतिं सहसः सूनवे भरे ।
अपां नपाद्यो वसुभिः सह प्रियो होता पृथिव्यां न्यसीददृत्वियः॥१॥
शक्तीचे पुत्र, जलाचे रक्षक, सर्वांचे प्रिय, ऋतु लक्षात घेऊन यज्ञामध्ये प्रज्वलित होणाऱ्या अग्निदेवांची आम्ही प्रार्थना करतो. अग्निदेव यज्ञवेदीवर त्यांच्या सर्व ऐश्वर्यासहित प्रज्वलित होतात. अग्निदेवांसाठी आम्ही नवीन आणि सर्वोत्तम स्तोत्रांचे पठण करतो ॥१॥

स जायमानः परमे व्योमन्याविरग्निरभवन्मातरिश्वने ।
अस्य क्रत्वा समिधानस्य मज्मना प्र द्यावा शोचिः पृथिवी अरोचयत् ॥२ ॥
तेजस्वी अग्निदेव, मातरिश्व वायुदेवांसाठी साठी प्रथम जन्मला आले आणि उत्तम प्रकारे प्रज्वलित झाले. अग्निदेवांच्या शक्तीमुळे आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता प्रकाशमान झाल्या ॥२ ॥

अस्य त्वेषा अजरा अस्य भानवः सुसंदृशः सुप्रतीकस्य सुद्युतः ।
भात्वक्षसो अत्यक्तुर्न सिन्धवोऽग्ने रेजन्ते अससन्तो अजराः ॥३ ॥
सुंदर, तेजस्वी, अमर अग्निदेवांचे तेज अक्षय्य आहे. अग्निदेवांच्या जागरूक आणि अक्षय्य ज्वाला रात्रीच्या अंधारावर मात करतात ॥३ ॥

यमेरिरे भृगवो विश्ववेदसं नाभा पृथिव्या भुवनस्य मज्मना ।
अग्निं तं गीर्भिर्हिनुहि स्व आ दमे य एको वस्वो वरुणो न राजति ॥४॥
वरुणादेवांच्याप्रमाणे संपत्तीचा एकमेव स्वामी असलेल्या अग्निदेवांची, भृगुऋषींच्या वंशजानी त्यांच्या शक्तीने संपूर्ण जगातील प्राण्यांना शक्ती मिळण्यासाठी यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित केले. अशा अग्निदेवांना हे यज्ञकर्त्यांनो! तुमच्या घरी घेऊन जा आणि सर्वोत्तम प्रार्थनांनी प्रज्वलित करा.॥४॥

न यो वराय मरुतामिव स्वनः सेनेव सृष्टा दिव्या यथाशनिः ।
अग्निर्जम्भैस्तिगितैरत्ति भर्वति योधो न शत्रून्त्स वना न्यृञ्जते ॥५॥
अग्निदेव, मरुद्गणांच्या गर्जनेप्रमाणे, आक्रमणकारी शक्तिशाली सैन्याप्रमाणे, दिव्य वज्रा प्रमाणे, आपल्या ज्वालारूपी दातांनी शत्रूंचा नाश करतात आणि जंगले भस्मसात करतात ॥५॥

कुविन्नो अग्निरुचथस्य वीरसद्वसुष्कुविद्वसुभिः काममावरत् ।
चोदः कुवित्तुतुज्यात्सातये धियः शुचिप्रतीकं तमया धिया गृणे ॥६॥
भक्तगणांच्या स्तोत्रांच्या पठणांची वारंवार इच्छा करणाऱ्या, कल्याणकारी, उदात्त कार्ये करण्यास प्रेरित करणाऱ्या, अग्निदेवांची आम्ही स्तोत्रे पठण करून प्रार्थना करतो. सर्वांना आश्रय देणारा अग्निदेव आपल्या संपत्ती द्वारे आमच्या सर्व इच्छा पूर्ण करोत ही विनंती ॥६॥

घृतप्रतीकं व ऋतस्य धूर्षदमग्निं मित्रं न समिधान ऋञ्जते ।
इन्धानो अक्रो विदथेषु दीद्यच्छुक्रवर्णामुदु नो यंसते धियम् ॥७॥
यज्ञवेदीमध्ये मुख्यस्थानी असणाऱ्या, तुपाने प्रज्वलित होणाऱ्या अग्निदेवांना यज्ञकर्ते मित्रांप्रमाणे प्रज्वलित करून सुशोभित करतात. अग्निदेव यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित झाल्यावर मानवांच्या उदात्त भावनांचा उत्कर्ष करोत ही विनंती ॥७॥

अप्रयुच्छन्नप्रयुच्छद्भिरग्ने शिवेभिर्नः पायुभिः पाहि शग्मैः ।
अदब्धेभिरदृपितेभिरिष्टेऽनिमिषद्भिः परि पाहि नो जाः ॥८॥

हे अग्निदेवा! आळसमुक्त, कोणत्याही व्यत्ययाशिवाय, फायदेशीर आणि आनंददायी साधनांनी आपण आमचे सतत रक्षण करावे ही विनंती. हे पूजनीय अग्निदेवा! आमच्या पुत्र-पौत्रांचे लक्षपूर्वक रक्षण करावे ही विनंती ॥८॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४४

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य । **देवता-** अग्नि **छन्द-** जगती

एति प्र होता व्रतमस्य माययोर्ध्वां दधानः शुचिपेशसं धियम् ।
अभि स्रुचः क्रमते दक्षिणावृतो या अस्य धाम प्रथमं ह निंसते ॥१॥
उच्च आणि शुद्ध विचारवंत, ज्ञानी यज्ञकर्ते अग्निदेवांच्या व्रतांचे नियमपूर्वक पालन करतात. यज्ञकर्ते नैवेद्य अर्पण करण्यासाठी स्रुवापात्र हातात धरून नैवेद्य अर्पण करतात॥१॥

अभीमृतस्य दोहना अनूषत योनौ देवस्य सदने परीवृताः ।
अपामुपस्थे विभृतो यदावसदध स्वधा अधयद्याभिरीयते ॥२॥
अग्निदेवांचे मूळस्थान असलेला स्वर्गलोक प्रकाशमान केल्यावर, जलप्रवाह अग्निदेवांना पावसाच्या स्वरूपात पृथ्वीवर येण्याची प्रार्थना करतात. आपदेवतेच्या(जलदेवतेच्या) प्रभावाने अग्निदेव पाण्याचा वर्षाव करतात. ते अमृतासारखे पाणी सर्वजण प्राशन करतात ॥२॥

युयूषतः सवयसा तदिद्वपुः समानमर्थं वितरित्रता मिथः ।
आदीं भगो न हव्यः समस्मदा वोळ्हुर्न रश्मीन्त्समयंस्त सारथिः ॥३॥
अग्निदेवांना प्रज्वलित करण्यासाठी, समान शक्तीच्या दोन अरण्या एकाच वेळी एकमेकांशी घासल्या जातात. ज्या प्रकारे सारथी घोड्यांना लगामाने नियंत्रित करतो त्याप्रकारे प्रज्वलित झाल्यानंतर, यज्ञवेदितील अग्निदेव आपल्याकडून अर्पण होणरे तूप सर्व बाजूंनी स्वीकारतात ॥३॥

यमीं द्वा सवयसा सपर्यतः समाने योना मिथुना समोकसा ।
दिवा न नक्तं पलितो युवाजनि पुरू चरन्नजरो मानुषा युगा ॥४॥
एकाच घरात राहणारे, एकाच कामात गुंतलेले दोन समान वयाचे पतिपत्नी यज्ञविधीद्वारे अहोरात्र अग्निदेवांची उपासना करतात. यज्ञकर्ते पतिपत्नी रात्रंदिवस ज्या अग्निदेवांची पूजा करतात, ते नैवेद्य सेवन करून वृद्धत्वातून मुक्त होतात ॥४॥

तमीं हिन्वन्ति धीतयो दश व्रिशो देवं मर्तास ऊतये हवामहे ।
धनोरधि प्रवत आ स ऋण्वत्यभिव्रजद्भिर्वयुना नवाधित ॥५॥
दहा बोटांमध्ये फरक असूनही, ती सर्व बोटे एकत्रितपणे तेजस्वी अग्नीदेवांना प्रज्वलित करतात. आपण यज्ञकर्ते भक्तगण संरक्षणासाठी अग्निदेवांचे आवाहन करतो. ज्याप्रमाणे धनुष्यातून बाण सोडला जातो, त्याचप्रमाणे अग्निदेव त्यांच्या ज्वालांना सर्वत्र पसरवतात; सभोवतालच्या भक्तांनी रचलेल्या नवीन प्रार्थना श्रवण करतात.॥५॥

त्वं ह्यग्ने दिव्यस्य राजसि त्वं पार्थिवस्य पशुपा इव त्मना ।
एनी त एते बृहती अभिश्रिया हिरण्ययी वक्वरी बर्हिराशाते ॥६॥
हे अग्निदेवा ! पशुंच्या पालकांप्रमाणे आपण आपल्या शक्तीने स्वर्गीय जगाचे आणि पृथ्वीवर असलेल्या प्राण्यांचे स्वामी आहात. हे अग्निदेवा ! याच कारणामुळे श्वेतवर्णीय ,भव्य ,प्रसिद्ध, सोन्याने मढलेल्या, मधुरभाषी आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता या यज्ञामध्ये येतात ॥६॥

अग्ने जुषस्व प्रति हर्य तद्वचो मन्द्र स्वधाव ऋतजात सुक्रतो ।
यो विश्वतः प्रत्यङ्ङसि दर्शतो रण्वः संदृष्टौ पितुमाँ इव क्षयः ॥७॥

स्तुतीस पात्र, यज्ञ कार्यासाठी उत्पन्न झालेल्या , अन्नाने समृद्ध आणि सर्वोत्तम कर्म करणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण संपूर्ण निर्जीव आणि सजीव जगासाठी फायदेशीर आहात. सर्वत्र दृश्यमान, डोळ्यांना आनंददायी, सर्वांच्या आश्रयदात्या हे अग्निदेवा ! प्रसन्न होऊन आम्ही रचलेली स्तोत्रे आपण पुन्हा पुन्हा ऐकावी ही विनंती ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४५

ऋषी- दीर्घतमस् औचथ्य । **देवता-** अग्नि **छन्द-** १-४जगती५ त्रिष्टुप्

तं पृच्छता स जगामा स वेद स चिकित्वाँ ईयते सा न्वीयते ।
तस्मिन्त्सन्ति प्रशिषस्तस्मिन्निष्टयः स वाजस्य शवसः शुष्मिणस्पतिः॥१॥
अश्वा सारख्या वेगाने सर्वत्र संचार करणाऱ्या, सर्वज्ञानी, सर्वव्यापी अग्निदेवांना हे यज्ञकर्त्यांनो ! आपण आपल्या शंका विचाराव्या कारण अग्निदेवांकडे प्रशासन करण्याची क्षमता आणि सर्व इच्छित वस्तु देण्याची शक्ती आहे. अग्निदेव शक्ती आणि बलवानांचे रक्षणकर्ते आहेत ॥१॥

तमित्पृच्छन्ति न सिमो वि पृच्छति स्वेनेव धीरो मनसा यदग्रभीत् ।
न मृष्यते प्रथमं नापरं वचोऽस्य क्रत्वा सचते अप्रदृपितः ॥२॥
सामान्य लोक अग्निदेवांना प्रश्न विचारू शकत नाहीत म्हणून ज्ञानी यज्ञकर्ते अग्निदेवांना प्रश्न विचारतात. कोणाच्याही बोलण्याला अनावश्यक महत्त्व न देता हे धैर्यशाली, ज्ञानी यज्ञकर्ते त्यांचे प्रश्न विचारायाचे काम निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण करतात. म्हणूनच निगर्वी यज्ञकर्ते अग्निदेवांची शक्ती प्राप्त करतात॥२॥

तमिद्गच्छन्ति जुह्वस्तमर्वतीर्विश्वान्येकः शृणवद्वचांसि मे ।
पुरुप्रैषस्ततुरिर्यज्ञसाधनोऽच्छिद्रोतिः शिशुरादत्त सं रभः ॥३॥
चमस पात्रा मध्ये ठेवलेले तूप मिश्रित सर्व नैवेद्य केवळ अग्निदेवांना अर्पण केले जातात आणि प्रार्थना देखील त्यांच्यासाठीच असतात. अग्निदेव आपली

सर्व स्तोत्रे श्रवण करतात. अनेकांचे प्रेरणास्थान असलेले, दुःख दूर करणारे, यज्ञ संपन्न करणारे, रक्षक आणि सर्व शक्तीने परिपूर्ण अग्निदेव शिशूंसारखे नैवेद्य स्वीकारतात ॥३॥

उपस्थायं चरति यत्समारत सद्यो जातस्तत्सार युज्येभिः ।
अभि श्वान्तं मृशते नान्द्ये मुदे यदीं गच्छन्त्युशतीरपिष्ठितम् ॥४॥
जेव्हा यज्ञकर्ते अग्निदेवांना प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते प्रकट होतात आणि सर्व दिशांना पसरतात. यज्ञात प्रज्वलित झालेल्या सर्वव्यापी अग्निदेवांना नैवेद्य अर्पण केल्याने अग्निदेव यज्ञकर्त्या भक्तांना इच्छित फळ देऊन प्रोत्साहित करतात ॥४॥

स ईं मृगो अप्यो वनर्गुरुप त्वच्युपमस्यां नि धायि ।
व्यब्रवीद्वयुना मर्त्येभ्योऽग्निर्विद्वाँ ऋतचिद्धि सत्यः ॥५ ॥
वनांमध्ये भ्रमण करणारे, शोधक, गतिमान, साध्य करण्यास सक्षम असलेले अग्निदेव यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित होतात. यज्ञ करण्याचे ज्ञान असलेले अग्निदेव यज्ञकर्त्या भक्तांना यज्ञ करण्याचे ज्ञान देतात ॥५॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.
प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे आठवे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६०पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), डॉ. अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१३), **डॉ. वृषाली जोशी (५८)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२),

आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (९), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (८), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (४) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(४), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे(३), सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(३), स्वाती वर्तक(२), भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), कैलास बडगुजर, प्रा श्रीपाद काळे(६), चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे, श्रेणिक सारडे (६) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)